४८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
इतिहास

संग्रहालय क्रमांक
४८
२७५

लेखक शिवराम गणपत बाक्रस

पुस्तकाचें नांव फ्रेंच व जर्मन लोकांच्या लढाईचा इतिहास. भाग पहिला

सन
१८७०

४८

इति

नं. २३३

पुस्तक

रा० रा० विनायक रामचंद्र
पटवर्धन बी. ए.

यास

मित्रत्वाचे संबधानें

ग्रंथकर्त्यानें

नजर केलें

असें.

(लेखक — शिवराम गणपत बाप्रस
सन १८७० प्रसिद्ध झाले

श्री

रा० रा० शिवराम गणपतराव बाब्रस...... ....यांस

नमस्कार वि. वि. आपण मला हें पुस्तक नजर केलें हें पाहून मी फार आनंदी व आपला आभारी झालों. वस्तुतः हें पुस्तक जर आपण दुसऱ्या एकाद्या विख्यात, श्रीमान, विद्वान किंवा रसिक पुरुषास अर्पण केलें असतें तर आपणास धनाचा व कीर्तीचा बराच लाभ झाला असता; आणि जर आपण केवळ मित्रत्वाकडे लक्ष देऊन महत्वेच्छा व सामान्य जनरूढी सोडली नसती तर मला ही अशागोष्टीस रुकार भरण्यास संकोच वाटला असता. असो. मी हें पुस्तक सावंत वाचून पाहिलें; व जरी क्वचित् ठशाच्या चुका व क्वचित् दुसरे क्षुल्लक प्रकारचे दोष आढळतात तरी हें अवघड, मोठ्या जोखमीचें व कांहीं अंशीं नवीन तऱ्हेचें काम आपण फार जलदीनें शेवटास नेलें हें ऐकून एतद्देशीय लोकांस आनंद वाटल्या वांचून राहणार नाहीं. प्रथमतः ह्या देशांत नवीन पुस्तकें अशीं कमीच, तशांत स्वदेशभाषेंत लिहिलेल्या पुस्तकांस मुळींच तेजी नाहीं. आतां विद्यामृताचा पाट जेव्हां ह्या देशांतील नादान, पड व निकस जमिनींतून जाऊन चोहोंकडे तर्र करून सोडील तेव्हां आपले सारख्यांनीं आरंभलेल्या कामांच्या फलांत अभिरुचि वाटूं लागेल. तथापि, इष्टशास्त्रीय विषयांच्या पुस्तकांची वर्षांतून दोन तीन पिकें निघून आपले दृष्टीस पडण्याची वेळ येई पर्यंत बहुत दिवस आपणा सर्वांस वाट पाहिली पाहिजे. असो. हें पुस्तक वाचून ज्या चार गोष्टी माझे मनांत आल्या त्यांचा ह्या पत्रांत उल्लेख केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. इतिहास व शास्त्रीय विषयांच्या

मुलतत्वाचें ज्ञान लहानपणीं स्वदेशभाषेच्या द्वारें मि-ळूं लागल्याशिवाय ह्या देशाचा उत्कर्ष होणार नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. इतिहास माहित असण्याचीं फळें सावधगिरी ठेवणें व प्रसंगानुसारखें वागणें हीं विशेषें करून होत. ह्या देशांत पौराणिक कादंबरीरूप ऐतिहासिक पु-स्तकांची संख्या बरीच आहे व त्यांत बहुत गोष्टी खऱ्याही आहेत. तथापि फार कालांतर झाल्यानें व मोठमोठया घडलेल्या गोष्टींचा संगतवार कच्चा मजकूर सांपडत नस-ल्यानें व आमची स्थिति पूर्वी पेक्षां पुष्कळ तऱ्हांनीं बदल ल्यानें पौराणिक इतिहासा पासून व्हावा तितका उप-योग होत नाहीं म्हणून फ्रान्स व जर्मनी ह्या फार सुधारले-ल्या देशांत नुकयाच घडून आलेल्या व ज्यांची वाफ अ-द्यापि जिरली नाहीं अशा गोष्टींचे संपुर्ण वर्णन केल्यानें व वाचल्यानें आमचे देशाचे अधिक कल्याण आहे. या फ्रां-को प्रशीयन लढाईत स्नीडर, शासपॉ व मिट्रेलू सारखी प्राण घातक फार सुधारलेलीं हत्यारें आणि विमान वेधशा-ला, व पत्रें नेणारीं शिकाऊ खबुतरें आदिकरून वस्तूंचा अचंबा वाटण्या जोगा उपयोग करण्यांत आला. हें युद्ध चरित्र वाचल्यानें किति जीवांचा व संपत्तिचा नाश होतो हें सांगण्याची गरज राहत नाहीं. तसेंच हा नाश कोणत्या प्रसंगीं कोणच्या चुकां मुळें झाला व तो करवेल तितका कमी करण्याचे उपाय इत्यादि गोष्टींची फोड ही आपोआप होत्ये. सर्व प्रजे पाशीं उत्तम प्रकारची हत्यारें असणें व त्यांचा उपयोग करण्याचा राबता ठेवणें. ह्या गोष्टी फार महत्वाच्या आहेत असेंही ह्या बखरीपासून समजतें. या

पुस्तकांतील विषयाच्या संबंधानें आपण जितकी लष्करी माहिती दिली असती तितकी थोडीच वाटली असती. तथापि आजच्या काळांत फ्रान्स व जर्मनी ह्या दोन फार सुधारलेल्या देशांतील सैन्य, युद्धकौशल्य व लष्करी व्यवस्था इत्यादि गोष्टींची परस्पर तुलना व न्यूनाधिक्यांचें वर्णन आपण पुस्तकांतील दुसरे भागांत दिलें आहे तें फार उपयोगाचें व मनोरंजक आहे.

जेव्हां लढाईस प्रारंभ झाला तेव्हां जरी फ्रेंच बादशाहच्या मनांत लढाई करणें होती तरी फ्रेंच लोकांच्या मनांत तसा हेतु पाहिल्यानें नसल्या कारणानें एकत्र झालेल्या जर्मन लोकांस जय मिळाला. परंतु जेव्हां फ्रेंच लोकांच्या देशावर व प्राणावर वेळ येऊन ठेपली तेव्हां सर्व फ्रेंच लोक एक झाले व आपलीं शिरें तळहातावर धरून स्वदेशाकरतां उठले. ह्या एकीचें फळ असें झालें कीं, फ्रान्स देश जर्मन लोकांच्या दाढेंतून सुटला फ्रेंच लोक जरी इतर युरोपियन लोकांपेक्षां फार कुशल, बुद्धिमान, शूर, चैनी व उदार आहेत तरी ते मनाचे फार चंचल आहेत, ह्यामुळें त्यांच्या राज्यकारभारांत नेहमीं फळ्या असतात व हीं बारभाई जर लढाईच्या वेळीं नसतीं तर जर्मन लोकांस मिळाला इतका जय मिळण्यास शतपट कठीण पडलें असतें. सर्व जर्मन संस्थानांची एकी झाल्यानें त्यांचे सैन्याची संख्या फ्रेंचांपेक्षां अधिक झाली तथापि अणीबाणीच्या प्रसंगीं अभोज्य मांस तर काय पण काष्ठपिष्ट खाऊन फ्रेंच लोक लढले अशा प्रकारचा शिपाईगिरीचा व ऐश आरामाचा एकवट दुसऱ्या कोणच्या लोकांत आढळणार नाहीं. फार तर काय परंतु फ्रेंच स्त्रियां

देखील खांद्यावर बंदूक घेण्यास तयार झाल्या व त्यांनीं हातांत विषारी लोखंडाचीं वाघनखें घालून शत्रूपासून स्वदेशाचें व पातिव्रताचें रक्षण केलें. लढाई संपल्यावर- तहनाम्याप्रमाणें फ्रेंच्यांनीं जर्मन लोकांस दोन अब्ज रुपये द्यावे असें ठरलें.ही एवढी मोठी रकम कर्ज काढून व दुसऱ्या पुष्कळ तऱ्हांनीं फ्रेंच्यांनीं दीडवर्षांत उभी करून जर्मनलोकांस दिली. ह्यांत लक्षांत ठेवण्या जोगी गोष्ट एवढीच झालेली एकण्यात आली आहे कीं फ्रेंच लोकां पैकीं जे लोक मोल मजुरी करून पोट भरतात त्यांनीं सुद्धां पोटभरीस जेवढें द्रव्य लागतें तेवढें रोज मिळकतींतून वगळून ठेवून बाकीचें सर्व द्रव्य कोणाची टुमणी पाठीमागें नसतां रस्तोरस्तीं सरकारानें मांडलेल्या पेठ्यांत कर्ज फिटें पर्यंत नित्य टाकिलें. तसेंच कांहीं फ्रेंच कुलीन स्त्रीयांनीं कर्ज फेडीस आपलें दागिनेंही मोडून घातले. शेवटीं मला इतकेंच लिहिणें आहे कीं युद्धांतील उभय पक्षांच्या सरदारांनीं लढणाऱ्या लोकांच्या उत्तेजनार्थ जीं केलेलीं संभाषणें आपले पुस्तकांत आलीं आहेत तीं वाचण्यासारखीं आहेत व एकी, औदार्य व शूरत्व हे फ्रेंच लोकांतील गुण कित्ता घेण्यासारखे आहेत. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंती. जेष्ट शुद्ध १ मंदवार शके १७९६. तारिख १६ मे सन् १८७४ इसवी.

विनायक रामचंद्र पटवर्धन.

इतिहास

२२

# फ्रेंच आणि जर्मन लोकांच्या लढाईचा इतिहास.

## भाग १ ला.

युरोप खंडाच्या पश्चिम बाजूस फ्रान्स आणि मध्य भागीं जर्मनी असे दोन देश आहेत. हे दोन्ही पराक्रमी आणि शूर देश फार जवळ जवळ आहेत. यांचें फार प्राचीन काळापासून वैमनस्य पडलें आहे. पण यांच्यांत वारंवार लढाया होण्याचें कारण र्‍हाइन नदी आहे. जर्मन लोक म्हणतात कीं या नदीच्या दोहों कांठचा प्रांत आमचा आहे, आणि फ्रेंच लोक ह्मणतात कीं डाव्या कांठचा प्रांत आमचा आहे. या ठिकाणचे लोक दोन्ही भाषा बोलतात ह्मणून तो प्रांत कोणाचा हें ओळखतां येत नाहीं. जसें ज्याचें वरचस्व होईल तशी तो आपली सरहद्द बदलितो. सध्यां त्या प्रांतांतील थोडा भाग फ्रेंचांचे ताब्यांत होता.

फ्रान्स देशाच्या लुई नेपोलियन बादशहानें सन १८०६ मध्यें *प्रशिया देश जिंकला. त्या दिवसापासून प्रशियन लोकांचे मनांत डांचत होतें कीं हा सूड कधींना कधीं तरी उगवूं; म्हणून त्यांनीं होईल तितकी तयारी चालवली. सैन्या मध्यें उत्तम सुधारणा केली. हत्यारें वगैरे

* उत्तर जर्मनींतील एक देश आहे.

लढाईचें सामान चांगलें सुधारिलें. †नीडल म्हणून नवीन ‡ब्रिच लोडिंग बंदुक काढली. तोफखाना चांगला सुधारिला. देशांतील सर्व लोकांनीं लष्करांत चाकरी करावी असा कायदा केला.

फ्रेंचांशीं वारंवार लढण्याचा प्रसंग येतो म्हणून जर्मनलोकांनीं सन १८१५मध्यें एक §सभा स्थापन केली. या सभेंत बहुतेक जर्मनींतील संस्थानी लोक होते. त्यांत प्रशिया देशाचा-राजा अध्यक्ष स्थानीं होता. उत्तर जर्मनी मध्यें देशांतील सर्व लोकांनीं लष्करांत चाकरी करण्याचा कायदा चालू करण्याचे वेळेस प्रशियाचे राजानें भाषण केलें तें येणें प्रमाणें :—

" ज्या देशांत एक अधिपति असतो त्या देशांत स्वस्थता असली तर तें राज्य सुरळीत चालतें. उत्तर जर्मनीवर तुम्ही सर्वांनीं मला अध्यक्ष नेमिलें आहे. आतां आपण सर्व मिळून स्वस्थता राखण्यास जितका आपल्याच्यानें प्रयत्न करवेल तितका आपण करूं. ती संभाळण्या करितां लष्करांत सर्व लोकांनीं चाकरी करण्याचा कायदा केला आहे. या कायद्याच्या बळानें सर्व जर्मन लोक शिपाई बनतील. अशी स्थिति झाली असतां जर एखादे वेळेस आणिबाणीचा प्रसंग आला तर दे

---

† सुई सारखा काना आहे म्हणून निडल हें नांव पडलें आहे.

‡ कान्या जवळून दारू भरावयाची बंदुक. इस गजानें ठासावें लागत नाहीं.

§ या सभेस जर्मन "डायट" किंवा जर्मन " कान्फिडरेशन" असें म्हणत असत.

शाचें रक्षण करण्यास कठीण पडणार नाहीं; म्हणून सर्व लोकांनीं आनंदानें लष्करांत चाकरी करावी, हेंच त्यांच्या सुखास कारण होईल. सर्वांस शिपायाचे गुण आल्या शिवाय राज्य फार दिवस राहाणार नाहीं. शौर्य व राजनिष्ठ हे दोन गुण सर्वांनीं धारण करावेत. या प्रमाणें जर जर्मन लोक वागतील तर त्यांस पूर्वीं प्रमाणें सुखाचे दिवस प्राप्त होतील. आणि मग जर्मन देशाकडे पहाण्याची देखील कोणाची छाती होणार नाहीं."

अशा प्रकारें जर्मन लोकांचा एकत्र जमाव होत चालला व फ्रेंच लोकांचें पाऊल आंत पडत चाललें. सन १८३० सालीं राज्य सुधारणुकीची गडबड होऊन पहिल्या बादशाहास पदभ्रष्ट केलें आणि लुई फिलिप यास गादीवर बसविलें. पुन्हा सन १८४८ सालीं गडबड होऊन लुई फिलिप यास पदभ्रष्ट केलें. ही गडबड सुमारें चारवर्षें चालू होती. पुढें सन १८५२ मध्यें पुन्हा बादशाही होऊन नेपोलियन यास बादशाहा केलें. हा लुई नेपोलियनाचा पुतण्या होय. यास तिसरा नेपोलियन असें ह्मणत. सन १८५९ सालापर्यंत याच्या अमला खालीं फ्रेंचांचा बराच उत्कर्ष झाला नंतर त्यांस उतरती कळा लागली, आणि बादशाहा मध्यें व लोकांमध्यें वैमनस्य पडत चाललें.

सन १८६१ सालीं नेपोलियन बादशहानें मेक्सिको देशाचे कारभारांत हात घातला आणि तेथील कांहीं लोकांच्या मसलतीनें तेथें बादशाही करण्याचा बेत करून आस्त्रिया देशाचा *आर्च ड्युक यास तेथील बादशहा केलें. अतां त्या

* ही एक पदवी आहे.

स मदत करावी हें फ्रेंच बादशहाचें काम असून, मदत न करितां त्यास तेथें निराश्रित सोडलें, येणें करून अमेरिका खंडांत फ्रेंच बादशहाचा मोठा दुर्लौकिक झाला. याच प्रमाणें युरोपांत ही झालें.

पोपाच्या संस्थानाचा संभाळ पुष्कळ दिवसां पासून फ्रेंच लोक करीत होते, परंतु सन १८६७ साला पासून सर्व लोकांस वाटलें कीं त्या संस्थानाशीं फ्रेंच बादशहाची वर्तणूक कपटाची आहे.

सन १८६३ सालीं पोलिश लोकांनीं बंड केलें. ते वेळेस फ्रेंच बादशहाचा व रशियन सरकाराचा बराच पत्र व्यवहार झाला परंतु त्या पासून फ्रेंचांस कांहींच फायदा झाला नाहीं.

सन १८६४ सालीं ऑस्ट्रियन आणि प्रशियन या दोन लोकांनीं डेन्मार्क देशावर स्वारीकरून स्लेस्विग–होलेस्टन प्रांत घेतला. ते वेळेस ही फ्रेंच बादशहाचें कोणीं मानिलें नाहीं.

या सर्व कारणांवरून फ्रेंच बादशहास परदेश संबंधी कारभार करितां येत नाहीं असें फ्रेंच लोकांस वाटलें आणि तेणेंकरून बादशहाचें वजन कमी झालें.

आतां कोठें तरी लढाई करून कीर्ति मिळवावी आणि पुन्हा फ्रेंच लोकांवर आपलें वजन बसवावें असें नेपोलियन बादशहानें मनांत आणून परदेशांत जें फ्रेंच सैन्य होतें तें फ्रान्स देशांत आणविलें.

लक्षेंबर्ग प्रांत जर्मन लोकांनीं घ्यावा. दक्षिण व उत्तर जर्मनी एकत्र करण्यास जे अडथळे असतील ते काढून टाकावेत. फ्रेंच लोकांनीं बेलजम देश घ्यावा.

याबद्दलचा लेखी दस्त फ्रेंच वकिलापासून कौंट बिस्मार्क यानें घेतला. आणि मग कांहींच उत्तर दिलें नाहीं. कधींतरी उपयोगी पडेल ह्मणून तो दस्त त्यानें तसाच ठेविला.

फ्रेंच *ईस्टर्न रेलवे कंपनीनें बेलजम रेलवे विकत किंवा कौलानें घ्यावी. बेलजम देश ताब्यांत आणण्याकरितां अशी दुसरी युक्ती फ्रेंच बादशहानें काढली. या कामास फ्रेंच सरकारानें आपला वकील ब्रुसेल्स शहरीं पाठविला होता. परंतु ही मसलत बेलजम सरकारानें नाकारिली.

अशा प्रकारें फ्रेंच बादशहाची ही देखील मसलत फसली.

सन १८६९ चे आरंभापासून पार्लमेंट सभेकरितां लोक निवडण्याचें काम चालू झालें. †रिपब्लिकन् लोकांचा पक्ष बलवत्तर होत चालला. लोक निवडण्याचे कामांत बरीच गडबड झाली, कित्येक लोक कैदीही झाले.

सन १८६९ चे जूनचे २८ वे तारखेस पहिली

---

* पूर्वेकडील,

† लोकसत्तात्मक राज्य असावें म्हणणाऱ्या लोकांचा.

पार्लमेंट सभा भरली. तेव्हां बादशहास अधिकार किती असावा व पार्लमेंट सभेस अधिकार किती असावा हा वि-चार प्रथम सुरू झाला. यामुळें बादशहास वाईट वाटलें व त्यानें निरोप पाठविला कीं, कारण पडेल तर या गोष्टी-चा विचार करावा, सध्यां याची जरूर नाहीं.

आक्टोबरचे १६ वे तारखेस बादशहाचे हुकुमानें पुन्हां सभा भरली. तेवेळेस सैन्य उभारण्याचें बादशहानें बोलणें ला-विलें. तें बोलणें कोणींच कबूल केलें नाहीं. यामुळें त्या सभेवरचा बादशहाचा विश्वास उडाला.

डिसेंबरचे २७ वे तारखेस बादशहानें आपले पक्षाचे लोकांकडून राजीनामे देववून अलीवर वगैरे मंडळीस नवीन *मिनिस्ट्रीचें काम करण्यास सांगितलें. यांत देखील कित्ये-क लोक बादशहाचे विरुद्ध पक्षाचे होते. एकंदर राज्य-व्यवस्थेंत फारच घोंटाळा होऊन गेला. कित्येकांनीं बाद-शहास मारण्याचा प्रयत्न केला. वर्तमानपत्रें बादशहास दोष देऊं लागलीं. फ्रेंच लोकांचें मन बादशहावरून अगदीं उडालें. त्यानें फ्रेंच लोकांची अब्रु घालविली, असें सर्व लोक ह्मणूं लागले.

सन १८७० चे जून महिन्याचे ४ थे तारखेस पारिस शहरांत वर्तमान आलें कीं जर्मनींतील होहेन—झोलर्न सं-स्थानच्या राजपुत्रानें जर्मन सरकारच्या मतानें स्पेन देशाचे राजपद स्वीकारण्याचें कबूल केलें. हें वर्तमान कळल्या-

* राज्यकारभार करणारी मंडळी.

वर फ्रेंच सरकारानें बर्लीन शहरांतील आपल्या वकिलास कळविलें कीं, "जर्मनींतील राजपुत्रास पिरिनीज पर्वताच्या पलीकडे राज्य करण्यास फ्रेंच सरकार अडथळा करील," असें जर्मन लोकांस कळवावें. यास तेथील सरकारानें उत्तर दिलें कीं, "या कामीं आमचें आंग नाहीं, व असें झालें ह्मणून फ्रेंच सरकारास वाईट वाटूं नये". यावर, फ्रेंच वकिलानें प्रशियाचे राजाची भेट घेतली. त्यानेंही असेंच सांगितलें. नंतर फ्रेंच वकिलानें सांगितलें कीं, स्पेन देशाचे गादीवर जर्मनींतील राजपुत्रास बसूं देणार नाहीं. असें जर्मन सरकारानें वचन द्यावें, व हेंच बोलण्याकरितां प्रशियाचे राजाची भेट घेण्याची खटपट चालविली. यास प्रशियाच्या राजानें उत्तर दिलें की, आह्मांस वचन देण्याची गरज नाहीं; आणि हीच गोष्ट बोलण्यास पुन्हां याल तर तुमची भेट घेतली जाणार नाहीं. असा अपमान झाला ह्मणून फ्रेंच वकिलानें आपल्या देशास जाण्यास निरोप मागितला.

फ्रान्सदेशाचा वकील निघून गेल्यावर प्रशियाचे राजानें संभाषण केलें तें:—

"आतां, लढाई तर होणारच. हें आलेलें संकट कसें निवारावें, याचा विचार तुह्मी करीतच आहां. आपल्यांशीं लढाई करण्या करितां जें सैन्य येणार त्यामध्यें बहुत करून सर्व शेंदाड शिपाई आहेत. फ्रान्स देशच्या बादशहानें किती लबाड्या करून राजपद मिळविलें आहे !! तो व्यर्थ फुशारकी मिरवितो. लुच्चेगिरी करून तो या जगांत

उदयास आला आहे. स्वस्थता मोडावी येवढेंच बोनापा-र्टांच्या घराण्याचें काम. युरोपखंडांमध्यें त्यानें ढवळाढवळ केली नाहीं असा एक तरी देश राहिला आहे काय? सर्वांशीं लढाया करून त्यानें सर्वांस उगीच त्रास दिला. याच्याशीं सख्य करून कांहीं तरी सौख्य आहे काय? यानेंच *पोलस लोकांस बंड करण्यास लाऊन त्यांचा नाश करविला. बेल्जम, लक्षेंबर्ग, स्वित्सर्लंद वगैरे देश ता-ब्यांत घ्यावे ह्मणून त्यानें पुष्कळ खटपट केली. †क्रिमि-याचे लढाई पासून ऱ्हाइन नदीचे कांठचा प्रांत घेण्या करितां तो कुःापत काढीत आहे. आपली आस्त्रियन लोकांशीं लढाई झाली, तेवेळेस याचा डोळा या प्रांतावर होता. जर आपणांस लवकर जय मिळाला नसता तर खचित यानें तो प्रांत घेण्याची संधी आणली असती. § इतालियन लोकांनीं याच्याशीं स्नेह केला तर त्यांचे दोन प्रांत घेतले. आतां सर्व जर्मन लोक एक झाले, हें त्या-च्यानें पाहवेना. आस्त्रियाचे लढाई नंतर फ्रेंच बादशहा तिऱ्हाईतपणाबद्दल दोन प्रांत आपणाजवळ मागत होता. हें त्याचें मागणें सयुक्तिक होतें काय? लाच घेऊन आणि कपट करून त्यानें आपला व इतालियन लोकांचा स्नेह तोडिला. दक्षिण जर्मनीची व उत्तर जर्मनीची एकत्र होण्याची मागें एकदा संधी आली होती ती यानेंच घालविली.

---

* पोलंड देशचे लोक.

† ही लढाई सन १८५४ सालीं झाली यांत फ्रेंच मुख्य होते.

§ इताली देशचे लोक.

असा घोटाळा करण्याचें कारण केवळ स्वस्थता मोडावी येवढेंचं आहे. सध्यां त्यानें कांहीं विलक्षणच प्रकार आरंभिला आहे. फ्रेंच लोकांवर आपला पगडा बसावा ह्मणून त्यानें हें कृत्य आरंभिलें आहे. आतां आपण पूर्वींच्या तहास भिऊन उगीच बसूं नये. आपल्या देशाची आपण अब्रू राखावी हेंच उत्तम होय. उघड लढाई करणें बरें, परंतु आंतल आंत तयारी करून लढाईची सामग्री खर्चावी, शेतकी बंद पाडावी, विद्यावृद्धि कमी करावी आणि सर्वांपेक्षां मोठें दुःख हें कीं मानेवर सुरी ठेवल्याप्रमाणें नेहमीं भयानें वागावें हें अगदीं गैर आहे. आपण नेपोलियनाचा पराभव केल्यास सर्व जगास स्वस्थ केल्याप्रमाणें होईल; व फ्रेंच लोकांसही दास्यत्वापासून सोडविल्याचें श्रय आपणांस येईल. आपण कांहीं फ्रेंच लोकांशीं लढत नाहीं, पण ज्या बादशहानें त्यांस दीन करून सोडिलें आहे त्याशीं लढतों. हीच आपली शेवटची लढाई आहे. ही लढाइ जिंकिली असतां आपली एकी झाल्याची चीज होईल. सत्याचे मागें ईश्वर आहे, स्वस्थतेचा व दयेचा शत्रु जो फ्रेंच बादशहा याचा पराभव केलाच पाहिजे. आतां हें काम शेवटास नेल्याशिवाय राहूं नका."

फ्रेंच वकील स्वदेशीं आल्यावर फ्रेंच सरकारानें जाहीरनामा प्रसिद्ध केला तोः—

"प्रशिया सरकारानें जाणून बुजून फ्रेंच वकिलाशीं उद्धटपणानें वागून फ्रेंच सरकारचा अपमान केला, आणि हल्लीं त्यानीं अशा प्रकारची वर्तणूक चालविली आहे कीं तेणेंकरू

न सर्व युरोप खंडांत अविश्वास आणि भय उत्पन्न होऊन सर्वच आपआपले ठिकाणीं तयारीस लागले आहेत. फ्रान्स देशास पुढें मागें कोणच्याही प्रकारचा धोका न लागावा, अशा प्रकारची मागणी आह्मीं मागितली ह्मणून फ्रेंच वकिलाचा अपमान केला. आणि ही बातमी गुप्त न ठेवतां वर्तमानपत्रांतून छापविली; खेरीज ठिकठिकाणच्या आपल्या वकिलांस तारायंत्रांतून कळविली. जर्मनींतील राजपुत्र स्पेन देशाच्या गादीवर बसल्यानें फ्रान्स देशास फार भय आहे; आणि तेणें करून राष्ट्रांची समानता मोडते; इतकेंच प्रशियाचे राजास लिहिलें असतां त्यानें जें उत्तर दिलें तें लढाईस या म्हणण्यासारखेंच आहे. तर आतां आह्मांस लढाईची तयारी करणें जरूर आहे.

हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यावर जुलैचे १९ वे तारखेस बर्लिन येथें जर्मन डायट सभे मध्यें प्रशियाचे राजानें भाषण केलें तें:—

" गत शतकां मध्यें फ्रेंच लोकांनीं अशा रितीच्या कांहीं क्षुल्लक व हंसण्याजोग्या कुरापती काढून जर्मनीचा नाश केला तो अपमान जर्मन लोकांनीं निमूटपणें सोसला; कारण तेवेळेस जर्मनींतील सर्व संस्थानें निरनिराळीं होतीं. यामुळें त्यांचे त्यांसच आपलें सामर्थ्य किती आहे हें समजलें नाहीं. सर्व जर्मन संस्थानांची एकी झाली आहे. तर मग आतां फ्रेंच लोकांचा जुलूम आपण सोसावा असें तुह्मां सर्वांस वाटतें काय ? कधीं सोसूं नये. हें मी गर्वानें बोलतों असें नाहीं. लढाईंत जय किंवा अपजय

येणें परमेश्वराच्या स्वाधीन आहे. फ्रेंच सरकारानें वृथा ही लढाई उकरून काढली आहे. आणि जर्मन लोकांवर असें संकट आणलें आहे कीं मुकाट्यानें त्यांचें बोलणें कबूल करावें नाहीं तर लढाईस तयार व्हावें. आतां या विषयीं तुह्मां सर्वांच्या विचारास येईल तसें करूं."

यास जर्मनीच्या पार्लमेंट सभेनें उत्तर दिलें तें:--

" जो अपराध करितो त्यास परमेश्वर शिक्षा करितो. फ्रेंचांचें गर्वाचें बोलणें ऐकून जर्मन समुद्रा पासून तें अल्पस् पर्वताचे पायथ्या पर्यंत सर्व लोक लढाईस तयार झाले आहेत. कसलें ही संकट आलें आणि किती ही नाश झाला तरी ते सोसण्यास कबूल आहेत. परंतु असला उपमर्द सोसण्यास कबूल नाहींत. आपण लढाईस तयार व्हावें हेंच योग्य आहे. आणि असेंच सर्व जगही म्हणत आहे. सर्व जर्मनी देश एकत्र झाला आहे, तर आतां त्याची शक्ति किती आहे हें सर्व जगास दाखविण्याची हीच वेळ आहे. अशी वेळ पुन्हा येणार नाहीं. तर ही संधि व्यर्थ घालवूं नका. एवढी लढाई आपण जिंकली ह्मणजे आपल्या वाटेस कधींच कोणी जाणार नाहीं"

या लढाईच्या वाटाघाटी मुळें इंग्लंडांत बरीच गडबड झाली. सर्व लोकांस वाटूं लागलें कीं फ्रेंच सरकार व्यर्थ लढाईच्या भरीस पडलें; कारण ते वेळेस त्यांची जर्मन लोकांप्रमाणें तयारी नव्हती. लढाई होऊं नये म्हणून इंग्रज सरकारानें पुष्कळ खटपट केली, परंतु व्यर्थ गेली. कारण त्यावेळेस दोन्ही पक्षांचे लोक फार निकरावर आले

होते; ह्मणून जुलै महिन्याचे १९ वे तारखेस तिऱ्हाईतपणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. याच प्रमाणें युरोप खंडांतील सर्व राजांनीं तिऱ्हाईत पणाचे जाहीरनामे प्रसिद्ध केले.

---

# भाग २ रा.

फ्रान्स आणि जर्मनी या दोन देशांत लष्करी कायदा कसा होता व त्यांच्या लष्करांचे भाग कसे होते हें सांगतों.

## फ्रान्स

प्रत्येक फ्रेंच मनुष्यास ५ वर्षें लढणाऱ्या सैन्यांत (आक्टिव आर्मी) व ४ वर्षें मदत करणारे (रिझर्व] सैन्यांत; किंवा ५ वर्षें [गार्ड) देश रक्षक सैन्यामध्यें चाकरी करावी लागते. लष्करामध्यें चाकरी करण्याची ज्याची इच्छा नसेल त्यानें बदली द्यावा किंवा ठरविलेला पैसा सरकारांत भरावा, ह्मणजे तो या कायद्या पासून मुक्त होतो. ५वर्षें लढणाऱ्या सैन्यांत चाकरी केली म्हणजे तो मदत करणाऱ्या सैन्यामधील शिपाई होतो.

देशरक्षक सैन्य यास सन १८६८ सालचे अगोदर "न्याशनल गार्ड" असें म्हणत असत, नंतर यास "मोबिल गार्ड" असें ह्मणूं लागले. हे शिपाई आपआपल्या गां-

वींच असतात. यांस ५ वर्षांत १५ वेळ कवाईत शिकवितात. यांजवळ हत्यारें देत नाहींत व यांवर पृथक सरदार हि नसतात.

तयार सैन्याचे *गार्ड,व ‡लाईन, असे दोन भाग आहेत.

---

## गार्ड

| | | |
|---|---|---|
| ३ ग्रेनिडियर रेजिमेंट | | [उंच लोकांची पलटण.] |
| १ जोन्डार्मी | ,, | [हत्यारबंदतयार लोकांची पल.] |
| ४ वोल्टेजूर | ,, | [ठेंगणे लोकांची पलट] |
| १ झू आव | ,, | [आरब लोकांप्रमाणे पोषाक घालणाऱ्यांची पलट.] |

---

ग्रेनिडियर व वोल्टेजूर यांच्या एक रेजिमेंटमध्यें ३ बटालियन.

| | | |
|---|---|---|
| १ बटालियन | = | ७ कंपनी. |
| १ कंपनी | ,, | ३ सरदार आणि ९२ शिपाई |

---

| | | |
|---|---|---|
| १ जोन्डार्मी रेजिमेंट | = | २ बटालियन. |
| १ बटालियन | ,, | ७ कंपनी. |
| १ कंपनी | ,, | ३सरदार आणि ७९शिपाई. |

---

*बादशहाचे किंवा राजाचे ताब्यांतील सैन्य.
‡सेनापतीच्या ताब्यांतील सैन्य.

१ रायफल बटालियन = १० कंपनी.
१ कंपनी ,, ३ सरदार आणि ७९ शिपाई.

एकंदर ५४० सरदार आणि १६३२६ शिपाई.

## लाईन

१०० रेजिमेंट.
२० रायफल बटालियन.
३ झु आव रेजिमेंट
३ तूर्का ,, [अलजियांतलि लोकांची।]
१ फारेन ,, [परदेशांतील लोकांची.]

१ रेजिमेंट { ३* फील्डबटालियन, १† डेपो ,, } { १ फी० ब०=७ कंपनी, १ डे० ब० = ६ ,, }

१ कंपनी = ३ सरदार आणि ११२ शिपाई.

एकंदर १०० रेजिमेंट. { फील्ड ६३०० सरदार व २३६३०० शिपाई. डेपो १८०० सरदार व ६६२०० शिपाई.

१रायफल बटा० { ६फील्ड कं० २ डेपो कं० } १ कंपनी = ३ सरदार ११२ शिपाई.

२० बटालियन { ३६० सरदार १३४४० शिपाई. डेपो १२० सरदार, ४४८० शि०

*फील्ड बा० लढणारे.
†सामानाचे रक्षण करणारे किंवा नवीन शिपायांस शिकविणारे.

१ झू आव रे० = २७ कंपनी. { २१ फी० कं = १८९स० ७०५६ शिपाई. / ६ डे. कं. = ५४ स. १९१६ शि.

१ तुर्की रे० { ४ फी० बटालियन १ ब० = ६ कं० / १ डे० „ १ ब० = ५ „

एकुंदर

फील्ड ११६ सरदार ८०६४ शिपाई.
डेपो ३६ „ १३४४ „

१ फारेन रे० { ३ फील्ड बटालियन स्न० २०१६ शि. / १ डेपो „ „ ६७२ „

## घोडे स्वार

१० रेजिमेंट कुर्सीयर. (यांजवळ तरवार आणि पिस्तुल अशीं दोन हत्यारें असतात.)

१२ „ ड्रगून (यांजवळ तरवार असते).

८ „ लान्सर (यांजवळ भाला आणि पिस्तुल अशीं दोन हत्यारें) असतात.

१२ „ मौंटेड रायफल (यांजवळ रायफल नांवाची बंदूक असते.

८ „ हुजार्स (यांजवळ तरवार असते)

| | | |
|---|---|---|
| ४ ,, | आफ्रिकन रायफल | (अफ्रिकेंतील लोकांची, याजवळ रायफल असते) |
| ३ ,, | स्पाय | (जासूद घोडे स्वार. यांजवळ काराबिन नांवाची बंदुक असते) |

१ रेजिमेंट— { ४ फील्ड स्काड्रून, १ डेपो ,, } { १ स्काड्रून = ७ सरदार १६४ शिपाई १९० घोडे

एकंदर. ३८६७५ फील्ड स्वार
१५६८५ डेपो स्वार.

## तोफखाना

१९ रेजिमेंट. १ रेजिमेंट { ६ फील्ड ब्याटरी, ४ फुट ब्याटरी } { १ ब्याटरी= ६ तोफा

१ रेजिमेंट पान्टोनियर (पुल बांधणारे)=१९ कंपनी
४ * हार्स आर्टिलरी. १ हार्स आर्टिलरी=८ ब्याटरी
२ रेजिमेंट आर्टिलरी † ट्रेन १ ट्रेन=१६ कंपनी.

## इंजिनियर.

३ रेजिमेंट. १ रेजिमेंट=२ बटालियन { १ मायनर्स, १२ सापर्स, २ टेलिग्राफ

* गाड्या वरील तोफा. † दारू गोळ्याच्या गाड्या.

फ्रेंचांनीं एकंदर या सैन्याच्या ८ कोर केल्या आहेत.

१ कोर=३ किंवा ४ भाग पायदळ, १५ किंवा २० ब्याटरी तोफा आणि १२ किंवा १६ स्काड्रून घोडे स्वार.

१ भाग=२ ब्रिगेड

१ ब्रिगेड=२ रेजिमेंट

या खेरीज प्रत्येक रेजिमेंट बरोबर एक रायफल बटालियन पायदळ असते.

---

## जर्मनी.

### जर्मन लोकांचें सैन्य तीन प्रकारचें आहे.

१ आक्टिव ( तयार सैन्य ) यांत २० पासून २७ वर्षांचे वयाचे लोक असतात.

२ ल्यांडवर ( देशरक्षक ) यांत २८ पासून ३२ वर्षांचे वयाचे लोक असतात. यांचें काम किल्ल्यांचें व देशाचें रक्षण करावयाचें आहे.

३ ल्यांड स्टरम. यांत सर्व प्रांताचे व सर्व वयाचे लोक असतात. हे किरकोळ कामागिरीचे लोक.

सर्व सैन्याच्या १३ कोर केल्या आहेत, व उत्तर जर्मनीचे १३ भाग ( प्रांत ) केले आहेत. प्रत्येक प्रांता-

ची एक कोर अशा १३ प्रांतांच्या १३ कोर केल्या आहेत यां खेरीज सर्व प्रांतांतून एक कोर सैन्य काढितात आस गार्ड कोर असें ह्मणतात.

जर्मनी मध्यें लष्करी कायदा असा आहे कीं प्रत्येक जर्मन मनुष्यास २० वर्षांचे वयापासून ते २८ वर्षांचे वय होई पर्यंत तयार सैन्यामध्यें आणि ५ वर्षें रक्षक सैन्यामध्यें काम करावें लागतें. पहिल्या ७ वर्षां पैकीं तीन वर्षें लष्करी पोषाक घालून तयार सैन्यामध्यें राहून काम शिकावें लागतें. बाकीचीं चार वर्षें घरीं राहून मदत करणाऱ्या सैन्यामध्यें घालवावीं लागतात. अशीं सात वर्षें गेलीं ह्मणजे तो रक्षक सैन्यामधील शिपाई झाला. या शिपायास गारिसनचा शिपाई ह्मणतात.

**गारिसन** सैन्य (किल्ले घेणारें व देश रक्षण करणारें सैन्य). या सैन्यास १३ वी कोर असें म्हणतात.

१ आर्मीकोर मध्यें:
- १७ बटालियन पायदळ. १ बटालियन=७००शिपाई×१७ बटालियन ×१२ कोर =१४२८००
- १रायफलकंप.=२५०शि×१२=३०००
- १२०० घोडेस्वार × १२=१४४००
- १८ तोफा× १२ =२१६
- ८००ल्यांडवरशिपाई×१२=९६००

एकंदर १५५४०० शिपाई १४४०० स्वार २१६ तोफा

## ट्रेन.

### (सामान वगैरेच्या गाड्या.)

५ प्रोविजन (अन्न सामग्री) कालं (भाग) १ कालं = ३२ गाड्या.

१ फील्ड ब्याटरी = ५ गाड्या.

१ हार्स डेपो = १७० घोडे आणि १ गाडी.

३ *सानिटरी †डिट्याचमेंट प्रत्येकांत १० गाड्या.

१ स्काड्रन = १२० घोडेस्वार.

## इंजिनियर.

१३ बटा. १ बटालियन { २ कंप० सापर्स, १ मायनर्स, १ पायनियर्स } { रेलवे, टेलिग्राफ पुल वगैरे यांची कामें करणारे.

---

## तोफखाना.

प्रत्येक कोर मध्यें १ रेजिमेंट तोफखाना असतो. असा १३ कोर मध्यें १३ रेजिमेंट तोफखाना असतो.

१ रेजिमेंट = ५ भाग { १ हार्स. ३ फुट अथवा फील्ड [पायगाडीवरील तोफांचा] १ कोलं (दारू गोळा नेणारा भाग)

---

* हवापाणी वगैरे.

† टोळी.

१ हार्स भाग = ३ ब्याटरी ४ *पौंडर्स याच्या १ बाटरी = ६ तोफा

१ फूट ,, = ४ ,, { २ ब्याटरी ६ पौंडर्स याच्या / २ ,, ४ ,,

१ कालं ,, = { ४ पायदळ कालं / ९ आर्टिलरी कालं } दारू गोळा संभाळणारे

१ रेजिमेंट मध्यें ३७३१ शिपाई (शिवाय सरदार) ३३९८ घोडे आणि ३८९ गाड्या।

१३ रेजिमेंट = ११७० तोफा.

## रिझर्व तोफखाना.

२ फुट ब्याटरी / २ हार्स. ,, } १८ तोफा × १३ = २३४ तोफा

## स्वार.

| | |
|---|---|
| १८ रेजिमेंट गार्ड† | १ रेजिमेंट = { ४ फील्ड स्क्वाड्रन / १ डेपो ,, |
| २३ ,, ड्रगून | |
| १७ ,, हुजार | १ स्क्वाड्रन = १५० स्वार |
| १९ ,, ह्युलन | एकंदर |
| ८ ,, कुर्सियर | फील्ड स्वार = ४४,४००. |
| | डेपो ,, = ११,१००. |
| | ५५,५००. |

* ४ पौंड वजनाचा गोळा ज्या तोफेंत मावतो तीस ४पौंडर्स असें ह्मणतात.

† ही सर्व स्वारांचीं नांवें आहेत.

## पायदळ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ गार्ड रेजिमेंट | १ रेजिमेंट=३ बटालियन | = | | २७ | बटालियन |
| ८८ लाईन | ,, | ,, | ,, | २६४ | ,, |
| १७ *कान्फिडरेट | ,, | ,, | ,, | ५१ | ,, |
| २ बटालियन रायफल | ,, | ,, | | २ | ,, |
| १४ ,, † प्राविन्सियल रायफल | | | | १४ | ,, |
| | | | | ३५८ | |

१ बटालियन=४ कंपनी
१ कंपनी=२५० शिपाई
एकंदर ३५८००० शिपाई.

---

## दक्षिण जर्मनींतलि संस्थानांचीं सैन्यें

### ब्वेरिया

१६ रेजिमेंट पायदळ. १ रेजिमेंट=३ बटालियन.
१० रायफल बटालियन.
१० रेजिमेंट घोडे स्वार.
४ रेजिमेंट तोफा.
१ ,, इंजिनियर

---

*उत्तर जर्मनींतील संस्थानिकांची.

†देशांतील.

## एकंदर

९८ बटालियन = ९८००० शिपाई
५० स्काड्रून = ७५०० स्वार
४ रेजिमेंट तोफा = १९२ तोफा

गारिसन
२२४०० शिपाई

---

## वर्टेंबर्ग

८ रेजिमेंट पायदळ. १ रेजिमेंट = { ३ रायफल बटालियन / २ बटालिन }

४ रेजिमेंट घोडे स्वार. १ रेजिमेंट = ४ स्काड्रून
३ फील्ड आर्टिलरी
२ कंपनी पायोनियर

एकंदर स्वार आणि पायदळ मिळून २१४०० शिपाई आणि ५४ तोफा.

गारिसन ४२०० शिपाई

---

## बेडेन

८ रेजिमेंट पायदळ. १ रेजिमेंट = २ बटालियन
३ ,, ड्रगून. १ ड्रगून = ५ स्काड्रून
९ ब्याटरी तोफा

१ भाग पायानियर
१ फील्ड ट्रेन

एकंदर
१९८०० शिपाई
५४ तोफा

## गारिसन

एकंदर ७००० लोक. आणि ७ तोफा.

जर्मन लोकांची १ कोर = १ भाग पायदळ.
१ ,, स्वार.
१६ ब्याटरी तोफा.

१ भाग पायदळ = २७ बटालियन.
१ ,, घोडेस्वार = २४ स्क्काड्रन.
१६ ब्याटरी = ९६ तोफा.

या खेरीज एक बटालियन शार्प *शूटर, एक बटालियन इंजिनियर, १ बटालियन रायफल आणि १ रेजिमेंट †फुजिलियर.

---

*नेमानें गोळी मारणारे लोक.
†एक लहानशी बंदूक आहे, ती ज्या शिपायाजवळ असते त्यास हें नांव मिळतें.

एकंदर

| पायदळ. | स्वार. | तोफा. | सरदार. |
|---|---|---|---|
| ३२,०००, | ३६००, | ९६, | ८००. |

*५ आर्टिलरी अम्युनिशन कालं } यांत २० सर. १५८३ लोक
४ †इन्फंट्री [पायदळ] ,, } १५८० घोडे २२९ गाड्या

१ ‡पांटून ट्रेन, १ §ट्रेंचिंग टूल कालं = २ सरदार, ७० लोक, ११७ घोडे, १३ गाड्या.

१ *फील्ड बेकिंगकालं, ,, †५प्रोविजन कालं, ३ सानिटरी डिस्याचमेंट.

६ फील्ड ‡ अंबुलन्स.

---

## फ्रेंच आणि जर्मन यांच्या सैन्याचा एकंदरींत विचार.

१ जर्मन लोकांच्या कायद्यानें त्यांच्या सैन्यांत चांगले

---

* तोफेचा दारू गोळा. † बंदुकीचा गोळा. ‡ पुल बांधण्याचे सामानाची. § खंदक खोदण्याचीं हत्यारें. * स्वयंपाक करणारे. † चाकरी गाड्या. ‡ अन्नसामग्री.

लोक येतात. फ्रेंच लोकांच्या कायद्यानें गरीब लोकांस जुलूम वाटतो.

२ जर्मन लोकांची प्रत्येक कोर ह्मणजे एक पृथक सैन्यच असतें. त्यांचें सामान, त्यांचा दारूगोळा, त्यांचा मोदीखाना वगैरे सर्व सामान त्यांच्याच बरोबर असतें. फ्रेंच सैन्याचे प्रत्येक कोरच्या अधिकाऱ्यास सामानाकरितां वार *मिनिस्टरास लिहावें लागतें, आणि त्याचा हुकूम मिळाल्यावर मग †स्टोअरमधून सामान मिळतें.

३ जर्मन लोकांच्या तोफा सरासरी मानानें १,००० शिपायांत ४ पडतात. याखेरीज रिझर्व मधील तोफा लढणाऱ्या सैन्याबरोबर असतात.

फ्रेंचलोकांच्या तोफा १०००शिपायांत२। पडतात. त्यांतून १२ पौंडर्सच्या तोफा सैन्याचे मागें असतात, त्या तशाच मागें राहतात. बाकीच्या ८ पौंडर्सची जर्मन लोकांच्या ८ पौंडर्स बरोबर तुलना केली तर फ्रेंचांची तोफ ३ ३‡डिग्रीवर चढविली ह्मणजे तिचा गोळा १ सेकंदांत १०६६ फुट लांब जातो आणि एक कोसावरचा नेम मारितो. जर्मन लोकांच्या तोफेचा गोळा ११८४ फुट लांब जातो आणि तीन कोसांवरचा नेम मारितो. जर्मन लोकांच्या

* लष्करी प्रधान.

† कोठी.

‡ गोळी मारण्याचें प्रमाण आहे.

तोफेचा गोळा जमिनीवर अपटून फुटतो. फ्रेंच लोकांच्या तो फेचा गोळा जातांना वाटेंत फुटतो. फ्रेंचलोकांच्या मेट्रलूस तोफा जर्मन लोकांच्या †फील्ड तोफा प्रमाणेंच आहेत; परंतु गोळा जर्मन लोकांच्या तोफेच्या गोळ्या इतका लांब जांत नाहीं व त्यांत फार जोर ही नसतो. फ्रेंचलोकांची चसोपाट बंदुक जर्मन लोकांच्या निडल बंदुकी पेक्षां चांगली आहे. चसोपाटची गोळी एक सेकंदांत १३२८ फुट लांब जाते, निडलची ९९० फुट जाते. चसोपाटचे एक मिनिटांत ११ किंवा १२ बार होतात. निडलचे ७ किंवा ८ बार होतात. फ्रेंच लोक आपल्या बंदुकीचा करावा तसा उपयोग करीत नाहींत; उगीच लवकर लवकर बार काढून जवळचा दारू गोळा संपवितात.

४. जर्मन लोकांच्या घोडे स्वारांनीं *औट पोस्ट आणि गार्ड हीं कामें फारच उत्तम केलीं. फ्रेंच घोडे स्वार फारसे उपयोगी पडले नाहींत.

५. फ्रेंच सरदारांस लष्करी विद्या शिकण्यास शाळेंत फार त्रास भोगावा लागतो. हुकूम करावा कसा आणि तो मानावा कसा याचें त्यांस तेथें चांगलें ज्ञान होत नाहीं. शिपायांमधून जे सरदार होतात ते क्याप्टनाच्या दर्जास पो-

---

†फ्रेंच लोकांच्या तोफेचा गोळा जातांना.

* हेरांचें काम (यांचें काम शत्रु कोठें आहे, त्याचा बेत काय आहे तो कोणीकडे जात आहे ही बातमी ठेवण्याचें आहे). उपहारा (यांचे काम शत्रूस अडथळा करण्याचे आहे.)

होंचें पर्यंतच पेनशनीचे दिवस येतात. असें जर्मन लोकां मध्यें नाहीं.

६. जर्मन लोकांचें सैन्य लढण्यास आल्यावर देखील मागें देशांत नवीन पलटणी तयार होत होत्या. फ्रान्स देशामध्यें लढाईस गेलेलेंच सैन्य शत्रूस भारी आहे असें समजून अधिक सैन्य तयार करण्याचें काम मागें पडलें होतें.

७. जर्मन लोकांच्या †स्टाफ कोर मधील सरदार लष्करांत चाकरी केलेले असतात या मुळे कोणता मनुष्य कोणतें काम करण्यास योग्य आहे हें त्यांस ठाऊक असतें; आणि त्याप्रमाणें ते लढाईच्या वेळेस त्याची योजना करितात. फ्रेंच लोकांच्या स्टाफ कोर मधीले सरदार लष्करांत चाकरी केलेलेच असतात परंतु त्यांस कोणत्याच कामाचें पूर्ण ज्ञान नसतें. प्रथम ते लष्करी शाळेंत शिकतात. नंतर जनरल स्टाफच्या शाळेंत शिकतात. मग परीक्षा होऊन त्यांस एकदम मोठें काम मिळतें.

८. फ्रेंच शिपायांस ७५ पौंडाचें ओझें वागवावें लागतें. सर्व फ्रेंच सरदार चैनी व ऐष अरामी होते. त्यांची चैन बाजी पाहून शिपाई ही तसेंच झाले होते. यामुळें वरिष्ट अंमलदारांच्या हुकमाची हेळसांड होत असे.

९. फ्रान्स देशांतील किल्ल्यांची चांगली तयारी केली नव्हती. फ्रेंच लोकांच्या मोदीखान्यांत सगळे लष्करी लोक असल्या मुळें त्यांस व्यापाराची माहिती नव्हती. फ्रें-

† सेनापति बरोबर असणारे सरदार.

च लोकां पेक्षां जर्मन लोकांस फ्रान्स देशाची माहिती फार उत्तम होती.

१०. रणभूमीवर आल्यानंतर फ्रेंच सरदारांनीं सामान व दारू गोळा व अन्नसामुग्री वगैरे मागण्यारितां सरकाराकडे यादी पाठविल्या.

फ्रान्स देशांत एकंदर चार लक्ष तयार सैन्य होतें. त्यांपैकीं ४०,००० अरमारावर, ५०००, इतालींत, १०,००० अलजीर्यांत, ३५,००० पारिस आणि शेलान येथें, १००० लियन्स शहरा जवळ, ३५,००० मार्सेल, बोर्डो वगैरे ठिकाणीं होतें. बाकीं राहिलेल्या सैन्यापकीं कांहीं लोक अजारी असल्यामुळें व कांहीं रजेवर असल्यामुळें वगैरे अनेक कारणांस्तव २,२५,००० सैन्य रणभूमीवर आलें त्याचा तपशील:—

| सेनापति. | छावणीची जागा. | कोर. | पायदळ. | घोडेस्वार. | तोफा. |
|---|---|---|---|---|---|
| मेक-महान | स्ट्रासवर्ग | १ली | ३५००० | ३५०० | ९० |
| डी—फेली | विचे | ५वी | २६००० | २६०० | ७२ |
| फ्रोझार्ड | सेंट आवोल्ड | २री | २६०७० | २६०० | ७२ |
| लाडमिराल्ट | थियानाविल | ४थी | २६००० | २६०० | ७२ |
| बझेन | मेट्झ् | ३री | ३५००० | ४५०० | ९० |
| बोरबकी | नान्सी | गार्ड | १६००० | ३६०० | ६० |

खालीं लिहिलेलें सैन्य जमा होत होतें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कयान रोबर्ट | शेलान | ६ वी | ३५००० | ३५०० | ९० |
| फेलिक्स डुये | बेलफर्ट | ७ वी | २६००० | २६०० | ७२ |

हें सर्व सैन्य १०३ मैल लांब अर्धचंद्राकार पसरून ठेविलें होतें. प्रत्येक कोर मध्यें बराच अंतर होता, म्हणून जर्मन लोकांस प्रत्येक कोरवर पृथक हल्ला करण्यास आयती सोय झाली.

या सर्वांवर नेपोलियन बादशहा सेनापति होता.

## जर्मन लोकांच्या सैन्याचे व्यवस्थेचा तपशील.

५७०००० रणभूमीवर आले, २००००० ऱ्हाइन आणि वेसर या दोन नद्यांचे मधील प्रांतीं ठेविलें. उत्तरे कडील समुद्र किनाऱ्यावर १,५०,००० ठेविले. आणि पूर्वेकडील सर्व किल्ल्यांत १,५०,००० ठेविलें.

रणभूमीवर आलेल्या सैन्याचे तीन भाग केले, ते येणे प्रमाणें:—

| सेनापति. | पायदळ कोर. | घोडेस्वार भाग | तोफाब्याट. |
|---|---|---|---|
| स्टीनमेट्स | ७,८,१० | ४ | ३१ |
| फ्रेड्रिक चार्लस | १,२,३,४,९,१२ | ५ | १५० |
| क्रौन प्रिन्स * | ५,६,११ या खेरीज वर्टेंबर्ग, बवेरिया आणि बेडेन येथील सैन्य. | ६ | ११० |

* मशिया देशाचे युवराज किंवा राजपुत्र.

या तिन्ही सैन्यांतील संख्या.

| | पायदळ | घोडस्वार. | तोफा. |
|---|---|---|---|
| १ लें सैन्य | ७०००० | ९६०० | १८६ |
| २ रें सैन्य | २५०००० | १२००० | ६६० |
| ३ रें सैन्य | २५०००० | १४४०० | ६६० |

ही छावणी जर्मनीचे सरहद्दीवर पाणसाळी सारखी होती। या सर्वांवर प्रशियाचा राजा आणि कौंट मोल्ट्क हे सेनापति होते.

# भाग ३

लढाईची प्रसिद्धी होण्याचे अगोदरच म्हणजे जुलैचे १७ वे तारखेस प्रशियन सैन्याच्या एका लहानशा टोळीनें व्हानेश प्रांतावर स्वारी करून लांगी खेडें घेतलें. २३ वे तारखेस खीलचा पूल पाडला. तसेंच घोडे स्वारांच्या एका टोळीनें बिचे आणि सेंट आव्होल्ड यांमधील वाटबंद पाडली; आणि लाटरबर्ग पर्यंत जाऊन वाटेंतील लोखंडी रस्ते आणि तारायंत्रे मोडून टाकलीं.

२८ वे तारखेस फ्रेंच बादशाहा मेट्स शहरीं आला

आणिं खालीं लिहिलेला जाहीरनामा सैन्यांत प्रसिद्ध केला.

" फ्रेंच शिपाई व सरदारहो, आपली व आपल्या देशाची अब्रू राखण्या करितां मी सेनापतित्व पतकरलें आहे. तुह्मांस युरोप खंडांतील अति उत्तम सैन्यांशीं युद्ध करावयाचें आहे. असल्या सैन्याशीं तुम्हीं पुष्कळ वेळ युद्ध केलें आहे, व जयही मिळविला आहे. तुम्हीं अफ्रिका, क्रिमिया, चीन, इताली वगैरे अन्य देशीं आपलें शौर्य दाखविलें आहे. असे यश तुम्हीं परदेशांत परक्या साठीं संपादिलें; आणि अतां तर तुमच्या देशासाठींच तुम्हांस लढायाचें आहे. स्वदेशासाठीं फ्रेंच लोक काय कहर करतील याचा नेम नाहीं असें लोक म्हणत आहेत, तर तें म्हणणें खरें करा. जितका जितका मुलूख तुम्ही आपल्या सरहद्दीच्या पलीकडे काबीज कराल, तेथें तेथें तुमच्या पुर्वजांचीं पावलें तुमच्या दृष्टीस पडतील; त्यांचेच आपण वंशज आहों असें दाखवा. फ्रेंच लोकांचें आणि सर्व जगाचें लक्ष तुह्मांकडेस लागलें आहे. फ्रान्स देशाचें स्वातंत्र्य तुम्हांवर अवलंबून आहे. आतां आपलें कर्तव्य करण्यास चुकूं नका. सैन्याचा परमेश्वर तुम्हां बरोबर असो." तारीख २८ जुलै सन १८७० मेटझ.

(सही) नेपोलियन.

---

प्रशिया देशचा राजा जुलैचे ३१ वे तारखेस रणभूमी-वर येण्यास निघाला. त्याने जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

" कांहीं कारण नसतां एकाएकीं जर्मन लोकांशीं लढण्यास फ्रेंच तयार झाले आहेत, तर आतां आपणांस आपल्या जन्मभूमीची अब्रू राखणें योग्य आहे. एक झालेल्या जर्मन सैन्याचें सेनापतित्व मला मिळालें, याचा मला मोठा आनंद झाला आहे. तुमचा अभिमान व उत्साह पाहून माझी खात्री होते कीं, तुह्मांस निःसंशय जय मिळेल."

आगस्टचे ४ थे तारखेस जर्मन सैन्याची पूर्ण व्यवस्था झाली आणि ३ ऱ्या भागच्या सैन्यानें विसेंबर्गवर हल्ला करावा असा हुकूम झाला. तेवेळेस प्रशियाचे युवराजानें आपल्या सैन्याशीं भाषण केलें तें:—

" सरदार व शिपाई—तुमचें शौर्य आणि धैर्य पाहून जर्मनी देशाची अब्रू राखण्याकरितां ही लढाई आरंभिली आहे. आपल्या देशाच्या कायद्याप्रमाणें मी तुह्मांबरोबर लढाईंत मरावें ह्मणून मला तुमचा सेनापति नेमिलें आहे. आपण मागें एक दोन लढाया केल्या परंतु शत्रु मनासारखा नव्हता. आतां तुह्मां योग्य शत्रु आहे. एका जन्मभूमीचीं लेकरें आपल्या देशाची अब्रू राखण्यास्तव एकत्र झालेलीं पाहून मला मोठा आनंद झाला आहे. आतां देवाचें नांव घ्या आणि पुढें चाल करा."

फ्रेंच बादशहाचा मूळचा बेत असा होता कीं ऱ्हाइन नदी उतरून बेडेन प्रांतांत जावें, ह्मणजे उत्तर आणि दक्षि-

ण जर्मनी निराळी होईल, मग इतालीयन आणि आस्त्रियन या लोकांचें सहाय घेण्यास बरें पडेल. परंतु तो जेव्हां रणभूमीवर आला तेव्हां त्यास दिसलें कीं, आपल्या बेता प्रमाणें घडणें कठीण आहे. कारण सैन्य थोडें, यांत त्यांच्या बंदोबस्तांत, कवायतींत, व अधिकाऱ्यांच्या नेमणुकींत पुष्कळ अव्यवस्था होती. आह्मी अजिंक्य आहों, या गर्वावरच फ्रेंच लोक गेले. शत्रूचें सैन्य किती आहे आपलें सैन्य किती आहे इकडे देखील त्यांनीं लक्ष दिलें नाहीं. हें सर्व पाहून नेपोलियन बादशहास वाटलें कीं आपण लढाईची प्रसिद्धी करून फसलों. आतां हातचा बार गेला, जें होणें असेल तें होईल. फ्रेंच लोकांनीं सरहद्दीवर दिलेली छावणीच मुळीं गैर होती. कारण त्यांच्या डावेबाजूस बेलजम व लक्झेंबर्ग आणि उजवे बाजूस स्वित्सर्लंद हे देश आहेत- यामुळें त्यांस डावीकडे किंवा उजवीकडे सरकण्यास जागा नव्हती. पुढें चढाई करून जावें तर शेलान, स्ट्रासबर्ग आणि बेलफर्ट येथील सैन्यें लवकर उपयोगी पडलीं नसतीं. कारण सेंट आवोल्ड याच्या मागचे बाजूस ६ दिवसांचे वाटेवर शेलान आहे व याचे उजवे बाजूस २८ मैलांवर स्ट्रासबर्ग आणि याचे उजवे बाजूस ८० मैलांवर बेल्फर्ट आहे.

अगस्टचे २रे तारखेस नेपोलियन बादशहानें आपल्या २ऱ्या कोरच्या सैन्यास उत्तेजन देऊन सारब्रक गांवावर हल्ला करून प्रथम लढाईस आरंभ केला.

प्रशियाचे राजपुत्रास विसेंबर्गवर हल्ला करण्याचा हुकूम

मिळाल्यावर त्यानें आपल्या सैन्याच्या ४ टोळ्या केल्या. त्यांतील १ ली विसेंबर्गावर पाठविली, २ री त्या शहरच्या डावे बाजूस, ३ री लाटर नदीच्या डावे किनाऱ्यावर पाठविली. आणि ४ थी सर्वांच्या मागें मदती करितां ठेविली.

अशा बंदोबस्तानें जेव्हां जर्मन लोक फ्रान्स देशांत शिरले तेव्हां फ्रेंच सरदारांचे डोळे उघडले; आणि त्यांस वाटलें कीं, असल्या सैन्यापुढें आपला टिकाव लागणें फार कठीण आहे.

प्रशियाचे राजपुत्राची स्वारी आपणांवर आहे हें पाहून मेकमहानानें ८०००शिपाई देऊन अबेलडुये यास लाटर नदीवर विसेंबर्गचें रक्षण करण्यास पाठविलें, आणि आपण बाकीचें सैन्य घेऊन हेगेनाऊकडे गेला.

अबेल डुये यानें विसेंबर्गच्या दक्षिणेस पाऊण मैलावर गिसबर्ग टेंकडीवर तळ दिला. त्यावर एकाएकीं शत्रूनें तिहींकडून हल्ला केला. शहराचें रक्षण करण्या करितां फ्रेंच शिपाई फार निकरानें लढले, परंतु एवढ्या मोठ्या सैन्याचे माऱ्या पुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. ३ तास लढाई झाल्यावर फ्रेंचलोकांची पळापळ झाली. या लढाईंत जर्मन लोकांचे ८०० शिपाई आणि ७६ सरदार पडले. ही लढाई आगस्टचे ४ थे तारखेस झाली.

या लढाईंत फ्रेंचलोकांचे ८४वे पलटणीचे लोक इतक्या शौर्यानें लढले कीं त्यांपैकीं १४ शिपाई मात्र शत्रूच्या हातीं जिवंत लागले. तेदेखील शस्त्र हातांत असतांना हातीं लाग-

ले नाहींत. त्यांजवळील दारू गोळा संपल्यावर ते नुसत्या संगिनीनें लढले. त्या मोडल्यावर उलट्या बंदुका धरून मारीत होते, त्याही मोडल्यावर मल्लयुद्धास त्यांनीं आरंभ केला, त्यांत मात्र त्यांचा पराभव झाला, कारण शरीरानें जर्मन लोक फ्रेंचलोकांपेक्षां सदृढ आहेत.

अबेल डुये यास पराभव झाल्याचें फार दुःख झाल्यामुळें एकटाच शत्रूवर चालून गेला आणि मरण पावला.

विसेंबर्गवर पाठविलेल्या सैन्याचा पराभव झाला, हें वर्तमान मेकमहानास कळतांच त्यानें आपलें व डी.–फेलीचें सैन्य एकत्र करण्याची मसलत केली; परंतु डी.–फेलीकडे गेले असतां अलसेस प्रांत सहज शत्रूच्या हातीं लागेल असें मनांत आणून पहिला बेत रहित केला, आणि त्यासच आपलेकडे बोलाविलें. त्यावेळेस मेकमहानाचे सैन्याचा मधला भाग सौरनदीच्या कांठीं वूर्थ येथें होता, डावा भाग फ्रोश बुइलर जवळ आणि उजवा मार्स–ब्रान जवळ होता.

विसेंबर्ग जवळ फ्रेंच लोकांच पराभव केल्यावर प्रशियाचे राजपुत्रानें आपलें सैन्य पुढें चालविलें. १ला भाग लायो गेन् सुलझ ब्यांक येथें, २रा गनूस्टेट येथें, ३ रा सूरबर्गन् येथें ५ वे तारखेस आला. ६ वे तारखेस याची व मेकमहानची लढाई सुरू झाली. ही लढाई संध्याकाळचे चार वाजें पर्यंत चालली होती. या ठिकाणीं फ्रेंच फारच उत्तम रीतीनें लढले. त्यांजवळ अन्नसामग्री नव्हती व दारू गोळ्याचा लवकरच तोटा पडला. ही लढाई एकसारखी १५ तास चालली होती, आणितितका वेळ मेकमहान

घोड्यावर होता. यामुळें तो अगदी थकला आणि अचेतन होऊन एका खड्ड्यांत पडला. त्यास एका शिपायानें पाणी पाजून उठविलें. नंतर त्यानें आपल्या सैन्यास मागें फिरण्याचा हुकूम दिला, आणि त्यावर्न गांवाकडे बाकी राहिलेलें सैन्य घेऊन गेला. या लढाईत ६,००० फ्रेंच शिपाई मेले आणि ४,००० शत्रूनें पाडाव केले. जर्मन लोकांचे १४,१०० शिपाई पडले.

त्यावर्न येथें मेकमहाननें भाषण केलें ते :-

"शिपाई बहादर,—तारीख ६ रोजीं तुम्हीं आपल्या शौर्याची कमाल केली. १९ तास मोठ्या धैर्यानें लढल्यावर निरुपाय होऊन तुम्हीं आपली जागा सोडली. तुम्ही ३५,००० होता आणि शत्रू १,४०,००० होते. अशी लढाई करणें यासच शौर्य ह्मणतात. ही लढाई जिंकल्यानें जी शत्रूची कीर्ति होईल त्यापेक्षांही अधिक तुमची कीर्ति होईल. फ्रोशवुइलरची लढाई फ्रेंच मोठ्या शौर्यानें लढले एवढें तरी इतिहासांत निःसंशय येईल. पराजय झाला यांत कांहीं नवल नाहीं. तुमचा जरी नाश झाला तरी तुह्मांपेक्षां शत्रूचा अधिक नाश झाला आहे. शत्रूनें तुमचा पाठलाग केला नाहीं, कारण तुह्मीं त्यास फार जर जर केलें. हें वर्तमान ऐकून बादशहास फार आनंद झाला. अशा रीतीनें फ्रान्स देशाची अब्रू राखली हें ऐकून सर्व देश तुमची वहावा करीत आहे व उपकार मानीत आहे. पराभव झाला ह्मणून खेद करूं नका. पुनः सैन्याची

तयारी चालली आहे. ईश्वर कृपेनें आपण याचा लवकरच सूड घेऊं. धैर्य व धीर असूं द्या ह्मणजे झालें."

दुसरे कोरचे सेनापति **जनरल फ्रोझार्ड** यास वाटलें कीं, अबेलडुये प्रमाणें आपल्या सैन्यावर शत्रूचा हल्ला होईल ह्मणून तो आपलें सैन्य घेऊन मागें फरत असतां स्पिचरेन जवळ शत्रूच्या १ल्या सैन्यानें त्यास गांठलें. या लढाईंत जर्मन लोक फ्रेंचलोकांचें तिप्पट होते. येथें उभय सैन्यानें आपलें शौर्य एकमेकांस फार चांगलें दाखविलें. संध्याकाळचे७वाजण्याचे सुमारास फ्रेंचलोकांनीं पळ काढला. या ठिकाणीं दोन्ही पक्षांचा सारखाच नाश झाला. या लढाईस फोर ब्याकची लढाई असेंही म्हणतात.

अशा प्रकारें फेंचलोकांचे १ ले व २ रे कोरचा जर्मन लोकांनीं पराभव केला.

---

# भाग ४.

या दोन कोरचा पराभव झाल्याची बातमी पारिस शहरच्या लोकांस कोणींच कळविली नाहीं. म्हणून शहरवासी हजारो लोक आलीवर प्रधानाच्या घराजवळ खरी बातमी घेण्या करितां जमले. तेथें त्यांस पराभव झाल्याची गुणगुण लागली. तेणेंकरून शहरांत फारच गोंधळ झाला. वर्तमान पत्रांतून नाना प्रकारचे मजकूर येऊं लाग-

ले. आतां लवकरच पारिस शहरावर शत्रु येईल असें लोकांस वाटूं लागलें.

आलविर प्रधानानें अगस्टचे ९ वे तारखेस पार्लमेंट सभा भरविली आणि त्यांत भाषण केलें तें:—

'बादशहानें सांगितलें आहे कीं कारण पडेल तर *राणी सभाभरवील, परंतु आज मीं तुह्मांस राणीच्या परवानगी खेरीज मध्यंतरीच बोलावणें केलें आहे. कारण कोणतें ही संकट येण्याचे अगोदर तें निवारण करण्याची तजवीज करून ठेवावी हें बरें. (इतक्यांत कांहीं सभासद बोलले कीं संकट आलें आहे आणि येणार आहे असें काय बोलतां)

**अर्गो**०—आम्हांस सध्यांचे अधिकारी नकोत ते नसले ह्मणजे आमचे सैन्यास जय मिळेल. मग आमचा कितीही नाश झाला तरी तो आम्हांस कबूल आहे.

**मांटपेरोक्स**०—फ्रेंच शिपाई शूर आहेत खरें, परंतु वरिष्ट अधिकारी गाढव आहेत.

**जुल्स फाव्र**—आतां या प्रधान मंडळीस सभे मध्यें येण्यास लाज कशी वाटत नाहीं.

अशी गडबड झाल्या मुळें **आलविर** वगैरे प्रधान मंडळीनीं राजीनामे दिले. त्यांचे जाग्यावर **कौंट आफ पालिकौ** वगैरे लोकांस नेमिलें. त्या मंडळीस "मिनिस्ट्री † आफ

---

* नेपोलियन बादशहाची बायको. इचें नांव युगेनाय आहे.

† देश संरक्षक राज मंडळी.

न्याशनल डिफेन्स" असें नांव दिलें. यांनीं सर्व फ्रान्स देशांत हुकूम फरमाविला तोः—

१. मातिल गार्ड यांच्या यादींत नांव नाहीं असल्या २५ पासून ३५ पर्यंत वयाच्या लोकांनीं छावणीच्या जागीं हजर व्हावें.

२. जहाजावरील व परदेशांतल्या फ्रेंच सैन्यानें परत फ्रान्स देशांत यावें.

या शिवाय शिपायांच्या कुटुंबांचे रक्षण करण्या करितां एक कोटी रुपये कर्ज काढलें. अशा प्रकारें हळू हळूं तयारी चालविली.

या वेळेस पारिस शहरामध्यें राणीनें जाहीर नामा प्रसिद्ध केला तोः—

" फ्रेंच लोकांनो, आरंभींच ही लढाई आपणांस प्रतिकूळ झाली आहे. आपला वरचेवर पराभव होत आहे. आतां आपणांस निश्चयानें वागून आपल्या सैन्याची उस्तवारी केली पाहिजे. सर्व एक होऊन आपल्या देशाचा सांभाळ करा. मी प्रामाणिकपणानें आणि विश्वासानें आपलें काम करीन. जेथें जेथें संकट येईल व फ्रान्स देशाची अब्रू राखण्याची वेळ येईल तेथें तेथें मी पुढारी होत जाईन. सर्वांनीं आपल्या दर्जाप्रमाणें रहावें. एकमतानें व निश्चयानें वागावें. आतां जर तुम्हीं आपसांमध्यें भांडून घोटाळा कराल तर तुमचा नाश होईल हें लक्षांत आणा!!

(सही) युजेनाथ.

**भालीवर** वगैरे राजमंडळीस पदभ्रष्ट करून त्यांचे जागीं "मिनिस्ट्री आफ न्याशनल डिफेन्स" नांवाची मंडळी स्थापन केली; हें ऐकून बादशहानें सेनापतीच्या कामाचा राजीनामा देऊन **मार्शल बेझेन** यास अगष्टचे ९ वे तारखेस सेनापति नेमलें.

फ्रेंच लोकांचा तीन ठिकाणीं पराभव झाल्यामुळें सर्वच सैन्य सरहद्द सोडून मागें सरलें. एक मोठी लढाई करावी असा बेत करून **मार्शल बेझेन** यानें मेट्स किल्ल्याजवळ सर्व सैन्य गोळा केलें यांत **मेकमहान**च्या आणि **फेलिक्स डुये**च्या आणि **क्यान-रोबर्ट**च्या सैन्यास मात्र तेथें येण्यास सवड मिळाली नाहीं. कारण मेटस किल्ल्याच्या आणि त्यांच्या मध्यें शत्रूचें सैन्य आलें होतें.

मेट्स जवळ जमलेल्या फ्रेंच सैन्यास तेथेंच कोंडून टाकावें म्हणून प्रशियाचे राजानें आपले सैन्यांतील १ लें आणि २ रें सैन्य मेटस शहरावर नेलें. त्यांत १ ल्या नंबरचें सैन्य त्या शहरच्या खालच्या बाजूस उतरलें; आणि दुसऱ्या नंबरचें सैन्य वरच्या बाजूस उतरलें. ३ ऱ्या नंबरचे युवराजाच्या सैन्यापैकीं बेडेन देशाचें सैन्य आणि कांहीं ल्यांडव्हरचीं पलटनें जनरल **व्हरडर** याच्या हाताखालीं देऊन त्यास स्ट्रासबर्ग शहरावर पाठविलें. बाकीचें सैन्य मेट्स शहरावर येत असतां, शेलान शहराकडील बातमी लागली ह्मणून त्या सैन्यास अडथळा करण्याकरितां पाठविलें.

**नेपोलियन** बादशहा १३ वे तारखेस मेट्स शहर सोडून

निघाला. ते वेळीं त्यानें भाषण केलें तें:—

"उद्यां अगष्टची १४ वी तारीख आहे. याच दिवशीं इतालीदेशांत जय मिळवून आपण पारिस शहरीं परत आलों. तुमचें शौर्य पाहून सर्व युरोप खंडांतील लोक दिपून गेले आहेत. शिपाईगिरी आणि खरें शौर्य तुह्मांतच आहे असा दिगंतरी झेंडा लागला आहे. याचा अभिमान धरा. आपल्या देशाची अब्रू राखा. वडिलांचे मुखास काळिमा लावूं नका. फ्रांस देशावर स्वारी करण्याचें मनांत आणून लाखों सैन्य घेऊन जर्मन लोक चढाई करून आले आहेत.. ज्या प्राशियन लोकांस आज एवढा गर्व झाला आहे, त्याच प्राशियन लोकांचा जेना येथें तुमच्या वडिलांनीं पराभव केला. मान्ट मिरल येथें तर सहापट प्राशियन लोक अधिक होते तरी देखील त्यांचा तुम्हीं पराभव केला. जर तुमच्या वडिलांप्रमाणें तुह्मांस आपल्या देशाचा अभिमान असेल तर तसें करून सर्व फ्रेंच शिपायांस उदाहरण दाखवा. ही मोठी आणिबाणीची वेळ आहे. त्यांवर चढून जा. तुमच्या कीर्तीस योग्य अशी वर्तणूक करा. साक्सनी, वर्टेम्बर्ग, व ऱ्होनिश प्रांतांतील लोक यांस प्राशियन लोकांकरितां व्यर्थ मेलों असें वाटूं द्या. वरचस्व मिळविण्याचे बुद्धीनें ते आंधळे झाले आहेत. "विनाश कालें विपरीत बुद्धि" या ह्मणीप्रमाणें त्यांस झालें आहे. मोठ्या निकराची लढाई केल्याशिवाय तुमची व तुमच्या देशाची अब्रू राहणार नाहीं. मारा नाहींतर मरा तरच तुमची अब्रू राहील. सर्व जगानें पहावा म्हणण्यासारखी लढाई करा. यावत् जन्मांत तुम्ही आपल्या दे-

श.शीं बेइमान झाला नाहीं. तर आतां तो दोष लावून घेऊं नका. नामर्द लोक जिवंत असले तरी मेल्याप्रमाणेंच आहेत हें ध्यानांत धरा."

**मेकमहान** त्यावर्न येथें परत आला असें मागें सांगितलेंच आहे. तेथून तो नान्सीस गेला आणि १६ वे तारखेस शेलान येथें जाऊन पोहोंला. त्याच दिवशीं **फेलिक्सडुये** हाही तेथें येऊन पोहोंचला. १७ वे तारखेस बादशहा तेथें आला. तेथें जमलेले सरदार,—

**१ नेपोलियन, २ मेकमहान, ३ जनरल ट्रोशू, ४ फेलिक्सडुये, ५ क्यानरोबर्ट.**

या सर्वांची मसलत ठरली ती,—

१ शेलान जवळ जमलेल्या सैन्याचें अधिपत्य **मेकमहान** यानें पतकरावें आणि पारिस शहरचें रक्षण करण्यास जावें. याबरोबर बादशहानें असावें.

२. जनरल ट्रोशूनें पारिस जवळ सैन्य जमवून त्याचें अधिपत्य पतकरावें या खेरीज त्या शहरच्या गवरनराचें काम करावें.

हें वरील वर्तमान पारिस शहरीं कळतांच तेथील राजमंडळीनें निरोप पाठविला कीं बादशहा व **मेकमहान** यांनीं पारिस शहराकडे येऊं नये. जर येतील तर फार घोटाळा होईल. या खेरीज येथें शहरचें रक्षण करण्यास पुष्कळ सैन्य जमलें आहे. याकरितां तुम्हीं मेट्स शहराकडे जाऊन **मार्शल बेझेन** यास सोडवावें.

हा निरोप **मेकमहानास** अगदीं आवडला नाहीं. कारण त्याचा बेत होता कीं पारिस शहराजवळ शत्रूस येण्यास कसातरी एक महिना पाहिजे. तेवढ्या वेळांत हें जमलेलें सैन्य उत्तम तयार होईल. आणि दुसरें सैन्यही तयार करण्यास फुरसत सांपडेल. परंतु नाइलाज झाल्यामुळें त्यास मेट्स किल्ल्याकडे जाणें भाग पडलें.

मेट्स किल्ल्याजवळ सैन्य जमलें तें:—

१. दुसरे कोर मधील राहिलेलें सैन्य, ३री, ४ थी आणि ५ वी कोर आणि सगळे गार्ड. हे एकंदर सैन्य सुमारें १,९०,००० होतें.

शेलान जवळ जमलेलें सैन्य.

१ ल्या कोर मधील १६,००० लोक, ६ वी, ७ वी, ८ वी, १२वी कोर, आणि १२००० घोडेस्वार होते. हें एकंदर सैन्य १,२०,००० होतें.

फ्रान्स देशांत जर्मन लोक शिरल्यावर त्यांनीं जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

**नेपोलियन** बादशहानें जमिनीवरून आणि समुद्रावरून जर्मनीवर हल्ला केला व तेथील स्वस्थता मोडली ह्मणून आम्हांस फ्रान्स देशावर स्वारी करणें भाग पडलें. जे समरंगणांत आह्मां पुढे येतील त्यांशींच आह्मी लढूं. शहरांतील बाया बापड्यांस कोणत्याही प्रकारचा उपद्रव व इजा आह्मी देणार नाहीं. त्यांनीं अगदीं भिऊं नये, का-

डीभर देखील, आह्मी गैरशिस्त जाणार नाहीं. वरकड व्यापाराच्या सर्व गोष्टी रिती प्रमाणें करूं. अन्याय करणार नाहीं ! !

शेलानच्या सैन्यास अडथळा करण्यारितां पाठविलेल्या जर्मन सैन्यानें वाटेंत टूल, लिचें बर्ग, फाल्स बर्ग, विचे वगैरे शहरांस वेढे घातले, आणि १६ वे तारखेस नान्सी शहर घेतलें. या खेरीज कित्येक गावें घेतलीं, कांहीं लुटलीं, व कांहीं जाळलीं. पुरुषांस व बायकांस फारच त्रास दिला. असा अनेक प्रकारचा कहर त्यांनीं फ्रान्स देशांत केला.

फ्रेडिक चार्लस राजपुत्राचें सैन्य मेट्स शहराच्या वरचे बाजूस उतरलें होतें, तें पुढें सरकत सरकत मोठ्या बंदोबस्तानें व्हियानवील व मार्स ला. टूर या गांवापर्यंत जाऊन पोहोंचलें, आणि व्हरडूनकडे जाण्याचा रस्ता अडविला. १ल्या नंबरच्या सैन्यानें दक्षिणेकडील रस्ता अडविला. याची व फ्रेंच लोकांची १४वे तारखेस बोर्नीखेड्याजवळ लढाई झाली. तेथें फ्रेंच लोक पराभव पावले. उत्तरेकडील रस्ता प्रशियन लोकांच्या घोडेस्वारांनीं अडविला.

अशा रीतीनें शत्रू आपणांस कोंडील असें बेझेन यास वाटलें नाहीं ह्मणून त्यानें फार आळसत काम चालविलें होतें. शत्रूचें सैन्य जवळ आलें हें पाहून व्हरडून गांवाकडे जाण्याचा रस्ता आपल्या ताब्यांत ठेवण्याकरितां जनरल फ्रोझार्ड यास तिकडे पाठविलें. त्याचे मदतीस बोरबकी यास पाठविलें. याची व्हियानव्हील व मार्स-ला-टूर या गांवाजवळ शत्रूशीं हातघाईवर येईपर्यंत लढाई झाली

येथें १७,००० जर्मन आणि १६,००० फ्रेंच शिपाई पडले, यांत ह्मणण्यासारखा कोणासच जय मिळाला नाहीं. यानंतर बेझेन यानें शत्रूच्या वेढ्यांतून बाहेर पडण्याची गडबड केली नाहीं. कारण येथून जर सैन्यासुद्धां बाहेर पडावें तर तेथील किल्ला सहज आणि लवकर जर्मन लोकांच्या हातीं लागतां, आणि मग दोन्हीं सैन्यें पाठलाग करण्यास तयारच रहातीं.

आतां ब्राई—लांग्युआन कडील रस्ता आपल्या ताब्यांत ठेवावा येवढेंच बेझेनच्या मनांत होतें, कारण मेकमहान आपल्या मदतीस आल्याची बातमी त्यास कळली होती. याप्रमाणें १८ वे तारखेस मासेपासून स्यांकोंट पर्यंत मजबूद जागा पाहून सैन्य पसरून ठेवलें उजवीकडे लाड मि. राल्ट आणि डो फैली यांचीं सैन्यें, डावीकडे फ्रोसार्ड आणि लुबो यांचें सैन्य ठेवलें. बोरबकी याचें सैन्य सर्वांस मदत करण्यास ठेवलें होतें. बाकीचें सैन्य मध्यें होतें. या दिवशीं ग्यावीलोट जवळ चांगलीच लढाई झाली ह्मणून या लढाईस ग्यावेइलोटची, किंवा प्रशिया देशाचा राजा रेझानवील येथें होता म्हणून रेझानवीलची लढाई म्हणतात. या दिवशीं जर्मन लोकांचे ५५० सरदार व १४००० शिपाई पडले. फ्रेंचांचा ही इतकाच नाश झाला असावा; परंतु फ्रेंचांचे उजवे बाजूचें सैन्य मागें सरल्या मुळें १९वे तारखेस सर्वच सैन्य मागें हटावें लागलें. नंतर बेझेन यानें मेट्स किल्ल्याच्या भोंवताले लांगवील—लेस—मेट्स पासून ते वाइपी गांवा पर्यंत क्वापर्वाल आणि सेंट क्विंटिन या दोन किल्ल्यांचे आश्रयानें सैन्य ठेवलें.

**बेझेन** हा सैन्यासुद्धां मेट्स किल्ल्याजवळ कोंडला गेला. हे जर्मन लोकांनीं पाहून शरण येईपर्यंत त्यास तेथेंच कोंडून ठेवावें, म्हणून १ ले सैन्यांतील कांहीं सैन्य व सगळें दुसरें सैन्य यांस तें काम सांगितलें. नंतर जर्मनींतून आणखी सैन्य आणवून ४ थे नंबरचें सैन्य तयार केलें. त्यावर साक्सनी देशाच्या राजपुत्रास सेनापति नेमिलें. त्यास युवराजाच्या सैन्याबरोबर **मेकमहानास** आडविण्यास पाठविलें.

आगस्टच्या २२ वे तारखेस **मेकमहान** शेलान येथील छावणी सोडून निघाला. तो हळू हळू २८ वे तारखेस मीझन जवळ जाऊन पोहोंचला.

**मेकमहान बेझेन** यास सोडविण्यास येत आहे ही बातमी प्रशियाचे राजास २५ वे तारखेस कळली; तेव्हां त्यानें ३ रे व ४ थे सैन्यास त्यास पुढें न येऊं देण्याचा हुकूम दिला. २८ वे तारखेस नोआर्ट जवळ जर्मन लोकांच्या ४६ वे ब्रिगेडची व फ्रेंचांचे एक टोळीची गांठ पडून लढाई झाली, त्यांत फ्रेंच लोक पराभव पावले. ही लढाई झाल्यावर जर्मन लोकांस वाटलें कीं, **मेकमहानास** मेट्स शहराकडे जाण्यास रस्ता न मिळाला व पराभव होईल असें त्यास वाटलें तर तो बेलजम देशाचा आश्रा करील. याकरितां मेट्स शहरच्या जवळ येण्याचे अगोदरच त्यास लढाई करण्यास लावावें. असा बेत करून जर्मन लोकांनी आपलें सैन्य २९ वे तारखेस बोमांट जवळ आणलें. तेथें **फेलिक्स डुये** याचें सैन्य होतें त्यांवर हल्ला करून त्यास पिटाळून लाविलें.

जर्मन लोकांचा बेत समजून मेकमहान यानें पारिस सरकारास सांगून पाठविलें कीं तेथें जें सैन्य जमलें असेल तें र्‍हीम्स शहराजवळ पाठवा म्हणजे आमच्या उपयोगीं पडेल. तें सैन्य तेथें येण्याचें अगोदरच जर्मन लोकांच्या ६ व्या कोरीनें तो रस्ता अडविला. ४ थ्या नंबरच्या सैन्यानें म्युस नदी आणि बेल्जम या मधील रस्ता बंद पाडला. त्या नदीच्या डावे बाजूस जें फ्रेंच सैन्य होतें त्यास हकून दिलें, आणि उत्तरे कडचाही रस्ता रोखून धरला. ३ ऱ्या नंबरच्या सैन्यानें बाकीचे रस्ते धरले. अशा प्रकारें मार्शलास म्यूसनदी आणि बेल्जम यांमध्यें अडाविलें.

आपणां भोंवती जर्मन लोकांचा वेढा पडला हें पाहून मेकमहान यानें ७वी कोर पूर्वेस, १२ वी दक्षिणेस, १ ली पश्चिमेस, ६वी उत्तरेस आणि ८वी मध्यावर सर्वांस मदत करण्यास ठेवली. हा सर्व बंदोबस्त अगष्टचे ३०वे तारखेस झाला.

सेप्टेंबरचे १ले तारखेस बेझेलीस खेड्या जवळ लढाईस आरंभ झाला. प्रथम जर्मन लोकांनीं तें खेडें घेतलें. त्यांस फ्रेंचांनीं माघारे फिरविलें. पुन्हा जर्मन लोक गांवात शिरले. ते वेळेस घरोघर व रस्तोरस्तीं लढाई सुरू झाली. त्यावेळेस दोन्ही कडच्या तोफा बंद होत्या, कारण दोन्हीं सैन्यें अगदीं मिसळलीं होतीं, व शिपाई संगिनीनें लढत होते, अशी लढाई सकाळचे १० वाजे पर्यंत झाली. याच लढाईंत मेकमहान जखमी झाला. त्यानें सेनापतीचा अधिकार जनरल डुक्रो यास देऊन आपण निघून गेला. डुक्रो यानें सर्व

सैन्यास बेलजमकडे वळण्याचा हुकूम दिला. इतक्यांत सेनापतीचा अधिकार जनरल उइम्फन यास मिळाला. यानें पहिला हुकूम रद्द करून पुनः लढाई चालविली. संध्याकाळचे सुमारास त्यास वाटलें कीं, आपला पराभव होणार तेव्हां त्यानें बादशहास सांगितलें कीं, तुम्ही कारिग्नानकडे निघून जा. परंतु आतां जर्मन लोकांच्या वेढ्यांतून पार पडणें अशक्य आहे, हें पाहून बादशहानें त्यास बरोबर येण्यास सांगितलें. नंतर ते उभयतां कांहीं सैन्य घेऊन कारिग्नानच्या बाजूस गेले. तिकडे शत्रूचें सैन्य होतेंच. या वेळेस उभय पक्षांकडील तोफांचा असा मारा झाला कीं, तेणेंकरून दोन्हीं सैन्यांस आपले लोक ओळखूं येईनात अगदीं अंधळ्याप्रमाणें झाले, सर्वत्रमय धूर होऊन गेला. जर्मन लोकांस वरचेवर कुमक आल्यामुळें फ्रेंचांचा पराभव झाला; आणि ते सेडन गांवाकडे पळाले. पश्चिमेस डुक्रो यानेंही चांगली लढाई केली, परंतु त्यासही मागें सरावें लागलें. युद्धाचा शेवट सर्वांस दिसूं लागला; परंतु सहज शत्रूस जय मिळूं नये म्हणून फ्रेंचांची प्रत्येक फौज मनापासून लढत होती. या येवढ्या सैन्याचा पराभव केल्यास फ्रेंच शरण येतील व तह करतील असें समजून जर्मन लोकांचे सर्व मोठमोठाले सरदार व प्रशियाचा राजाही तेथें आला होता; व तेही मनापासून लढत होते. संध्याकाळचे ५ वाजेपर्यंत लढाई चालली होती. फ्रेंच लोक मागें सरत सरत शेवटीं संध्याकाळच्या सुमारास सेडन गावांत शिरले. तें गांव जळण्यास अगोदरच आरंभ झाला होता. हे इतके लोक एकदम गावांत शिरल्यामुळें

घोर दाटी झाली. त्यांत अंधारी रात्र होती. या सर्व कारणामुळें एकच गोंधळ होऊन गेला.

आतां हें पराभव पावलेलें सैन्य कदाचित् बेल्जम देशांत पळून जाईल असें कौंट **बिसमार्क** यास वाटल्यामुळें त्यानें खालीं लिहिलेला जाहीरनामा प्रसिद्ध केला.

"बेल्जम देशाचे सरहद्दींत जर कोणी फ्रेंच शिपाई जाईल तर लागलीच त्याची हत्यारें तेथील सरकारानें घ्यावीं जर तें सरकार असें न करील किंवा असें करण्याचें सामर्थ्य त्याचें अंगांत नसेल तर आह्मी आपलें सैन्य त्या शिपायाच्या मागें पाठवूं व बेल्जम * न्यूट्रालीटि फ्रेंच लोकांनीं मोडली असें समजूं."

इकडे सेडन गावांत बादशाहानें आपला एक लहानसा सरदार शरण आल्यावरच्या शरती पुसण्याकरितां जर्मन सैन्याचे सेनापतीकडे पाठविला. त्यावेळेस प्रशियाचा राजा व **कौंट-मोल्टक्** यानीं विचार करून त्यास जाब दिला कीं हें काम मोठें महत्वाचें आहे तर कोणी तरी मोठा मनुष्य आला पाहिजे, व तुम्ही परत जाऊन सेडन येथील गवरनरास सांगा कीं एक तासाचे आंत येऊन आम्हांस भेटा, नाहीं तर आम्ही गांव घेण्याचे प्रयत्नास लागूं

बादशहानें आपले मोठाले सरदार गोळाकरून त्यांस सांगितलें कीं, आतां लढण्याचें किंवा येथून सुटून जाण्याचें कांहींच साधन राहिलें नाहीं, तर आतां काय करावें? असा विचार करतां बहुतेकांचे मतें ठरलें कीं, शरण जावें मग एक

---

* तिऱ्हाइतपणा.

कागद तयार करून त्यावर सर्वांस सह्या करण्यास सांगितलें. त्यांत † जनरल उइम्फन कांहीं केल्या सही करीना. तो ह्मणाला कीं बाकी राहिलेलें सैन्य घेऊन मी एकटा च शत्रूशीं लढाई करीन आणि मरेन परंतु शरण जाण्याचे कागदावर हा जीव तरी काय पण मेल्यावर देखिल सही करणार नाहीं. मग बादशहानें या प्रांताचा नकाशा आणून त्यास दाखविला. तेव्हां त्याची खातरी झाली कीं, आतां गांवाबाहेर निघणें म्हणजे मरण आहे. अशा अनेक कारणांमुळें त्यानें मोठ्या दुःखानें सही केली आणि ह्मणाला "अरेरे व्यर्थ माझा जन्म!!! मला धिःकार असो!!! फ्रेंच होऊन मी शरण जात आहे. आतां मला नेहमीं हाच शरण गेलेला सरदार असें ह्मणतील व असेंच इतिहासांतही लिहितील. बरें असो!!! "कर्मणोगहनो गति!!"

एक तास झाला तरी सेडन येथून कोणी येत नाहीं हें पाहून प्रशियाच्या राजानें आपला सरदार करनल ब्रोसार्ट यास फ्रेंच सैन्याचे सेनापती कडे पाठविलें. तो गांवांत गेल्यावर लोकांनीं त्यास बादशहाचे पुढें नेऊन उभे केलें. त्यानें त्यास जनरल उइंफन याकडे पाठविलें. कारण तो ते वेळेस सेनापति होता. नंतर बादशहानें आपला आडजुटंट जनरल याजवळ पत्र देऊन त्यास प्रशियाच्या राजाकडे पाठविलें. तो रात्रीच्या ७ वाजतां तेथे जाऊन पोहोचला. ते वेळेस जर्मन लोकांस बातमी

---

† या सरदारास विनाकारण काळिमा लागला, कारण त्यास अल्जीर्यातून येऊन पुरते २४ तास ही झाले नव्हते.

लागलें की, नेपोलियन बादशहा सेडन येथें आहे. प्रशि-याचे राजानें पत्र उघडून पाहिलें त्यांतील मजकूरः—

"महाराज,

मी रणभूमीवर पडावें परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. आतां मीं आपली तरवार तुमचे चरणाजवळ ठेवली आहे. आपण वाटेल तसें करावें. सुरी मान आपले हातांत दिली आहे."

याच वेळेस प्रशियाच्या राजानें सेनापति मोल्ट्क यास बादशहाशीं बोलणें करण्याचा अधिकार दिला. आणि नेपोलियनास उत्तर पाठविलें तें:—"तुह्मांवर आलेला प्रसंग पाहून मला फार दुःख वाटतें. आतां तुह्मा-कडील एक मोठा सरदार शरण आल्यावरच्या शरती ठरवि-ण्यास पाठवा. मीं जनरल मोल्ट्क यास बोलणें कर-ण्याला अधिकार दिला आहे."

कौंट मोल्ट्क व जनरल उइंफन यांचें बोलणें होऊन तारीख २ सप्टेंबर रोजीं शरतीं ठरल्या त्याः—

१. फ्रेंच शिपायांनीं पराजित झाल्या मुळें पाडाव केले-ले शिपाई अहोंत असें समजावें, व लढाई संपे पर्यंत जर्म-न लोक ठेवतील तेथें रहावें.

२. मोठ मोठ्या सरदारांनीं ही लढाई संपे पर्यंत जर्मन लोकांवर हत्यार धरणार नाहीं, व त्या देशाच्या गैर फाय-द्याचें कांहीं करणार नाहीं, असें लिहून द्यावें.

३. सेडनचा किल्ला रिकामा करून द्यावा. सर्व हत्या

रें व झेंडे जर्मन लोकांच्या स्वाधीन करावे.

४. मुख्य डाक्तरानें जखमी शिपायांचे व्यवस्थे करितां येथे रहावें.

५. बादशहानें कैदी अहों असे समजावें.

या लढाईत जर्मन लोकांनीं आपल्या दुष्टपणाची पराकाष्टा केली. बेझेलीस खेड्याजवळ फ्रेंच लोकांची व बव्हेरियन लोकांच्या सैन्यांची लढाई झाली. त्यांत बव्हेरियन लोकांची फार दशा झाली. तो सूड उगविण्या करितां त्यांनीं या खेड्यास आग लावून दिली, आणि सर्व गांवकऱ्यास जिवंतच जाळलें. जखमी झालेल्या शिपायांची तर फारच दशा केली. कित्येक बायकांची अब्रू घेतली, कित्येकांस नागवे करून प्रसिद्ध ठिकाणीं बांधून टाकले होते. जे रोगी व अशक्त होते त्यांस कापून टाकलें. मुलांस माडीवरून खालीं व खालून वर फेकावें. त्या गांवीं २,००० लोकांची वस्ती होती त्यांतील ५० लोक वांचले.

सप्टेंबरचे २ रे तारखेस सकाळीं बादशहानें शहराभोंवतीं पाहिलें, तों जिकडे तिकडे उभयपक्षांच्या शिपायांचीं प्रेतें जागोजाग पडलीं होतीं. ठिकठिकाणीं मोडक्या तरवारी, बंदुकी, भाले, तोसदानें, पट्टे, तोफा वगैरे सामानाचे ढीग पडले होते. शहराभोंवतालची जागा दारू मुळें काळी भोर दिसत होती. जागोजाग रक्ताचीं थारळीं सांचलीं होतीं. कित्येक शिपायांस अन्न न मिळाल्यामुळें मेलेल्या घोड्याचें मांस खात होते. कित्येक कण्हत होते

गांवांतही कित्येक लोक मेले, कित्येकांचीं घरें पडलीं, कित्येकांचीं घरें जळत होतीं. आजूबाजूचीं खेडीं जळत होतीं तींही दिसत होतीं. हजारों फ्रेंच लोक मेल्यामुळें चोहोंकडे हाहाकार झाला होता. जागजागचीं इस्पितळें, देवळें, व धर्मशाळा हीं जखमी लोकांनीं भरून गेलीं होतीं हा आकांत पाहून बादशहाचे आंगावर रोमांच उभे राहिले. या खेरीज जिकडे तिकडे जर्मन लोकांच्या सैन्याखेरीज कांहीं दिसत नव्हतें. आजूबाजूच्या टेकड्यांवर जर्मन लोकांच्या तोफा होत्या. पटांगणांत पल्टणीवर पल्टणी लढाईस तयार करून उभ्या केल्या होत्या हीं सर्व शहरावर हल्ला होण्याचीं चिन्हें पाहून स्वतः बादशहानें प्रशियाचे राजाची भेट घेण्याचा निश्चय करून गाडींत बसून निघाला. डानशेरी जवळ त्याची व कौंट बिस्मार्क याची गांठ पडली आणि बोलणें झालें तें:—

बादशहा०—शरण आल्याचे शरतींत कांहीं कमी करा.

बिस्मार्क०—हें काम माझें नाहीं. हें सेनापति मोल्टक याचें काम आहे. तुमचे मनांत तहकरावयाचा आहे काय?

बा०— तें माझे हातीं नाहीं. सरकार पारिस शहरीं आहे. त्यावर राणी मुख्य आहे. मी आतां कैदी आहे. माझे हातीं कांहींच अधिकार नाहीं. आमच्या सैन्यास बेल्जुमांत जाऊं द्या; तेथील राजा त्यांची हत्यारें घेईल.

बि०—सेनापति माल्टक यास विचारा.

सकाळचे ८ वाजण्याचे सुमारास राजाची व बाद

शहाची भेट झाली. या भेटींत बादशहानें मागून घेतलें कीं आतां मला सैन्यामधून व फ्रान्स देशांतून जर्मनींत पाठवूं नका. या प्रमाणें त्यास बेलजम सरकारची परवानगी घेऊन बेलजम दशांतून पाठविलें त्यांस रहाण्याची जागा वुइल्मशो नेमली. तेथें तो तारीख ४ मेसेंबर रोजीं जाऊन पोहोंचला.

शरण आल्याचे कागदावर सही केल्यानंतर जनरल उइंफन यानें आपले सैन्याशीं भाषण केलें तें :—

"काल तुम्हीं फार मोठ्या सैन्याशीं लढाई केली. सर्व दिवसभर मोठ्या शौर्यानें शत्रूस अडवून धरलें होतें. तुह्मांजवळील दारू गोळा सरला व तुम्हीं श्रमानें व्याकूळ झाल्यावर मीं तुह्मांस मागे फिरण्याचा हुकूम दिला. मार्शल बेझेन याच्या सैन्यास मिळण्या करितां तुम्हीं खटपट केली, परंतु नाइलाजामुळें परत आला. धान्य व दारूगोळा संपला तेव्हां शहराचें किंवा आपलें रंक्षण करणें मोठ्या मुषकिलीची गोष्ट आहे. हें पाहून मीं शत्रूशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें. मीं तुमची अब्रू राहण्या सारखी बरीच व्यवस्था केली आहे. आपणां जवळ आतां दारू गोळ्या पासून ते सर्व गोष्टीचा आभाव आहे. तर व्यर्थ मरावें या पेक्षां शत्रूच्या स्वाधीन व्हावें हें बरें. कारण पुढें मागें तरी आपण जिवंत असलों तर आपल्या देशाच्य उपयोगीं पडूं."

२ रे तारखेस सर्व फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या स्वाधीन झाले. या लढाईंत फ्रेंचांचा नाश झाला तो:—

८३००० शिपाई शरण गेले. १८००० शिपाई मेले व जखमी झाले.

४००० सरदार ,, ,, १५००० बेलजम देशांत पळून गेले.

८७०००  ३३०००

१२००००

४०० फील्ड तोफा  १५० किल्ले घेण्याच्या तोफा
७० मेट्रॅलूस  १०००० घोडे

या खेरीज दुसरें पुष्कळ सामान जर्मन लोकांच्या हातीं लागलें. फक्त त्या सैन्यांतून जनरल डुक्रो मात्र भिकाऱ्याचें सोंग घेऊन पळून आला.

## भाग ६

फ्रांस देशांत हल्लीं चार फळ्या आहेत, ह्मणजे सन १८३० ह्या वर्षी जो राजा पदभ्रष्ट केला त्याच्या वंशजांची फळी, व सन १८४८ मध्यें जो राजा पदभ्रष्ट केला त्याच्या वंशजांची फळी, व बोनापार्टाच्या घराण्यांतले पुरुष ह्यांची फळी, आणि रिपुब्लिकन लोकांची एक फळी अशा चार फळ्या राज्यावर वारसा सांगणाऱ्या आहेत.

राज मंडळीस पदभ्रष्ट करून त्याचे जागी मिनि-स्ट्री 'आफ न्याशनल डिफेन्स' स्थापन केली असे सांगितलेच आहे. ही मंडळी बोनापोर्टीच्या तर्फेची होती.

जनरल ट्रॉशूस पारिस शहराच्या गवरनराचा अधिकार मिळाल्यावर त्याने जाहिरनामा प्रसिद्ध केला तो :—

"देश बांधवांनो—अशा संकट समयीं मला पारिस शहराचे गवरनर आणि सेनापति असे दोन अधिकार दिले आहेत. या शहरावर लवकरच शत्रू येईल त्याशीं मोठ्या लढया कराव्या लागतील. तुमच्या शौर्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. कारण मी तुह्मां मध्यें पुष्कळ दिवस काम केलें आहे. अतां सर्वांनीं नीट रीतीनें वागावें. गडबड करूंनये. अशा वेळेस जर तुम्ही निश्चयानें आणि एकी-च्यानें वागाल तरच या लढाईचा परिणाम चांगला होईल घरगुती तंटे किंवा आपल्या पक्षाचा आग्रह आतां मनांत आणूं नका. सर्वांनीं आपल्या देशाची यथा शक्ति चाकरी करावी. मोठेपणा मिळवावा म्हणून मीं हे काम पत्करलें नाहीं, परंतु देशाचें रक्षण करण्याकरितां हे काम पत्करलें आहे. जगास तुमचें शौर्य दाखविण्याची वेळ आली आहे अशी वेळ पुन्हा येणार नाहीं. माझें तुह्मांपाशीं मागणें आहे कीं, सर्वांनीं आपापल्या दर्जा प्रमाणें रहावें, आणि आपल्या वरिष्ट अधिकाऱ्यांचा हुकूम नीटपणें मानावा."

पारिसनवळ सैन्य जमलें तें,—

१२ वी कोर तयार होती. १२,००० जहाजावरील

शिपाई, ९,००० जकातीकडील शिपाई, १,००,००० मारिल गार्ड आणि २,००,००० सेडेन्टरी न्याशनल गार्ड असे एकंदर ४,००,००० लोक जमले.

२८ वे तारखेस परदेशस्थ लोकांस शहर सोडून जाण्यास सांगितलें.

अशा प्रकारें हळूं हळूं तयारी चालली असतां सेप्टेंबरचे ३ रे तारखेस सेडन कडील बातमी कळली. ते दिवशीं शहरांत फारच गोंधळ झाला. ३ वाजतां राजसभा भरली ते वेळेस भाषणें झालीं तीं;—

पालिकौ०—सेडन जवळ आपला पराभव झाला अशी बातमी उठली आहे आणि मलाही कळलें आहे कीं, तेथें फ्रेंच लोकांनीं फार उत्तम लढाई केली.

फाव्र०—एकंदरीत शत्रूची गांठ पडली तेथें फ्रेंच शिपाई उत्तम प्रकारें लढले. बेझेननें आपल्या भोंवतालच्या शत्रूचा वेढा उठविण्यास चांगली लढाई केली. त्याला सोडविण्याकरितां गेलेला सरदार कमी पराक्रमी होता काय? परंतु जय म्हणून कोठेंच मिळाला नाहीं याचें कारण यांस स्वतंत्र हुकूम चालविण्याचा अधिकार नव्हता म्हणून असें झालें. बादशाही राखण्या करितां आपणाकडून झाला तितका आपण प्रयत्न केला. बादशाहाचे आपण आरंदीं अंकित होतों; परंतु बादशहानें आपली कांहीं तरी काळजी केली आहे काय? आपल्या रक्षणाची कांहीं तजवीज करून ठेविली आहे

काय ? कांहीं तरी वर्तमान पाठवितो काय? कांहीं हुकूम तरी पाठवितो काय? कांहींच जर करीत नाहीं तर बादशाही राज्यच नाहीं असें समजलें पाहिजे. तुह्मांमध्यें जर कांहीं ज्ञान असेल, देशाभिमान असेल तर तुमच्या सहज लक्षांत येईल कीं, आतां सर्व लोकांस आपला देश रक्षण करण्यास लावावें हें बरें. मी अतां फार बोलत नाहीं, परंतु येवढेंच सांगतो कीं अतां फ्रान्स देशांत सरकार नाहीं.

*शिनडर.——सरकारचा पक्ष संभाळावा हें आमचें काम आहे. त्यांत अशा प्रसंगीं देशांस दुर्बलता आणण्या सारखें जर कोणीं बोलेल तर——

(इतक्यांत फाब्र उठून बोलतो.)

फा०——मीं सांगितलें यानें दुर्बलता येत नाहीं पण प्रबळता येते. ज्यांनीं फ्रांन्स देशास संकटांत घातलें आहे, त्यावर अतां विश्वास न ठेवतां फ्रेंच लोकांनीं स्वतंत्र व्हावें हें उत्तम आहे. असें झाल्यास प्रत्येक मनुष्यास आपलें रक्षण करण्याची काळजी लागेल आणि सर्व देश शत्रूवर उठेल. लढाई करण्यास एक उत्तम सेनापति पाहिजे तर तसला मनुष्य आहेच. आणि तो सर्वांस प्रियकर ही आहे. सर्वांचे जागीं त्यानें असावें. सर्व राजसत्ता नाहींशी करावी. हाच उपाय आहे दुसरा उपाय नाहीं.

* मिनिस्ट्री आफ न्याशनल डिफेन्स मधील मनुष्य.

(इतके झाल्यावर सभा उठली.)

इतक्यांत सेडन जवळील सैन्य शत्रूस शरण गेलें आणि बादशहा कैद झाला हें वर्तमान आलें. ४ थे तारखेस रात्रीं एक वाजतां सभा भरली. तेवेळेस सभासदांचें बोलणें झालें तें:—

फा०—१ नेपोलियन बादशहास पदच्यूत करावें.

२ न्याशनल डिफेन्स कमेटी नेमावी, आणि तिनें शत्रूस देशांतून घालविण्याचा होईल तितका प्रयत्न करावा.

३ जनरल ट्रोशूस पारिस शहरचे गवरनर आणि सेनापति नेमावें.

*पिनार्ड०—पदभ्रष्ट करण्याचा अधिकार आपणास नाहीं. (नंतर सभा बंद झाली) तेच दिवशीं सकाळीं पालिकौ यानें शहरांत जाहीर नामा लाविला तोः— "फ्रेंच लोकांनो, मोठा नाश झाला. सेडन नवळ मेकमहान जखमी झाला आणि सर्व सैन्य शत्रूस शरण गेलें. असें झालें म्हणून धैर्य सोडूं नका, हात पाय गाळूं नका. पारिस शहरचें रक्षण करण्यास सैन्य तयार आहे. त्म्वार नदीच्या कांठीं दुसरें सैन्य तयार होत आहे. तुमचा अभिमान. तुमचें ऐक्य तुमचा उत्साह देशास मुक्त करील, बादशहा कैद झाला तरी चिंता नाहीं त्याचे नागीं राणी आहे."

* मिस्टर आफ न्याशनल डिफेन्स मधील मनुष्य.

एक वाजतां पुन्हा सभा भरली. तेवेळेस खालीं लिहिलेलीं कलमें तूर्त अमलांत आणावीं असा राणीनें हुकुम दिला. तीं कलमें:—

१ न्याशनल डिफेन्स कमेटी ९मनुष्यांची असावी

२ यांनीं काय कामें करायाचीं हें सध्याचे प्रधानांनीं त्यांस सांगावें.

३ पालिको यास पारिस शहरचे गवरनर जनरल नेमले आहे.

यावर फाव्र यानें सांगितलें कीं मागें सांगितलेल्या कलमांचा अधि विचार व्हावा. मग एम्. थीर्स बोलले कीं दोन्ही पक्षांच्या लोकांची एक कमेटी नेमावी, आणि यांनीं सध्यांची स्थिति लक्षांत आणून कारभार करावा.

यावेळेस एका गृहस्थानें भाषण केलें तें:—

"गरीब विचारा फ्रान्सदेश ! ! बादशाही राज्य असणें शांतीस कारण आहे असें कित्येक लोकांनीं सांगितलें म्हणून फ्रेंच लोकांनीं नेपोलियनास बादशहा केलें. नंतर त्याच लोकांनीं सांगितलें कीं बादशाही राज्य हेंच कीर्ति व जय आहे. या पासून चांगले तह होतील, सरहद्द वाढेल, राष्ट्र समर्थ होईल. पुढें यांनींच सांगितलें कीं फायदा करितां लढाई करा, आणि तेणें करून कीर्ति वाढेल. जें जें सांगत गेले त्या त्यावर फ्रेंच लोकांनीं विश्वास ठेविला आणि याप्रमाणें फ्रेंच लोक वागत गेले केवढा फ्रेंच लोकांचा उदय झाला पहा ! ! आज असे

झाले कीं, बादशाही राज्य याचा अर्थ पराभव व अज्ञानी सरदार. बादशाही ह्मणजे देशावर शत्रूची स्वारी.- बादशाही होती म्हणूनच ८ दिवसांत ४ प्रांत शत्रूच्या हातीं लागले. हर हर!! फ्रेंच लोकहो, तुमची अशी दशा व्हावी ना!! तुमचे प्रांत ज्या शत्रूनें उध्वस्त केले तो शत्रू आतां देशांतून कसा जाईल याचा विचार तुह्मांस पडावा काय? काय तुमची थोरवी. जर हें कृत्य तुमचे वाडवडील जिवंत होऊन पाहतील तर त्यांस किती दुःख होईल बरें!! तुमची एक बोटभर जमीन शत्रूच्या हातीं जाण्याचे वेळेसच तुमचे प्राण जाते तर बरें होतें. हे जन्म जननी क्षमा कर. हाय, हाय, हे वीर माये तुला शत्रूनें अशा वेळेसच गांठावें काय? आणि तुला रक्षण कर्ते नसल्याप्रमाणें तूं उगीच शत्रूच्या हातीं जावेंस काय? तुझ्या पृष्ठभागावर शत्रू विजयी होऊन उभा असतां त्याशीं समेट करण्याचा विचार तुझ्या पुत्रांनीं करावा काय! असले पुत्र असण्यापेक्षां निपुत्री असतीस तरी बरें होतें. जन्म माते तुझी जयश्री, तुझी कीर्ति, तुझी अब्रू, तुझें शौर्य तुझ्या पूर्व पुत्रांबरोबरच गेलें काय? आणि आतां आम्ही तुझ्या पोटीं कुलांगार निपजलोंना. असो परमेश्वराची इच्छा!!!

इतक्यांत जागोजागचे न्याशनल गार्ड एकत्र होऊन बादशहास पदभ्रष्ट केलें, लोकसत्तात्मक राज्य झालें. असें ओरडत रस्तो रस्तीं फिरूं लागले. त्यांनीं शहरांतील सर्व राजाचिन्हें मोडून टाकलीं. या वेळेस राणीस तें शहर सोडून जाणें भाग पडलें. ती इंग्लंड देशास निघून गेली.

या सर्व कारणामुळें प्राव्हिजनल[१] गव्हरमेंट आणि न्याशनल डिफेन्स नांवाचें सरकार स्थापन करावें लागलें. यांत खालीं लिहिलेले मनुष्यांची योजना झाली.

ट्रोशू ............गवरनर* आणि प्रेसिडेंट.
फाव्रे.... ..........फारिन †मिनिस्टर.
ग्यांबट ........ ..इन्टीरियर‡ आणि वार मिनिस्टर.
फ्लोरिकन ........मराईन§ मिनिस्टर.
क्रेमो...............मिनिस्टर¶ आफ जास्टिस.
पिकार्ड ........ ...फायनान्स$ मिनिस्टर.
सायमन ...........मिनिस्टर‖ आफ पाब्लिक इन्स्त्रकशन
माग्नेन ...........मिनिस्टर *आफ अग्रिकल्चर आणि ट्रेड.
केरोट्री ...........प्रिफेक्ट" आफ पोलिस.

पाहिल्यापासून यां सर्वांचें म्हणणें लढाई न करावी असे होतें. कारभार हातीं आल्यावर ही त्यांनीं बंदकरण्याची खटपट चालवली परंतु जर्मन लोक अलसेस आणि लारेन हे दोन प्रांत मागूं लागल्यामुळें त्यांस लढाई चालविणे भाग पडलें.

याच समयास शहरांत एक जाहीरनामा लागला होता तो:—

---

१ हंगामी किंवा तूर्त काम चालविणारे सरकार.

* कारभारी आणि अध्यक्ष. † देशाचा कारभार पाहणारा. ‡ लष्करी आणि स्वदेशाचा प्रधान. § आरमाराकडील प्रधान. ¶ न्यायाधीश. $ जमाखर्च वगैरे हिशोब ठेवणारा. ‖ विद्याखात्याचा प्रधान *शेतकी आणि व्यापार यांचा प्रधान. " पोलिसाचा गवरनर म्हणजे कारभारी.

फ्रेंच लोकहो—फ्रान्स देश संकटांत असतां त्याचें रक्षण करण्यास मागें पुढें पहाणारी राज मंडळी पदभ्रष्ट केली आहे. सर्व लोकांच्या इच्छे प्रमाणें लोक सत्तात्मक राज्य स्थापन केलें आहे. अतां आपल्या शहरांचे रक्षण करा आणि शत्रूस फ्रान्स देशांतून हांकून द्या."

या वेळेस ग्याबट यानें भाषण केलें तें:—

"देशावर अशा प्रकारचें संकट आलें असतां त्याचा कारभार हातांत घेणें ह्मणजे विकत श्राद्ध घेऊन सव्य अपसव्य करणें आहे. परंतु स्वदेश रक्षणार्थ आह्मी तें पतकरतों. सेप्टेंबरचे ४ थे तारखेस फ्रेंच लोक जागे झाले ह्मणण्यास हरकत नाहीं. हा तुमचा आनंद पाहून सन १७९२ मधील *रिवोल्यूशनाचें स्मरण होतें. आतां फ्रेंच लोकांनीं आमचें सहाय करा. आपल्या देशाचें रक्षण करण्यास झटा. नाश होईल ह्मणून भिऊं नका. आज तुमचीं स्थिर मनें पाहून असें वाटतें कीं, सर्वांनीं शत्रूचा पराभव करण्याचा निश्चय केला आहे. सर्व कामांमध्यें एकमेकांचें सहाय करा, बंद केलेले कायदे, नवीं हत्यारें वगैरे न करण्याचे अडथळे सर्व नाहींसे केले आहेत. प्रत्येक मनुष्यानें तरवार किंवा बंदूक घेऊन लष्करी सरदाराकडे जावें आणि आपलें नांव लष्करांत दाखल करावें. कारण फ्रान्स देश संकटांत आहे. आपआपसांतील तंटे मिटवा. अचाट श्रम आणि एकत्र मेहनत केल्या शिवाय आपण संकटांतून मुक्त होणार नाहीं. आपल्या दे-

---

*राज्य सुधारण्याची गडबड.

शत्रू पासून सोडवा. फ्रान्स देशाच्या सुपुत्रांच्या अभिमानामुळें देश संकटांतून मुक्त झाला! अशी सर्व जगतीवर कीर्ति करा."

पारीस जवळ जमलेले सैन्य पाहिल्यावर ट्रोशूनें भाषण केलें तें:—

कधीं शिपायाचें काम केलें नाहीं असे चारलक्ष गृहस्थ देशाचें व स्वतंत्रतेचें रक्षण करण्यास तयार झालेलें कधीं कोणीं पाहिलेंही नसेल व ऐकलेंही नसेल. जो शत्रु पारीस शहरावर चालून येत आहे त्यानें जर हें ऐकलें तर त्यास वाटेल कीं पराभव झाल्यामुळें थोडे दिवसांत जो फ्रेंच लोकांस आवेश आला आहे, असा आवेश शेकडो वर्षे दुसऱ्या प्रकारचा अपमान केला असतां तर आला नसतां. देश रक्षणार्थ प्राणांची आहुती देण्यास जसे शिपाई तयार झाले आहेत, असेंच जर सर्व लोकांचें ऐक्य होईल तर तुह्मांस कधींच शत्रूपासून कांहीं होणार नाहीं. पारिस शहरचें रक्षण करण्यास किल्ले आहेतच, त्यांचे मागें कच्ची तटबंदी आहे. त्याचे मागें शहरचा तट आहे. निश्चयानें आपलें काम करण्यास तयार असा. बंदुकी, तोफा, तरवारी वगैरे हत्यारांची तयारी चालली आहे. परमेश्वरावर विश्वास ठेवा. पूर्वजांचे कीर्तीस अनुसरून वागा."

अशा रीतीची फ्रान्स देशांत राज्य व्यवस्था झाल्यावर ज्युलस फाव्र यांनीं खालीं लिहिलेला जाहीरनामा प्रसिद्ध केला.

"पारिस शहरच्या लोकांनीं आपल्या स्वस्थते करितां जगास मान्य अशी राजव्यवस्था केली आहे. फ्रान्स देशाचा नाश करण्यास उद्युक्त झालेल्या अन्यायी सरकारा बरोबर मरावें अशी लोकांची इच्छा नाहीं जर आतांच्या राजमंडळीचें बोलणें तेवेळेस बादशहानें ऐकिलें असतें तर अशी फ्रान्स देशाची दशा झाली नसती. सेनापति जर आपलें काम बरोबर करीत नाहीं तर त्याचा अधिकार घ्यावा राजा आपल्या मूर्खपणानें देशाची स्वस्थता घालवितो तर त्यास पदभ्रष्ट करावें त्याप्रमाणें आज फ्रेंच लोकांनीं केलें आहे. बादशहानें फ्रेंच लोकांस मोठा काळिमा लाविला.

प्रशियाचे राजानें प्रसिद्ध केलें आहे कीं आह्मी फ्रेंच बादशहाशीं लढतो आतां तो बादशहा पदभ्रष्ट झाला आहे तर जर्मन लोकांनीं लढाई बंद करून आपल्या देशास परत जावें. व्यर्थ आपल्या व दुसऱ्याच्या लोकांचा नाश करूं नये. जर फ्रेंच लोकांशींच विनाकारण लढावें असें जर्मन लोकांच्या मनांत असेल तर त्यांनीं तसें सांगावें. आम्ही ही गोष्ट युरोपांतील सर्व राजां पुढें ठेवूं आमच्या मध्यें जीव आहे तो पर्यंत आम्ही लढूं, व आपले मुलखां. तील एक पाऊल जमीन किंवा एक धोंडा देखील शत्रूस घेऊं देणार नाहीं. फ्रेंच लोकांस जिकावें असेंच जर मनांत असेल तर आज सर्व फ्रान्स देशांतील बायका पोरें सुद्धां लढाईस तयार आहेत. हें जर कारण नसेल तर हल्लीं जी लढाई चालू आहे ही आह्मांस नाकबूल आहे. आह्मी शांतता असावी अशीं इच्छा करितों."

या नंतर फ्रान्स देशांतील एका सभेनें जर्मनी देशांतील *सोसियल डिमाक्रसी सभेस खालीं लिहिल्या प्रमाणें विनंती पत्र लिहीलें.

"तुमच्या सरकारानीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं आह्मी बादशहा बरोबर लढतों, फ्रेंच लोकां बरोबर लढत नाहीं. आमची आपणास विनंती आहे कीं, आतां आपलें सैन्य परत न्या. जर न न्याल तर आमचे देशांत एक मनुष्य जिवंत राहीपर्यंत लढूं. तुमच्या व आमच्या रक्ताच्या नद्या व मांसाचा चिखल करून टाकूं. सन १७९२ मधील जाहीरनाम्यावरून तुह्मांस माहित आहे कीं, शत्रु जर फ्रेंचां चे मुलखांत राहील तर फ्रेंच लोक कोणत्याही प्रकारचा तह करणार नाहींत. तर तुम्ही आपलें सैन्य ऱ्हाईन नदीच्या पलीकडे न्या, ह्मणजे तुह्मी जे कांहीं अपराध केले असती ल ते आह्मी गिळून टाकूं.

यास कौंट बिस्मार्क यानें उत्तर दिलें तें:—

"नेपोलियन बादशहा आमचे हातीं सांपडला, तेवेळेस त्यानें आह्मांस सांगितलें कीं पारिस सरकारांत राणी मुख्य आहे. यावरून उघड दिसतें कीं फ्रान्स देशांत अजून राज्य आहे. मग तें राज्य बादशहाचे नांवानें चालो कीं राणीचे नांवानें चालो. राणीस या गृहस्थांनीं पळवून न्याशनल डिफेन्स नांवाचें सरकार स्थापन केलें आहे. असा गोंधळ आहे तर आम्हीं कोणाशीं कोणाच्या द्वारें

* सार्वजनिक सभा.

तह करावा. हे लोक लढण्याची तयारी करीत आहेत, परंतु व्यर्थ प्राणास मुकतील. बाल्टिक समुद्रांतील आरमार बादशहाचे हुकुमाचें आहे. मेट्स येथील सैन्यावरचा अधिकारी मार्शल बॅझेन अजून बादशहाचा हुकूम मानितो. जर आम्हीं त्यास लष्करासुद्धां तेथून सोडूं तर कदाचित् तो पुनः पूर्वी प्रमाणें राज्यव्यवस्था करील. या नवीन सरकार ह्मणविणाऱ्या गृहस्थांपेक्षां त्याची योग्यता अधिक आहे. तथापि आम्हीं आपल्या तहाच्या शर्थती सांगतों. आम्हीं आपलें राज्य वाढवावें या हेतूनें लढाई करीत नाहीं. परंतु जर्मन भाषा बोलणारे प्रांत फ्रेंचांचे ताब्यांत असणें मोठी शरमेची गोष्ट आहे; तर ते आम्हीं आपले प्रांत घेऊं. कांहींना कांहीं कुरापत काढून जर्मन लोकांशीं लढावें, असें फ्रेंच लोकांनीं १२ वेळ केलें आहे. तर तसें फ्रेंच लोक पुनः न करतील अशी तजवीज केल्या शिवाय आम्हीं राहणार नाहीं. सरहद्दीवरचा चांगला चांगला बंदोबस्त करूं."

शत्रु पारिस शहराजवळ येऊन भिडला होता तरी देखील आंत झोटिंग बादशाही चालू होती. ज्यानें उठावें त्यानें एक नवीनच नांव घेऊन त्याची द्वाही फिरवावी. कोणीं बोरबनच्याराजाचें नांव, कोणी आर्लिनच्या राजाचें नांव घ्यावें, असा एकच गोंधळ होऊन गेला होता. त्यांत लोकसत्तात्मक राज्य असावें ह्मणणारे लोक पुष्कळ होते ह्मणून त्यांचीच शेवटी सरशी झाली हें मागें सांगितलेंच आहे. यावेळेस विक्टर ह्युगो यानें भाषण केलें तें:—

" देशबांधव हो, आज आपल्या देशावर केवढें संकट आलें आहे. आपली स्वतंत्रता जाऊन परतंत्र होण्याची वेळ आली आहे. आपणांमध्यें आपल्या देशाचें रक्षण करण्याचें सामर्थ्य नाहीं, असा दोष लागण्याचा प्रसंग आला आहे. आतां इकडे तिकडे पाहूं नका. कोठून मदत येण्याची वाट पहात आहां काय? तुम्हां सारख्या शूर शिपायांनीं मदतीची इच्छा करावीना!! अरेरे!! कायरे हे दिवस आले. सरदारहो असें करूं नका. तुमचा प्रिय देश तुमच्या डोळ्या समक्ष शत्रूनें हस्तगत करावा आणि तुम्ही स्वस्थ बसावें, हें किती भागूबाईचें काम आहे बरें!! उठा, तयारीस लागा. अशी तयारी करा कीं शत्रूनें एक पाऊल पुढें टाकणें म्हणजे त्यास वाटावें कीं आपण मृत्यूच्या मुखांत उडी घालीत आहों कीं काय? डोंगर, नद्या, रस्ते, घरें, भिंती कीलें या रूपानें फ्रेंच लोक उभे आहेत ते आतां आम्हावर तुटून पडतील, व आम्हांस मारतील. असें जर्मन लोकांस भय वाटूं द्या. फ्रान्स देशाच्या जमिनींतून विस्तवाच्या ज्वाळा निघत आहेत कीं काय असें त्यांस वाटवा. गवतावर जर पाय दिला तर त्यांस वाटावें कीं हा विस्तव पसरून ठेवला आहे. त्यांस कोंडा, भाजून काढा, तोडा, मारा, ही वेळ एकमेकांच्या तोंडाकडे पहायाची नाहीं. उठा, त्यावर चालून जा. त्याचा रस्ता कुंठित करा त्यांच्या येण्याच्या वाटेवरील पूल पाडा. रस्ते मोडा, जमीन उगवून द्या. निर्जीव पदार्थ सजीव झाले कीं काय असें वाटवा. फ्रान्स म्हणजे मृत्यूचें घर असें करून टाका. रात्रं दिवस लढाई करा ट-

ठा आपणास तह नको, खाणें नको, पिणें नको, विश्रांति नको, झोप नको, स्वतंत्रतेवर जुलमानें हल्ला केला आहे. जर्मन लोकांनीं फ्रेंचांवर हल्ला करणें ह्मणजे मेंढीनें सिंहावर झडप घालणें नव्हे काय? गारा जशा उष्ण जमिनीवर पडतांच वितळून जातात; त्याप्रमाणें या जर्मन लोकांस करा. ते फ्रान्स देशांत आले आहेत. कोणत्याच प्रांतानें आतां आपलें कर्तव्य करण्यास मागें पुढें पाहूं नये. ही सगळ्या देशाची लढाई आहे. अहो फ्रेंच शिपायांनो, झाडांमधून, नदींतून, अंधारांतून लपून छपून दरींतून, खोरींतून, रांगत, सरपटत जा. नेम धरा आणि शत्रूस मारा. फ्रान्स देशांतून शत्रूस निर्मूळ करा. मो-ठ्या शौर्यानें फ्रान्स देशाचें संरक्षण करा. जिवावर उदार होऊन लढा. पण मनांत आपल्या देशाबद्दल ममता असूं द्या. वाटेनें जातांना लहान लेंकरें दृष्टीस पडल्यास त्यांचें चुंबन घ्या. कारण तींच लेंकरें तुम्ही मेल्यास तुम-चें नांव चालवितील. आजपासून पुढें लोकसत्तात्मक राज्य आहे. युरोपांतून कोणीच आपल्या मदतीस येत नाहीं, कारण ते सर्व भ्याले आहेत. तुह्मी भिऊं नका. सर्व युरोप खंडास जुलमापासून सोडवा. लयन्स प्रांताचे लोकहो तुह्मी आपल्या तोफा घ्या, बोर्डो शहरचे लोकांनो तु-ह्मी आपल्या तरवारी उपसा, रुअंग् करहो, तुह्मी आपल्या गुप्त्या घ्या आणि शत्रूवर तुटून पडा. अहो मार्सेले करांनो तुह्मी मार्सेली गीत गा. एकंदरींत सर्वांना राग येऊं द्या. स्वदेशासाठीं प्राण द्या. पण आपला देश श-त्रूच्या हातीं जिवंत आहात तों पर्यंत लागूं देऊं नका. ऊ-

ठा, आतां उशीर करूं नका. शत्रु दाराशीं येऊन भिडला आहे."

याच दिवशीं एका बाईनें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:-
"बायांनो, आपले बाप, भाऊ, नवरे, मुले हे सर्व आपलें व आपल्या देशाचें रक्षण करण्यास्तव लढाईस तयार झाले आहेत. आपली, आपल्या बालकांची व आपल्या देशाची अब्रू राखण्याकरितां त्यांनीं हातावर शिरें घेतलीं आहेत. असें असतांना आपण उगीच बसावें काय? स्वस्थतेच्या दिवसांत आपण आपल्या नवऱ्या शेजारीं जाऊन मोठ्या मानानें बसतों, व मोठ्या डौलानें म्हणतों कीं, मी काय अमक्या उमरावाची बायको. मी अमक्या सेनापतीची बायको. तेच आपले पती आज रणभूमीवर एकटे जात आहेत आणि आपण घरांत लपून बसावें काय? आपण अबला खऱ्या, परंतु भलत्या देशांतल्या आहोत काय? आपण फ्रेंच स्त्रिया आहोत. असले आपले पती शूर असून, आपण इतर स्त्रियांप्रमाणेंच उगीच बसावें ना! आपण लहान मुलांस जन्म देतों, पाळतों, व मोठे करतों. त्या प्रमाणेंच आज हें लोकसत्तात्मक राज्य आहे. हें हल्लीं बालदशेंत आहे, तर आपण याचें रक्षण करूं व यास प्रौढ दशेस आणूं. उठा आपल्या नवऱ्यांस म्हणा कीं जसें आह्मी तुमच्या सुखाचे वांटेकरी आहों तसेंच दुःखाचेही वांटेकरी आहों. आम्हांस लढाईंत आपल्या बरोबर न्या. आह्मी तुमच्या बरोबरीनें लढूं. जेथें तुम्हीं पडाल तेथें आह्मी पडूं. आह्मांस लढतांना जेव्हां

शत्रु पाहील, तेव्हां त्यास काय वाटेल, याचा विचार करा. आम्ही मेल्यावर आमच्या बायकांचें काय होईल, ही भीति मनांत आणूं नका. असें आपल्या देशबांधवांस ह्मणा भिऊं नका, शहर सोडून जाऊं नका. आपला देश सोडविण्याची हीच वेळ आहे. आतां मागे पुढें पाहूं नका."

अशा **पारिस** शहरांमध्यें गोंधळ चालला असतां एम. **थीर्स** यानें मनांत आणलें कीं, **इंग्लंड** वगैरे देशांचें सहाय मिळवावें किंवा त्यांस मध्यस्तींत घालून ही लढाई मिटवावी.

तो इंग्लंडास गेल्यावर त्याची व **लार्ड** *ग्रानविल यांची भेट झाली. त्या भेटींत **थीर्स** यानें सांगितलें कीं, फ्रान्स देशांतील लोकसत्तात्मक राज्य तुह्मी कबूल करा. यास **लार्डानें** उत्तर दिलें कीं, अशा वेळेस कबूल करणें ह्मणजे थोडें गैर आहे. फ्रेंच लोकांशीं आमचा निकट संबंध असावा असें आह्मीं इच्छितों, व आह्मी सर्व [2]**राणीस** सांगून कबूल करवूं परंतु तुह्मी म्हणतां तें राज्य अझून तुमच्याच लोकांनीं कबूल केलें नाहीं. हें राज्य सुरळीत चालूंद्या ह्मणजे आम्हीही कबूल करूं. याचप्रमाणें [3]वियना, §सेंटपिटर्सबर्ग येथें ही झालें. अशाप्रकारें त्याची वकिली व्यर्थ गेली.

इकडे **ज्यूलस फाव्र** यानीं थोडे दिवस लढाई तह-

---

*इंग्लंडचे फारेन मिनिस्टर. २ महाराणी विक्टोरिया. ३ आस्ट्रियाची राजधनी ४ रशियादेशाची राजधनी.

कूच करावी म्हणून प्रशियाचे राजाची भेट घेण्याकरितां ते पारिस शहराबाहेर निघाले. त्याची व कौंटबिस्मार्क याची फेरिट्सजवळ भेट झाली आणि बोलणें झालें तें:—

कौं॰ बि॰—फ्रान्स देशांत कोणत्याही प्रकारचें राज्य असो, आह्मांस त्याची कांहीं गरज नाहीं. आम्हांस येवढें ठाऊक आहे कीं, तेथें नपोलियन बादशहाचें राज्य आहे.

फा॰— तह्या बद्दल तुमचें काय बोलणें आहे तें सांगा.

बि॰— जर्मनी देशांत नेहमीं स्वस्थता राहील असें करणें आहे.

फा॰— तुमच्या शरती काय आहेत त्या सांगा.

बि॰— स्ट्रासबर्ग व मेटस येथील किल्ले जों पर्यंत तुमचे ताब्यांत आहेत तोंपर्यंत जर्मन लोकांस स्वस्थसें वाटणार नाहीं याकरितां ते दोन्ही किल्ले आमच्या स्वाधीन करा.

फा॰— त्यांपासून तुह्मांस कोणती इजा आहे.

बि॰— आजपर्यंत सुमारें २० वेळ लढाया झाल्या असतील. त्यांत जर्मन लोक ह्मणून कधींच फ्रेंचांवर चालून गेले नाहींत. नेहमीं फ्रेंचच आम्हांवर चालून येतात. आतां आह्मीं कोणत्याही प्रकारचा जरी तुम्हांशीं तह केला तरी तुह्मीं ही लढाईची मदकुवी

आहे असें समजाल; व या पराभवाबद्दल लढाई करण्यास तुम्हीं कधीं चुकणार नाहीं. सध्यां आम्हांस जो जय मिळाला आहे. यांत आम्हीं होईल तितकी मजबुती करून घेतल्या शिवाय राहणार नाहीं.

फा०—आरंभींच आम्हीं बादशहास सांगितलें होतें कीं लढाई करूं नका. तेवेळेस बादशहानें कांहीं ऐकिलें नाहीं. त्यांतून लढाई न होऊं देण्यासारखा आमच्या हातांत अधिकारही नव्हता.

बो०—बरें, आतां हेंच राज्य सतत चालेल असें कशावरून. आज लोकसत्तात्मक राज्य आहे, उद्यां रेड-रिपब्लिकन्स,*परवां कनवेनशनें[2], तेरवां डायरेक्टरी[3], नंतर अर्लीनचें राज्य, कदाचित बोरबनचें राज्य होईल, किंवा बोनापार्टच पुन्हा गादीवर बसणार नाहीं कशावरून. मग तुम्हांस कोण विचारतो. तुम्हीं तहच करणार तर मासेल नदीच्या पूर्वेकडील सर्व प्रांत आम्हांस द्या.

फा०—फ्रान्साचा नाश करावा असें तुमच्या मनांत आहे.

---

* एक प्रकारच्या मताचे लोक आहेत. २कांहीं काय करण्यास नेमलेले लोकांची सभा. ३फ्रान्स देशांत पहिल्यानेच जेव्हां लोक सत्तात्मक राज्य झालें. ते वेळेचे मंडळीचें किंवा सभेचें नांव.

बि० — हेंच राज्य नेहमीं चालेल अशी हमी द्या.

फा० — याचा विचार करण्यास १५ दिवस लढाई तहकूब करा.

बि० — स्ट्रासबर्ग, टूल आणि फाल्सबर्ग हीं शहरें आमच्या स्वाधीन करा. पारिस शहराजवळचा मांट व्हिलेरियन किल्ला आमच्या ताब्यांत द्या; ह्मणजे पारिस शहरांतील लोकांस बाहेरील प्रांतांशीं पत्रव्यवहार ठेऊं देऊं, व शहरामध्यें धान्य सामग्री येऊं देऊं. तो किल्ला न द्याल तर आह्मी बाहेरील प्रांतांशीं दळण वळण ठेऊं देणार नाहीं व शहरांत धान्यही येऊं देणार नाहीं. असें होईल तर लढाई तहकूब ठेवूं.

फा० — तुह्मी मागाल तितका पैसा देऊं परंतु चार बोटें जमीन देणार नाहीं. (इतकें बोलणें झाल्यावर फाव्र परत आला.)

तो परत आल्यावर त्यानें जाहिरनामा प्रसिद्ध केला तो:—

"१ जर्मन लोकांच्या मनांत लढाई चालवावी असें आहे आणि फ्रान्सास दुसऱ्या प्रतीत घालवावयाचें आहे.

२ जय मिळाल्यामुळें जर्मन लोक अलसेस आणि मेट्स पर्यंत लारेन प्रांत मागतात.

३ लढाई थोडे दिवस तहकूब करण्यास स्ट्रासबर्ग, टूल आणि मांट व्हिलेरियन इतके किल्ले मागतात.

फ्रेंच लोकहो इतकें देण्यास तुम्हीं कबूल आहांत काय?

हे कबूल करा नाहीं तर लढाईस तयार व्हा. आपल्या देशा करितां प्राण द्यावा परंतु हें गर्विष्ट पणाचें बोलणें कधीं कबूल करूं नये. यांतच अन्न व कीर्ति आहे. अशा संकटांतून फ्रान्स देशास सोडवावें हेंच फ्रेंच ह्मणवि-णारांस योग्य आहे.'

यानंतर फ्रेंच लोकांनीं कडेकोट तयारी चालविली. यां त पारिस शहरा जवळ चांगलीच तयारी केली.

पारिस शहर सेन नदीच्या दोहों कांठांस वसलें आहे. ही नदी त्या शहरच्या वरच्या बाजूस उत्तरवाहिनी आहे. तीस शहरांत शिरण्याचे अगोदर शारेन्टन गांवा जवळ मार्न नदी मिळते. शहरांतून बाहेर निघाल्यावर ही नदी नैऋत्य वाहिनी होऊन बिलान कोर्ट जवळ इशान्य वाहिनी हो-ऊन सेंट डेनिस पर्यंत गेली आहे. बुगीवळ जवळ पुन्हा इशान्य वाहिनी झाली आहे. सर्व शहरा भोंवती तट आहे. त्याच्या पुढें उंच टेकड्या आहेत. तटास ९४ बुरूज आहेत. या तटाच्या आंतून सर्व शहरा भोंवतीं आगगाडीचा रस्ता आहे. शहराच्या रक्षणार्थ बाहेरच्या बाजूस १५ कि-ल्ले आहेत. त्यांचीं नांवें व जागा:—

पूर्वेस—१ रोमनव्हील, २ नोइसे, ३ रोजनी, ४ नोंमेंट ५ शारेंटन, ६ विनसेनिस.

दक्षिणेस—१ डी. इव्री, २ डी. बिसेट्री, ३ डी मान्ट्रोग ४ डी. व्हियानवील, ५ डी. ईसी.

पश्चिमेस—१ मांट व्हिलेरियन.

उत्तरेस—१ आवरविलियर्स, २ डी ला ब्रिचे, ३ डी एल—एस्ट.

यांखेरीज जागोजाग कच्ची तटबंदी व आश्रयाच्या जागा तयार केल्या. सप्टेंबरच्या २८ वे तारखेस बाहेर प्रांतांशी पत्रव्यवहार बंद पडला. तो चालविण्यास पारिस शहरच्या लोकांनी अटकळी काढल्या त्या :—

१ विमान—याची सुधारणा इतकी झाली कीं, यांतून १४ *टन ओझें नेतां येऊं लागलें. हें हवेमधून चालतें.

२ कबूतरें—एक पर द्यावा. त्याचे पोकळींत पत्रांचा २फोटोग्राफ काढून घालावा आणि तें पर त्या पांखराच्या परांत खुपसावें. यांत सरासरी ७५ कागदांवर लिहिलेला मजकूर मावतो.

३ बाटली—ईत पत्रें घालून नदींत टांकावीं. आणि ती बाटली पारिस शहरांतील लोकांनीं धरावी.

४ लहान होड्या—मनुष्य बुडी मारून पाण्यांतून जातो त्याप्रमाणें सेन नदींतून होड्या बुडून नेत असत.

---

# भाग ६.

सेडन येथील लढाई झाल्यावर जर्मन लोकांनीं ३ रें आणि ४ थें सैन्य पारिस शहरावर चालविलें. ४ थें सैन्य

*टन=२२४०शेर. २ सूर्य किरणाच्या योगानें काढलेली तसवीर.

BKThringashure



तीन रस्त्यानें पारिस शहरावर आलें आणि ३ रें सैन्य सेन आणी मार्न या दोन नद्यांच्या मधील प्रांतांतून आलें. वाटेनें येतां येतां सोसून गांवास वेढा घातला. ५ वे तारखेस ऱ्हीम्स शहर घेतलें. हें शहर लढाई न करितां हातीं लागलें. या प्रमाणें कांहीं गडबळ न होतां शहरामागें शहर व गांवामागें गांव जर्मन लोकांच्या हातीं लागलीं. फ्रान्स देशाच्या पूर्व प्रांतांत जिकडे तिकडे जर्मन लोक दिसूं लागले. जागोजाग जर्मन शिपाई, रस्त्यावर जर्मन यांचें लष्कर, पहावें तिकडे जर्मन लोकांची छावणी. हें पाहून फ्रेंच लोकांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि ते विचारूं लागले कीं, आमचें लष्कर कोठें आहे.

९ वे तारखेस लोन शहर जर्मन लोकांच्या हातीं लागलें. तेथील किल्ला ताब्यांत घेण्याचे वेळेस दारूचा भपका उडाला. तेणेंकरून ३०० फ्रेंच लोक आणि १०० जर्मन जळाले.

आगष्ट महिन्याचे अखेरीस जर्मनींतून पुनः सैन्याची कुमक आली. त्या सैन्यास १३ वी कोर असें नांव दिलें, त्यावर ग्र्यांड ड्यूक आफ म्याक्लेंबर्ग यास सेनापति नेमलें. हें सैन्य सेप्टेंबरच्या १० वे तारखे पर्यंत मेट्स किल्ल्याजवळ होतें. नंतर त्यास शेलान टूल्स वगैरे शहरें घेऊन पारिस शहरावर जाणाऱ्या सैन्याचे मागें असण्याचा हुकूम झाला. त्यानें २४ वे तारखेस टूल्स शहर घेतलें. येथें १०९ सरदार, १२४० शिपाई,

१२० घोडे, १ निशाण १९७ तोफा, ६०००० बंदुकी या शिवाय दारू गोळा व धान्य त्यांच्या हातीं लागलें.

सेप्तेंबरच्या १७वे तारखेस पारीस शहरास वेढा पडला तो असाः—३ रें सैन्य सेन नदीच्या डाव्या किनाऱ्या पासून ते मार्न नदी पर्यंत होतें, आणि तेथून ते सेन नदीच्या डाव्या किनाऱ्या पर्यंत साक्सनीच्या राजपुत्राचें सैन्य होतें. प्रशियाचा राजा १९ वे तारखेस तेथें येऊन पोहोंचला. २० वे तारखेस व्हरसेलीस गांव घेतलें. येथें २००१ मोबिल गार्ड धरले.

स्ट्रासबर्ग आलसेस प्रांताचें मुख्य शहर र्‍हाईन नदीच्या डाव्या किनाऱ्यावर आहे. याच्या भोंवतीं तट आहे. पूर्वेच्या बाजूस किल्ला आहे. तट व किल्ला मिळून २२बुरूज आहेत. पूर्वेस र्‍हाईन नदी,दक्षिणेस र्‍हाईन—र्‍होनचा कालवा, आणि उत्तरेस--र्‍हाइन मार्नचा कालवा आहे.या शहरांत फ्रेंचांचें लष्करी कारखानें पुष्कळ होते. येथील *कथायेद्रलची इमारत युरोप खंडांतील सर्व इमारती पेक्षां उंच व सुंदर होती. येथील पुस्तकालय फारच चांगलीं होतीं. या शहरावर हल्ला करण्या सारखी जागा नैऋत्य दिशेस आहे. येथें १५००० फ्रेंच शिपाई होते. हे सर्व न्याशनल गार्ड होते. यांवर जनरल युरीश सेनापति होता. अगष्टचे ८ वे तारखेस जर्मन लोक येथें आले त्यांचे सैन्याचा तपशीलः— बेडेन देशचें सैन्य, ल्यांडवर शिपायांचा एक भाग, प्रशिय-

---

* देऊळ.

न रिझर्व याचा एक भाग आणि गोलंदाज व सार्पेस यांच्या २७ कंपनी. यांवर जनरल व्हरडर मुख्य होता.

जनरल व्हरडर या शहराजवळ आल्या बरोबर त्यानें तेथील अधिकाऱ्यास सांगून पाठविलें कीं शरण येऊन शहर आमच्या स्वाधीन करा नाहीं तर आम्ही शहरावर गोळा चालवूं. यास कांहींच उत्तर मिळालें नाहीं म्हणून २४वे तारखेस पासून ते २६वे तारखे पर्यंत एक सारखा रात्रंदिवस शहरावर गोळा चालला होता. तेणें करून शहराचा बराच नाश झाला. पण तेथील सैन्य शरण येत नाहीं हें पाहून नैऋत्य दिशेस *पारेलल्स खांदून शहर घेण्याचा बेत केला.

ऱ्हाइन नदीच्या पलीकडल्या कांठास खील गांव आहे, तेथून जर्मन लोकांनीं स्ट्रासबर्ग शहरावर तोफांचा मार चालविला होता, त्या योगानें कथेड्रलचा फार नाश झाला, हा सूड घेण्या कारितां फ्रेंच लोकांनीं किल्ल्या वरून तोफ चालवून खील गांवाचा नाश केला.

जर्मन यांनीं १ ली पारेलल ८०० पावलांचे अंतरावर, दुसरी ४०० पावलांचे अंतरावर आणि तिसरी अगदीं तटास लागून खांदली, आणि जागोजाग तटास भोकें पडलीं. या वेळेस पुस्तकालयाच्या व दुसऱ्या पुष्कळ इमारतींचा नाश झाला. शहरांत एकंदर १९३७२१ गोळे पडले. सेप्तेंबरचे २७ वे तारखे पर्यंत फ्रेंच लोकानीं शहराचें व किल्ल्याचें रक्षण केलें. शेवटीं निरुपाय होऊन

* आपल्यास शत्रूचा मारा न लागतां आपला मारा शत्रूवर चालावा अशा प्रकारचा खांदलेला.

त्याच दिवशीं शहर व किल्ला जर्मन लोकांचे हातीं दिला, ते दिवशीं कित्येक अभिमानी फ्रेंच गृहस्थ शहर सोडून निघून गेले,

स्ट्रासबर्ग शहर घेतल्यावर जनरल व्हरडर यास जर्मनींतून सैन्याची कुमक आली, त्या सर्व सैन्यास १४ वी कोर असें नांव दिलें, त्या सैन्यास कामगिरी सांगितली तीः-

१ मुल्हौसेन आणि डिझान इकडील पारिस शहरचा रस्ता बंद करावा,

२ त्या बाजूस जर फ्रेंच सैन्य तयार होत असेल तर त्यास अडथळा करावा,

३ शलेटस्टाट, न्युब्रिस्याक, आणि बेलफर्ट वगैरे शहरें घ्यावीं.

सांगितलेलीं कामें करण्याकरितां व्हरडर यानें आपल्या सैन्याच्या पुष्कळ टोळ्या केल्या आणि चोहोंकडे पाठविल्या

पहिल्या सैन्यांतील थोडें सैन्य व सगळें दुसरें सैन्य मेट्स शहराजवळ ठेवलें होतें असें ५ वे भागांत सांगितलें आहे. बेझन कदाचित सुटून जाण्याची खटपट करील म्हणून त्या सैन्याचे मदतीस जर्मनींतून आणखी १२००० लोक आणविले. त्यांनीं मेट्स किल्ल्याला चोहोंकडून वेढा घातला. त्यांत ७०००० मोसेल नदीच्या उजव्या कांठास

ठेवले, आणि मॅक-महान याच्या भयास्तव १,२०,००० डाव्या कांठास ठेवले. मेट्स शहर फ्रेंचांचे ताब्यांत होतें यामुळें जर्मनीशीं संबंध ठेवण्यास २२ मैल आगगाडीच्या रस्त्याची तूट पडत होती; तितका रस्ता ९ दिवसांत बांधला. आगष्टचे १९वे तारखेपासून ते महिना अखेर पर्यंत बझेन यानें कांहीं हालचाल केली नाहीं.

सेडन गांवाजवळ मॅक-महान आल्याची बातमी बझेनास कळतांच त्यानें शत्रूवर हल्ला करण्याचा बेत केला. ते वेळेस आपल्या सैन्याशीं भाषण केलें तें येणेंप्रमाणें:—

"तुह्मीं थोडे दिवसांपूर्वीं उत्तम तीन लढाया केल्या. हें पाहून बादशहास आनंद झाला. अजून ही लढाई संपली नाहीं. आपण कोंडलों गेलों आहों मोठा विकट प्रसंग आला आहे. आतां आपल्या देशाखेरीज दुसरा विचार मनांत आणूं नका. मेट्स किल्ल्याचें व शहराचें रक्षण केल्यास सर्व फ्रान्स देशाचें रक्षण केल्याचें श्रेय तुह्मांस येणार आहे. देथून फ्रेंच लोकांनीं किती वेळ शत्रूस माघारें फिरविलें आहे याचें स्मरण करा. आपल्या पूर्वजांची आठवण करा, ह्मणजे तुमचे अंगांत आवेश येईल. जसा शत्रु तुह्मां भोंवतीं निश्चयानें वेढा घालून बसला आहे, तसाच निश्चय तुह्मी करा, आणि त्यास येथेंच अडवून धरा; ह्मणजे आपल्या सरकारास दुसरें सैन्य तयार करण्यास वेळ मिळेल. धैर्य धरा, श्रम करा, आणि गंभीरपणानें वागा. शौर्य आणि व्यवस्था असल्यास खचित जय मिळतो हें लों-

तुमच्या जरीपटक्यावर वाक्य लिहिलें आहे तें ध्यानांत धरा. तुह्मांस सहाय करण्यास सर्व फ्रान्स देशचे लोक तयार आहेत. लढाईस तयार असा."

अगष्टचे ३१वे तारखेस मेट्स किल्ल्याचे पूर्वेस कोलोम्बो मान्टोय आणि नोईसीव्हील या गांवांवर फ्रेंचांनीं हल्ला करून तेथून शत्रूस हाकून दिले. नोईसीव्हील परत घेण्या करितां शत्रूनें सेप्तेंबरचे १ले तारखेस हल्ला केला. तीन वेळ तें गांव घेतलें, तिन्हिवेळ फ्रेंचांनीं त्यास परत लावलें. या दिवशीं रात्रीचे ११वाजे पर्यंत लढाई चालली होती. तेथें जर्मन लोकांचे १२३ सरदार आणि २,८७० शिपाई पडले.

या वेळेस फ्रेड्रिक चार्लस राजपुत्रानें भाषण केलें तें:—

"जर्मन कान्फिडरेशनचे शिपायांनो, आपल्या मित्रांशीं आणि शत्रूशीं प्रामाणिकपणानें वागा. कोणाच्याच वस्तूं विषयीं लोभ दाखवूं नका. आपल्या देशाच्या व आपल्या पूर्वजांच्या प्रामाणिकपणास व अन्नास अनुलक्षून वागा. आणि फ्रेंचांस शरण येई पर्यंत सोडूं नका."

सेडन गांवा जवळ फ्रेंच सैन्य शरण गेल्याची बातमी, मेट्स शहरीं सेप्तेंबरच्या १०वे तारखेस कळली. तेव्हां जनरल *कार्फार्मर यानें भाषण केलें तें:—

"सेडन गांवा जवळ फ्रेंच सैन्याचा पराभव झाला. बादशहा शत्रूच्या हातीं लागला. फ्रान्स देशांत लोक सत्तात्मक राज्य झालें

* फ्रेंच सरदार.

असा घोटाळा झाला आहे. आतां फ्रान्सा शिवाय दुसरा विचार मनांत आणूं नका. आपल्या दर्जाप्रमाणें रहा मेट्स शहराचें रक्षण करा. फ्रान्स आपला देश आहे हें मनांत आणा. देशाभिमान सोडूं नका. या वेळेस जर तुह्मीं निश्चयानें आणि शौर्यानें लढाल तर तुमची कीर्ति शत्रु देखील गाईल यांत संशय नाहीं. आपले पूर्वजांचे कीर्तीस डाग लावूं नका. आज पर्यंत जसें तुह्मीं शौर्यानें लढला असेंच आतांहि लढा. आपणास ज्या सैन्यानें कोंडून ठेवलें आहे त्याच सैन्यास अडवून धरा, ह्मणजे तुह्मीं आपलें कर्तव्य केलें असें होईल."

सेप्टेंबरच्या १९वे तारखेस शत्रूच्या १९२ गाड्या धान्याच्या फ्रेंचांनीं धरल्या. त्याच दिवशीं रात्रीं ६०० फ्रेंच शिपाई व **बोरबकी** नांवाचा सरदार शत्रूच्या वेढ्यांतून निघून गेला.

बादशहाचें वर्तमान ऐकल्यापासून **मार्शल बझेन** याचा उत्साह गेला आणि तो मनापासून झटेनासा झाला. १९ वे तारखेस मेट्स किल्ल्याजवळ फ्रेंचांचें एकंदर सैन्य १३८००० होतें. या येवढ्या सैन्यानें जर आपल्या भोंवतालचा वेढा उठविण्याची मनापासून खटपट केली असती तर कांहीं अंशीं तरी सफळ झाली असती. परंतु तसें कांहीं न करितां ते आपणांतच भांडूं लागले, आणि सैन्यांत दोन तट झाले. एक तटांतले लोक ह्मणत कीं, हल्ला करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, आपलेंच रक्षण करा ह्मणजे झालें.

असें होतें तरी देखील रोजचे रोज थोडी बहुत लढाई होतच होती. २१ वे तारखेस मेट्झ किल्ल्याचे उत्तरेस थियानवील गांवाच्या बाजूस फ्रेंचांनीं हल्ला केला आणि ४ तास लढून ते मागें फिरले. याच दिवशीं पश्चिमेच्या बाजूस ही थोडी लढाई झाली. २२ वे तारखेस फ्रेंचांनीं पेलटी गांवावर हल्ला केला, आणि संध्याकाळचे सुमारास ते मागें फिरले. २७ वे तारखेस मार्शी ला-हट गांवाजवळ लढाई झाली. तेथें १९० शत्रूचे शिपाई फ्रेंचांचे हातीं लागले, त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांस सोडून दिलें. नंतर थोड्या वेळानें तेथें जवळच एक मठ होता तेथें लढाई झाली. त्यांत बैल, गाई, मेंढे, साखर, बुंद वगैरे पुष्कळ सामान फ्रेंचांचे हातीं लागलें. याप्रमाणें आणखी दोन दिवस लागोपाठ फ्रेंचांचा जय झाला. त्यांनीं बरींच गांवें शत्रूपासून परत घेतलीं.

अक्टोबरचे १ ले तारखेस फ्रेंचांनीं घेतलेलीं गांवें परत घेण्याकरितां जर्मन लोकांनीं पुढें चाल केली. या दिवशीं तोफांची फारच मोठी लढाई झाली. ७ वे तारखेस फ्रेंच थियानवील पर्यंत जाऊन पोंहचले या ठिकाणीं फ्रेंच फारच उत्तम लढले. शत्रूनें बांधलेल्या मोर्चावरून उड्या मारून त्यांच्या गोटांत शिरले, आणि संगिनीनें लढून लेस-ग्यांड्स-टेप्स या ठिकाणाहून शत्रूस हाकून दिलें. येथें ७,००० फ्रेंच आणि २,७२० जर्मन शिपाई पडले. यास मेझेरिसची लढाई म्हणतात. ८ वे तारखेस न्वेली गांवाजवळ लढाई झाली त्यांत फ्रेंचांचा पराभव झाला. या दिवसापासून फ्रेंच सैन्यांत धान्याचा तोटा पडला.

फ्रेंच लोकांनीं औरस चौरस २० मैल जागा ताब्यांत राखली होती तेवढ्या जामिनींतील उत्पन्नावर त्यांचा निर्वाह होईना. अगष्टचे १९ वे तारखे पर्यंत २५ जनरल २,०९८ सरदार ४०,३३९ शिपाई कमी झाले होते.

जर्मन लोकांचे शिपाई फ्रेंचांचे हातीं लागत, त्यांस ते आगगाडींत घालून परत त्यांच्या सैन्यांत पाठवीत. या प्रमाणें एके दिवशीं कैदीच्या वेशानें कांहीं शिपाई व तोफा अगगाडींत घालून शत्रूच्या सैन्यांत पाठविल्या. तेथें गेल्या बरोबर त्या शिपायांनीं हल्ला केला. तेणें करून शत्रूचा पुष्कळ नाश झाला. नंतर फ्रेंच शिपाई परत आले.

मेट्स किल्ल्यांत व त्या भोंवतालच्या लष्करांत काय चाललें आहे, हें पहाण्या करितां कोनीं खेड्या जवळ सेंट क्वेंस टेंकडीवर जर्मन लोकांची अब्झरवेटरी म्हणजे वेध शाळा होती. यामुळें फ्रेंच लोक कधीं हल्ला करण्यास निघाले असतां जर्मन सैन्यास अधींच कळत असे, मग ते फ्रेंचांचा रस्ता रोखून धरीत.

अक्टोबरचे १२ वे तारखेस बेझेन यानें आपले सर्व मोठाले सरदार गोळा केले, आणि विचार ठराविला कीं ही लढाई चालली आहे तो पर्यंत जर्मन लोकांवर हत्यार धरणार नाहीं या शरतीवर जर जर्मन लोक आपणांस सैन्या सुद्धां फ्रांस देशाच्या दक्षिणेस जाऊं देतील तर शरण जावें. जर नाकबूल करतील तर सर्वांनीं तरवारी घेऊन एकदम शत्रूवर तुटून पडावे आणि मरावें नाहीं तर मारावें आणि लुटून जावें.

मेट्स किल्ला शत्रूच्या हातीं देऊन बझेन सैन्यासहवर्तमान शत्रूस शरण जाणार हें ऐकल्यावर त्या शहरच्या लोकांनी एक सभा स्थापली, व जनरल काफिनियर्स याला त्या सभेचे अध्यक्ष नेमिलें. त्या सभे मध्यें बराच वादविवाद होऊन शेवटीं फ्रेंच सैन्यानें हर प्रयत्न करून शत्रूंच्या हातून सुटून जावें असें टरलें. त्यांनीं बझेन यास पत्र- लिहिलें कीं, "आम्ही उगीच मेंढ्यांप्रमाणें शत्रूच्या स्वाधीन होणार नाहीं. कारण आतां लोकसत्तात्मक राज्य आहे. फ्रान्स देशाची अब्रू तुमच्या अप्रतिम शौर्यानें अजून राखली आहे. आपला देश शत्रूच्या स्वाधीन करण्यापेक्षां त्या करितां प्राण द्यावा यांतच भूषण आहे. आपणांजवळ धान्याचा तोटा आहे तरी भिऊं नका. आम्हांजवळ धान्याचा एक दाणा असला तरी आपण सगळे मिळून वाटून खाऊं आम्ही तुमच्या बरोबर लढण्यास येतों. आपण सर्व प्राण जाई पर्यंत लढूं. पण शत्रुस शरण जाऊं नका."

यामुळें बझेन व काफिनियर्स यांचें वांकडें आलें. आणि सैन्यामध्यें दोन चांगलेच तट झाले. पुष्कळ शहरवासी लोक बझेनकडे गेले आणि त्यांनीं त्याची विनंती केली कीं आम्हां बरोबर थोडें सैन्य द्या म्हणजे आम्ही लागेल तितकें धान्य आणून देतों. परंतु तें बझेन यानें अगदीं नाकबूल केलें, आणि जनरल बोयर यांस कौंट बिस्मार्क याजकडे पाठविलें. २१ वे तारखेपासून शरण आल्याचें बोलणें लाविलें. शरण जाण्याचे दिवसा पर्यंत काफिनियर्सच्या मनांत होतें कीं, एक वेळ सर्व सैन्या-

सुद्धां कोणत्या तरी बाजूस हल्ला करून निघून जावें, परंतु तसें न करण्या करितां बेझन यानें त्याचें मन वळविलें.

या सैन्यामध्यें जनरल शांगरनीर ह्मणून एक ६८ वर्षांचा म्हातारा सरदार होता. याचें व बादशहाचें वांकडें होतें. त्या दोघांनीं १९ वर्षें एकमेकांचें तोंड पाहिलें नाहीं. तरी आपल्या लोकांचा पराभव झालेला पाहून अगस्टचे ८ वे तारखेस त्याच शहरीं त्यानें बादशहाची भेट घेतली, व एका सैन्याचे टोळीचें सेनापतित्व पतकरलें. या सरदारास जेव्हां कळलें कीं शरण जावयाचें तेवेळेस त्यानें डोळ्यांस पाणी आणलें, आणि रडत रडत बोलला कीं, अरे लढाई करून मरा पण शरण जाऊं नका. आणि फ्रेंच लोकांस असला डाग लावूं नका.

शेवटीं अक्टोबरचे २९ वे तारखेस सेडन येथील शरतीप्रमाणें शरती ठरून फ्रेंच सैन्य जर्मन लोकांच्या स्वाधीन झालें. त्याचा तपशील:—३ मार्शल, (बेझेन, क्यान-रोबर्ट आणि लुबो.) ६६ जनरल ६,००० सरदार, १,२३,००० शिपाई, ४००, तोफा १०० मेट्रेलूस आणि ५३ झेंडे

याच दिवशीं प्रशियाचे राजानें आपले पुत्रास व फ्रेड्रिक यांस मार्शल हा किताब दिला आणि भाषण केलें तें,—

"लढाईस आरंभ होण्याचे अगोदरच मी तुह्मांस सांगितलें आहे कीं, आपण लढाईस जातों हें योग्य आहे कारण सत्याचा पाठिराखा ईश्वर असतो, ह्मणूनच आपणांस हा जय मिळाला आहे. वूर्थ, सारब्रक, मेट्स, सेडन बोमांट वगैरे लढायांचें स्मरण होतें. या प्रत्येक लढाईत

तुह्मांस जय मिळाला आहे. शिपाई उदयास येण्यास जे गूण पाहिजेत, ते सर्व तुह्मांमध्यें आहेत. मेट्स पतन झाल्या दिवशींच शत्रूचें सर्व सैन्य नाहींसें झालें. हे तुमचें शौर्य पाहून मला फार आनंद झाला आहे. मोठ्या सरदारांपासून ते शिपायां पर्यंत मी सर्वांचे उपकार मानितों. आतां यापुढें माझी खात्री आहे कीं कसाही प्रसंग येवो तुम्हां सारखे शूर शिपाई लढायास असल्यावर जय मिळाल्या शिवाय राहणार नाहीं."

राजपुत्रानें आपल्या शिपायांशीं भाषण केलें तें,—

"दुसऱ्या सैन्याचे सरदार व शिपयानो, ७० दिवस मेट्स किल्ल्यास वेढा घालून व लढून तुह्मीं शत्रूस जिंकलें अतां तुमची अब्रू फार वाढली. शरण येई पर्यंत शत्रूस हलू देखील दिलें नाहीं, कधीं कोणाच्या हातीं लागणार नाहीं असा मेट्स किल्ला तुम्ही घेतला. येथें आपणांस पुष्कळ दारू गोळा व हत्यारें सापडलीं आहेत. तुम्ही फार चांगल्या रीतीनें लढला व माझा हुकूम मानिला म्हणून मी तुमचे उपकार मानितो. मला मार्शलची पदवी तुह्मीच मिळवून दिली तुमचे फार हाल झाले परंतु तिकडे लक्ष न देतां तुह्मी आपलें काम बजाविलें. तुह्मी आज फारच मोठें यश मिळवलें. प्रशियाचा राजा तुमचे उपकार मानितो तुम्ही फ्रेंच लोकांची कंबरच बसविली. अतां तुम्हांस निर निराळ्या ठिकाणीं जावें लागेल अतां सर्वांनीं माझा सलाम घ्यावा. ईश्वर करो आणि तुह्मांस आणखी यश मिळो."

बझेन यानें सैन्यास फसवीलें. अशी जिकडे तिकडे बातमी पसरली. बायका मुलें देखील त्यांवर दांत खाऊं लागलीं. तो ज्या दिवशीं मेट्स शहर सोडून निघाला, ते दिवशीं त्या जवळ रक्षणार्थ शिपाई नसते तर बायकांनीं त्यास रस्त्यांत जिवें मारिलें असतें. तरी देखील बायका त्याच्या मागें शिव्या देत व ओरडत लागल्या होत्या. शहरांत आणखी ६ महिने पुरेल इतकें धान्य होतें परंतु बझेन यानें तें पुरून टाकलें होतें असें ह्मणतात.

हें वर्तमान ऐकल्यावर टूर्स शहरीं जी सभा रेथ पन झाली होती त्या सभेनें खालीं लिहिलेला जाहीर नामा प्रसिद्ध केला.

"फ्रेंच लोकांनो, आपलें दुर्दैव आपल्या पाठीस हात धुऊन लागलें आहे, त्याचा पिच्छा पुरवा. धैर्य धरा, अशा समयास धैर्य धरणें हेंच तुह्मांसारख्या शुरांस योग्य आहे. धन्य फ्रेंच लोक कीं विपत्ति काळीं ही त्यांचा धैर्य भंग होत नाहीं, असें म्हणून घेण्याची वेळ आली आहे. मेट्स किल्ला, विश्वास घात करून, शत्रूच्या हातीं दिला फ्रेंच सैन्याचे पराक्रमाकडे कांहीं लक्ष न देतां १२५००० शिपाई, व बंदूकी, तोफा, निशाणें व देशांतील अति उत्तम किल्ला इतकें शत्रूच्या स्वाधीन केलें अरेरे!! असा विश्वास घात करावयाचा नव्हता धिःकार असो त्या क्रियानष्ट पुरुषास!!! फारच मोठा अपराध केला सर्व देशास काळोखी लावली फ्रेंच लोकांनो बादशहानें तुम्हांस केवढ्या संकटात घातलें आहे पहा असल्यां अविचारी सरकारच्या

अमला खालीं तुम्ही २० वर्षे काढलीं त्या सरकारानें तुमची अब्रू घालविली एवढेंच नव्हे, परंतु सर्वस्वी तुमचा त्यानें घात केला. दोन महिन्यांत २२५००० सैन्य शत्रूच्या हातीं दिलें. सेनापति फितुर झाला. अरेरे!! फ्रान्स देशाची अशी दशा व्हावी काय!! देशबांधवांनो, आतां हें दुःख विसरा. कारण आतां लोकसत्तात्मक राज्य झालें आहे. सर्व एकत्र व्हा. अपकिर्तीचा डाग लावून घेऊन जगण्यापेक्षां मरण बरें. लढाईस तयार व्हा. गेलेली अब्रू पुनः मिळवा. चार बोटें तुमच्या देशाची जमीन तुमच्या ताब्यांत आहे तों पर्यंत लढा, मरा, पण आपली व आपल्या देशाची अब्रू राखा." घाबरूं नका. भिऊं नका. अब्रू मिळविण्याची हीच वेळ आहे. अझून तुमची अब्रू गेली नाहीं. तुम्हांस फसविलें आहे. तुमचा विश्वास घात केला आहे. वरिष्ट अंमलदारांच्या मूर्ख पणानें तुमच्या शौर्यास ग्रासून टाकलें आहे. आतां तसले अप्रयोजक अधिकारी नाहींत. तुमचा ज्यांवर विश्वास आहे त्यांचेच हाताखालीं राहून लागलेला डाग काढून टाका. उठा, लढाईस तयार व्हा. आतां जुलमी बादशहा करितां तुम्हीं लढत नाहीं; पण तुम्हीं आपल्या देशा करितां तुमचीं घरें दारें, व प्रांत शत्रूनीं उध्वस्त केला, या करितां व तुमच्या कुटुंबावर जो कहर गुदरला आहे या करितां लढत आहां. फ्रान्स देश तुमची जन्म भूमी आहे तिला विश्वास घातकी मनुष्यांनीं अंशतः उन्मत्त शत्रूच्या स्वाधीन केलें आहे. तिला सोडविण्यास सर्वांनीं प्राण द्यावेत, हेंच सुपुत्र म्हणविणारांस योग्य आहे. ज्यांनीं

मायलेकांची ह्मणजे सैन्याची व देशाची अशी तुटातूट केली त्यांस धिकार असो. आतां या जन्मभूमीची अब्रू राखणें तुमचे हातीं आहे. मरणास भिऊं नका. तुमची जन्म माता अशा संकटांत आहे हें मनांत वागवा. आतां मागें पुढें पाहण्याची वेळ नाहीं. या देशाचें सूत्र आतां तुमचे हातीं आहे. तुह्मीं कराल तसें होणार आहे, तयारी करा लढा आणि जयवंत होऊन परत या. फ्रान्स देशास पुष्कळ आयुष्य असो व लोकसत्तात्मक राज्य दीर्घायुषी होवो."

स्ट्रासबर्ग शहर जर्मन लोकांच्या हातीं लागल्याचें वर्तमान पारिस शहरीं आलें, ते वेळेस ग्यांबट यानें भाषण केलें तें;—

" शहरवासी व सैन्यांतील लोकांनो,— स्ट्रासबर्ग शहर शत्रूच्या हातीं लागलें ह्मणून धैर्य सोडूं नका. जें होईल तें सहन करा. ५० दिवस एक सारखा शत्रूचा गोळा शहरावर चालू होता. दारू गोळा संपल्यावर, शहरच्या व किल्ल्याच्या भिंती जमीनदोस्त झाल्यावर मग तेथील लोक शत्रूस शरण गेले. शरण जाते वेळेस त्यांनीं पारिस शहराकडे दीन वदन करून पाहिलें. झालेल्या अपमानाचा सूड घेतील तर एक पारिस शहरचेच लोक घेतील असें त्यांस वाटलें, म्हणून इकडे तोंडें केलीं होतीं, याचा अभिमान धरा. एकोप्यानें वागा. लोकसत्तात्मक राज्य चिरकाल राहील असें करा.'

मेट्स किल्ला एकाएकीं शत्रूच्या हातीं लागला तर्फे

करून फ्रान्स देशाचा फारच नाश झाला. हाच जर आणखी १५ दिवस जर्मन लोकांच्या हातीं न लागतां तर *ल्वारथडीच्या सैन्यानें वहार केली असती. परंतु त्या सैन्यास जबरदस्त अडथळा झाल्यामुळें त्या सैन्याच्यानें पुढें येववलें नाहीं.

आयर्लंदांतून गरीब लोक येऊन शिपाई गिरीचीं कामें करूं लागले. अमेरिकेतून ४,००,००० बंदुकी व करोबिनी ४,२०,००,००० कार्तुसें, खेरीज तोफा वगैरे पुष्कळ सामान फ्रान्स देशांत आलें.

फ्रेंचांचे आरमारानें जर्मन व्यापाऱ्यांचीं पुष्कळ जहाजें धरलीं आणि त्यांतील लोकांस कैद केलें. या लोकांस व याच्या जहाजांस सोडून देण्याकरितां कौंट बिस्मार्क यानें फ्रेंच सरकारास लिहिलें. त्यानीं उत्तर दिलें कीं, या लोकांच्या बरोबरीचे आमचे लष्करीलोक सोडाल तर आह्मी यांस सोडूं. यावर ब्रेमन शहरांतील फ्रेंच व्यापाऱ्यांस कैद करावें, असा बिस्मार्क यानें जर्मनींत हुकूम पाठविला. याशिवाय फ्रेंच आरमाराचा कांहींच उपयोग झाला नाहीं. सर्व लोकांस वाटत होतें कीं, जर फ्रेंच लोक जमिनीवर हरले तर समुद्रांत जय मिळवितील परंतु तसें कांहींच घडलें नाहीं.

याच समयास रशिया सरकारानें सन १८५६ मधील

---

* ल्वार नदीच्या कांठच्या प्रांतांत. तयार झालेलें सैन्य.

तह मोडून आपलीं जहाजें काळ्या समुद्रांत घातलीं. ही तरी इंग्लिशांची व त्यांची लढाई होण्याची वेळ होती, परंतु इंग्लिशांनीं ती वेळ तशीच जाऊं दिली.

---

# भाग ७.

न्याशनल डिफेन्स नांवाचें सरकार तारीख ६ आगस्ट रोजीं स्थापन झालें होतें. त्या सरकारानें तयारी चालविली होती तीः —

१ न्याशनल गार्ड यांस कवाईत शिकवीत होते.

२ तोफा व बंदुकी यांचे कारखाने चालू केले हो- ते व विकत मिळाल्यासही घेत होते.

सप्टेंबरचे ४ तारखेस प्रजासत्ताकराज्य स्थापन झाल्या- वर त्यांनीं देशांतील सर्व लोकांनीं लष्करांत चाकरी करण्या- चा कायदा अमलांत आणला. त्यांत पैसा भरला असतां मोकळीक मिळण्याचें कलम रद्द केलें.

लढाईस आरंभ होण्याच्या अगोदर कायद्यांतील जयाचे किती लोक होते, यांत बादशाही बरोबर किती कर्म झाले, व सध्याचे सरकारास किती मिळाले, याचा तपशील

फ्रान्स देशांत ३,८०,००,००० मनुष्यांची वस्ती आहे

यात १९,८०,९०० लोक २० पासून २५ वर्षांचे, व १९,५३,९०० पंचवीस पासून ३० वर्षांचे, २८,०२,५०० तीस पासून ४० वर्षांच वयाचे होते.

पहिल्या वर्गाचा तपशील.

१,००,००० लोक सेडनच्या लढाई पर्यंत, बझेन याचें
सैन्य धरून कैद झाले व मेले.
७,९०,४०० ,, निरुपयोगी (व्यंग, ठेंगणे, वगैरे)
२,९९,२०० ,, शत्रूनें घेतलेल्या प्रांतांत अडकून राहिले

१२,८५,६०० मूळ संख्येंतून वजा जातां बाकी २,९५,२०० राहिले.

दुसऱ्या वर्गाचा तपशील.

१,५०,००० लोक बादशाही बरोबर नाहींसे झाले.
७,६१,९०० ,, निरुपयोगी (व्यंग, अधळे वगैरे)
३,८०,९५० ,, जर्मन यानीं घेतलेल्या प्रांतांत राहिले.

१२,९२,८५० मूळ संख्येंतून वजा जातां बाकी २,३०,९५० राहिले.

तिसऱ्या वर्गाचा तपशील.

५०,००० लोक बादशाही बरोबर नाहींसे झाले.
६०,००० ,, सरकारी कामावर होते.

१,४०,१२० ,, निरुपयोगी.
७,००,६२५ ,, शत्रूने घेतलेल्या प्रांतांत राहिले.

२१,६१,८७५ वजा जातां बाकी ६,४०,७२५ राहिले यां पैकी ३,४०,७२५ वरकड कामास लाविले. तेव्हां बाकी तिसऱ्या वर्गांत ३०,००० राहिले.

२,९९,२०० पहिला वर्ग
२,३०,९५० दुसरा वर्ग
३,००,००० तिसरा वर्ग

८,२६,१५० यांतही वजा करावयाचे ते:—
४०,००० मोबिल गार्ड यांला कवाईत शिकविण्यास
५०,००० न्याशनल ,, ,, ,, ,,
८०,००० *व्हालेन्टिअर कोर ,, ,,

१,७०,००० वजा जातां बाकी ६,५६,००० लोक लोकसत्तात्मक राज्याचे वेळेस लढण्या जोगे राहिले होते. यांतून पारिस शहरांत २,००,००० लोक होते. बाकीचे बाहेर प्रांती होते.

यांत घोडे स्वारांची संख्या फार थोडी होती. फ्रान्स देशांत घोडे चांगले निपजत नाहीत. व फ्रेंच लोकांस घोड्यावर ही चांगले बसतां येत नाही.

लष्करी विद्येचें जो चांगलें ज्ञान दाखवील त्यांस एकदम

---

* आपण होऊन सैन्यांत चाकरी करण्याकरीतां आलेले लोक

मराठी ... ग्रंथ संग्रह



मोठ्या सरदाराची जागा मिळावी असा कायदा केला.

शिपायांस कवाईत वगैरे शिकविण्या करितां चार जागा नेमल्या होत्या. त्या जागाः—

१ बुर्गेस, मध्यप्रांतीं.
२ लील, उत्तर ,,
३ ल्यान्स, पश्चिम ,,
४ बसांकान, पूर्व ,,

मेट्झ किल्ल्या जवळील सैन्य शत्रूस शरण गेलें, हें वर्तमान पारिस शहरीं कळलें तेव्हां फारच गोंधळ झाला. आणि लोकांचा दिल उडून गेला. कारण आतां नवीन सैन्य तयार करून जर्मन लोकांच्या उत्तम व अनुभवी सैन्याबरोबर लढण्यास पाठविणें म्हणजे निर्दयपणा होय, इत्यादि अनेक कारणांमुळें तह करावा असें कित्येक लोक म्हणत होते. या खेरीज त्या वर्षीं पीक चांगलें आलें नव्हतें. शत्रूस वरचेवर धान्याची खंडणी द्यावी लागत असे. यामुळें धान्याचा सर्व देशभर दुष्काळ पडत चालला होता. देशांतील व्यापार अगदीं बंद पडला होता. आपआपसांत तंटे चालले होते. असें होतें तरी देखील लढाईची तयारी मोठ्या सपाट्यानें चालली होती.

पारिस शहरास शत्रूचा वेढा पडल्यानें बाहेर प्रांतीं जाण्या येण्याची वाट अगदीं बंद झाली. तेथील लोकांस वाटलें कीं बाहेर प्रांतांत कोणी तरी चांगला मनुष्य पाठवावा, म्हणजे तो तिकडे सैन्य तयार करील; व तेणें करून

शहरास बरीच मदत होईल. हें काम ग्यांबट यानें पत-करलें, आणि अक्टोबर महिन्याचे ७वे तारखेस सकाळी ११ वाजतां विमानांत बसून निघाला. तें विमान अमिओंग शहराजवळ जाऊन पडलें. तेथून तो रुआंग शहरीं गेला आणि ९वे तारखेस रात्रीं टूर्स शहरीं जाऊन पेहोंचला.

तें विमान जर्मन लोकांच्या छावणीवरून जात असतां प्रशियाचे राजानें कौंट बिस्मार्क यास विचारलें कीं, तो अभाळांत काळा ठिपका कशाचा दिसतो. तो ह्मणाला फ्रान्स देशाचा प्रधान ग्यांबट विमानांत बसून टूर्स शहरीं जात आहे. आज तो तुह्मांस येथें दिसत आहे. उद्यां पहा सर्व देशामध्यें दणाण करून सोडील. बायका पोरां सुद्धां लढाईस तयार करील.

ज्या दिवशीं ग्यांबट टूर्स शहरीं पोहोंचला, त्याच दिवशीं जनरल गारिबाल्डी तेथें आला आणि थोडेसें सैन्य घेऊन लागलींच १२ वे तारखेस टूर्स शहर सोडून निघाला.

ग्यांबट यानें अक्टोबरचे ९ तारखेस खालीं लिहिलेलें भाषण केलें.—

"फ्रान्स देशास परदेशस्थ शत्रूच्या हातून सोडविण्याकरितां पारिस शहरच्या लोकांच्या, व लोकसत्तात्मक सरकारच्या हुकमानें मी आज तुह्मांमध्यें आलों आहे. १७ दिवस झाले पारिस शहरास शत्रूचा वेढा पडला आहे. ज्या वेळेस शत्रु त्या शहरा जवळ आला त्या वेळेस शहरांत दारू

गोळा किंवा शिपाई कांहीं एक नव्हते. तरी सर्वानुमतें लढण्याचा निश्चय झाल्यावर ४,००,००० शिपाई तयार केले आहेत. १,००,००० मात्रिक तयार होत आहेत. सर्व शहरांत तोफा बंदुकी व दारू याचे कारखाने सुरू आहेत. १०,००,००० कार्तुसें रोज बापका तयार करीत आहेत. अजून त्यांनीं शत्रूस मोर्चा वगैरे कांहीं बांधूं दिला नाहीं सप्टेंबरचे ४ थे तारखेस त्या शहरांत ४०० तोफा मात्र होत्या. आज तेथें ३८०० तोफा व एक तोफेस ४०० बार करण्यापुरती दारू व गोळा तयार आहे. प्रत्येक मनुष्य आपलें काम मनोभावें करून करीत आहे. लढाया करितां जागोजाग तटबंदी चालली आहे. रात्रं दिवस शिपाई तयार करण्याचें काम चाललें आहे. तें शहर आतां शत्रूस अजिंक्य झालें आहे. दगा किंवा दुष्काळ या खेरीज तें शहर शत्रूच्या हातीं लागत नाहीं. आतां तुह्मांस देखील तुमच्या देशाचें एक मोठें काम बजाविणें आहे. तें हें कीं तुम्ही लढाई खेरीज दुसरी गोष्ट सुद्धां मनांत आणूं नये. लोकसत्तात्मक राज्याची शक्ति किती असते, हें शत्रूस दाखवा. बादशाही सरकारनें फ्रान्स देशास ज्या घोंटाळ्यांत घातलें आहे. त्यांतून त्यास मुक्त करा. आतां संकट किंवा अडचण कांहीं एक मनांत न आणतां तयारीस लागा. आपणांमध्यें एकी नव्हती ह्मणून आपला पराभव झाला. लोकसत्तात्मक राज्यानें आपणां सर्वांस एक केलें आहे. आपणांजवळ मनुष्यें पुष्कळ आहेत, पैसा आहे व काम करणारे लोक ही आहेत. सर्व जगानें आपणांस सामान पुरवावें अशी तजवीज केली आहे. आतां आळस सोडा. उद्योगास

लागा . शत्रूचा पराभव करण्यास जितक्या युक्त्या सुचतील तितक्या करा. ही सर्व देशाची लढाई आहे. हें अता सर्वांचें राज्य आहे. आपली ही दीन दशा पाहून परमेश्वरास करुणा येईल. पराभव झाल्यामुळें फ्रेंच लोक चकित झाले, त्यांस कांहीं सुचेना, असें ह्मणून घेऊं नका. पांच लाख सैन्या सुद्धां शत्रू आज आपल्या देशांत आहे. जर तुम्ही धैर्य धरून लढाल तर तुमची जी जगतांत योग्यता आहे त्यांत काडीभर देखील कमतरता येणार नाहीं. बादशहास भ्रष्ट केलें, लोकसत्तात्मक राज्य स्थापिलें, असा सर्व घोंटाळा केला ह्मणून फ्रेंचांचा पराभव झाला, असा दोष लावून घेऊं नका. कोणत्याही प्रकारचें राज्य होवो, व कसाही घोंटाळा होवो, परंतु फ्रेंच लोक मोठे धैर्यवान. ते सर्व एकच. आपल्या देशाकडे कोणास डोळा उचलून पाहूं देणार नाहींत, असें जगास दाखवा. पारिस शहरास वेढा पडला आहे पण तुह्मी पहा कीं तेथें शत्रूची काय दशा होते ती. जर्मन लोकांच्या मनांत फ्रान्स देशास दुसऱ्या पंक्तींत घालावयाचें आहे. अलसास व लारेन हे दोन प्रांत जर्मन लोक विजयी झाले ह्मणून मागत आहेत. अशा प्रकारें मान खंडणा करून घेण्यापेक्षां प्राण द्यावे हें बरें. आपल्या देशाचें रक्षण करा येवढेंच सर्वांस सांगणें आहे. हा फ्रान्स देश दुसऱ्याचे ताब्यांत देण्याकरितां का आपल्या पूर्वजांनी याचें इतके दिवस रक्षण केलें. हा देश तुमचा आहे. तुह्मी जर याचें रक्षण करणार नाहीं तर काय अन्य देशचे लोक येऊन याचें रक्षण करणार आहेत?

या देशाकरितां तुमचे वडवडील रात्रं दिवस हातांवर शिरें घेऊन लढले. त्यांचेच तुह्मी वंशजना. आपल्या देशास संकटांतून मुक्त करा. तुह्मीं जर एकोप्यानें झटाल तरच तुमची जन्मभूमी जर्मन लोकांच्या हातून सुटेल. जसा तुमच्या पूर्वजांस फ्रान्स देशाचा अभिमान होता. जसें त्यांस फ्रेंच या नांवाचें भूषण वाटत होतें. जसा त्यांनीं फ्रेंच नांवाचा डंका जगतीवर गाजविला. तसें कांहीं तरी तुह्मीं करा,- आणि त्यांचेच वंशज आहांत असें शोभा. फ्रान्साच्या सर्व शूर पुत्रांस माझें सांगणें आहे कीं, जसे आपले पूर्वज एका आईच्या लेंकरांसारखे एक जुटीनें वागले आणि फ्रेंचांचें नांव या भूमंडळावर गाजविलें, तसेंच तुह्मीं करा. आपल्या कुळाचा, आपल्या देशाचा अभिमान धरा. आतां या देशाचें सूत्र तुमचें हातीं आहे. हें राज्य तुमचें आहे. या नवीन स्थापलेल्या राज्याचे तुह्मींच खांब आहांत. फ्रान्स देश व लोकसत्तात्मक राज्य दीर्घायुष्यी होवो."

सर्व लोक तह करा असें फ्रेंचांस ह्मणूं लागले. ते वेळेस फ्रेंचांनीं जाहीरनामा प्रसिद्ध केला तो येणें प्रमाणें:—

" डेन्मार्क देशास कोणीं नागविलें ! आस्ट्रियन लोकांशीं विनाकारण लढाई कोणीं केली ? हनोवर, हेसे, फ्रयांकफोर्ट वगैरे शहरें जबरदस्तीनें आपल्या राज्यास कोणीं जोडलीं ! सर्व युरोप खंडास आपल्या ठिकाणीं तयार रहाण्यास कोणीं लाविलें. स्वस्थता राखण्याकरितां फ्रेंचलोकांनीं आपणांवर संकट ओढून घेतलें आहे. लुईसेनांच्या वेळेस

ही लढाई होणार होती परंतु आह्मीच मागें घेतलें. आतां तरी यांच्या एकंदर तयारी वरून कोण म्हणेल बरें की, फ्रेंच लोकांशीं लढण्याचें जर्मन लोकांच्या मनांत नव्हतें. फ्रान्स देशाचा नाश करावा असें जर्मन लोकांच्या मनांत आहे. ही लढाई बंद करावी ह्मणून आह्मी पुष्कळ खटपट केली, तरी देखील आह्मांस लढण्याचा प्रसंग आलाच. जरी आमची चांगली तयारी नाहीं तरी चिंता नाहीं, परंतु अशी लढाई करूं कीं सर्व जगास हळहळायास लावूं. आमचा पराभव झाला तर आमचें धैर्य व पराक्रम तर त्या बरोबर जाणार नाहीं. कधीनाकधीं तरी हात दाखवूं. आमचे दिवस असेच राहतील असें नाहीं. हे दिवस गेल्यावर पाहून घेऊं ही देशाची लढाई आहे. आह्मी मेलों तर आमचीं पोरें लेकरें या अपमाना पासून आह्मांस सोडवितील, यांत संशय नाहीं.

पारिस शहरांत कडेकोट तयारी केली. १० पलटणी नायकांच्या तयार केल्या. अकटोबरचे ६ वे तारखेस अन्य पक्षांच्या लोकांनीं फार गडबड केली. तेव्हां कांहीं सैन्य गांवांत आणून ती गडबड मोडावी लागली. अशा प्रकारें फ्रेंच लोकांचें दिवसेंदिवस आंतच पाऊल पडत चाललें. आपआपसांत तंटे होत होते. बाप एका तटांत तर मुलगा दुसऱ्या तटांत अशी सर्व देशभर गोष्ट बाद-दशाही होऊन गेली होती. पारिस शहरा बाहेर ८ वे, ९ वे आणि १० वे तारखेस लहान लहान लढाया झाल्या. यांत फ्रेंचलोकांचा पराभव झाला.

शेवटच्या दिवशीं सेंट क्लौड येथील राजवाड्याचा फार नाश झाला. हा वाडा फार सुंदर होता. याच दिवशीं शहरांतून गेलेलीं दोन विमानें जर्मन लोकांनीं धरलीं.

आक्टोबरचे १३ वे तारखेस सकाळीं जनरल व्हिनाय यानें क्लमार्ट खेड्यावर हल्ला करून तें खेडें घेतलें. परंतु लागलीच दोन प्रहरच्या सुमारास जर्मन लोकांनी परत घेतलें. २० वे तारखेस फ्रेंचलोकांनीं एकाएकीं हल्ला करून बरजेट गांव घेतलें. तें जर्मन यांनीं तिसरे दिवशीं परत घेतलें.

जनरल ट्रोशू यानें पारिस शहराजवळ जमलेल्या सैन्याचे तीन भाग केले. पहिल्या भागास शहरचें रक्षण करण्याचें काम, दुसऱ्या भागास शत्रूवर हल्ला करण्याचें काम, यावर जनरल डुक्रो मुख्य होता, आणि तिसऱ्या भागास किल्ल्यांचें रक्षण करण्याचें काम सांगितलें. यावर व्हिनाय मुख्य होता. १ ल्या भागांत १,५०,००० लोक, २ ऱ्या भागांत ९०,००० लोक आणि ३ ऱ्या भागांत १०,०००० लोक होते.

आक्टोबरचे २१ वे तारखेस सकाळीं पारिस शहरचे पश्चिमेस मांट विलेरियन किल्ल्याचे आश्रयानें नगीवर देऊळावर फ्रेंचलोकांनीं हल्ला करून ३८० शिपाई आणि ७ सरदार जर्मन यांचे पाडले.

अशा रोजच्या रोज लहान मोठ्या लढाया पारिस शहराभोंवतीं होत होत्या, तरी देखील आंतील घाटोळ्या कमी झा-

ला नाहीं. बाहेर प्रांतीं ही त्याच प्रमाणें घोटाळा सुरू होता. पारिस येथील सरकारचा कोणीच हुकूम मानीनांत असा सर्व देशभर एकच गोंधळ होऊन गेला होता. एकंदरींत सर्वांच्या मनांत शत्रूस आपल्या देशांतून हाकून द्यावें असें होतें. परंतु एकत्र मसलत नव्हती, चांगले सरदार नव्हते, व हत्यारें ही चांगलीं नव्हती.

ह्या सर्व घोटाळा मनांत आणून एका फ्रेंच गृहस्थानें भाषण केलें तें:—

"आजच्या स्थितीवरून दिसतें की आतां काहीं फ्रेंच नहीत. कारण आपल्या देशाचें स्वातंत्र्य गेलें. आपले सुखाचे दिवस गेले. आपल्या सैन्यास शत्रूच्या हातीं लागण्याची व शरण जाण्याची सवय लागली. लढाई करावी कशी हें आपले सरदार विसरले. पारिस शहराजवळील शिपाई शत्रूला पहातांच पळतात. आपीन शहराचें सैन्य जगांत उत्तम परंतु शत्रूस पाहिल्या बरोबर त्याची दंतखिळी बसते. आमचे सरदार आतां युद्ध कौशल्य शिकत नाहींत. जी विद्या आमच्या पूर्वजांनीं उदयास आणली, तीच विद्या त्यांचे चिरंजीव विसरून गेले. आपल्या सैन्याचा जो जगावर छाप होता, तो गेला. आपण आतां तोंडाचे मात्र सुघड झालो आहों रोज नवीन राज्य व्यवस्था करण्यास मात्र तयार आहोंत, एकमेकांचा द्वेष करणें, एकमेकांवर अपराध आणणें हे सध्या आपले काम झालें आहे. शत्रूनें मानेवर तरवार ठेवली हें कोणाच्याच ध्यानांत येत नाहीं. याचें मोठें आश्चर्य

वाटतें. * फिलिप आणि † आलेक्झांदर यांनीं जसें ग्रीक लोकांस जिंकलें, ‡ अलारिक यानें जसे रोमन लोकांस जिंकलें, तसेच जर्मन लोक आज आम्हांस जिंकीत आहेत, याची कोणासच लाज नाहीं. शत्रूनें सर्व जर्मन देश एकत्र केला एवढेंच नव्हे, परंतु फ्रेंच लोकांच्या मदती शिवाय, फ्रेंच लोकांस तुच्छ मानून, फ्रेंच लोकांच्या उरावर पाय देऊन सर्व युरोप खंड आपल्या ताब्यांत आणील यांत संशय नाहीं. कारण आम्ही फ्रेंच आहों हें विसरून गेलों आहों.

डी करोट्री पारिस शहरांतून विमानांत बसून § ब्रिटनी प्रांतांत गेला. त्यानें तेथें भाषण केलें तें :—

"शिपायांनो, लोकसत्तात्मक सरकारानें व पारिस शहराच्या लोकांनीं मला तुम्हां कडेस पाठविलें आहे. उद्यां शत्रु तुमचा प्रांत जिंकावयास येईल. त्याचा सत्कार करण्या करितां चांगली तयारी करा. कशी तयारी करावयाची हें तुम्हांस माहीत आहेच, कारण तुम्ही शिपाई आहां. तोफा, बंदुकी, दारू, गोळा वगैरे सर्व तयार असूंद्या. सर्व फ्रान्स देशांत गोंधळ होऊन गेला आहे. तुम्हीच फ्रान्स देशास शत्रूच्या हातून सोडवाल असें त्यांस वाटत आहे. तर आतां पारिस शहरास सोडविण्यास चला. बाताबेतानें, बंदोबस्तानें व एकोप्यानें वागा. फ्रान्स देशांतील एका

---

* म्यासिडोनिया देशाचा राजा. हा देश ग्रीस देशाचे उत्तरेस आहे. † फिलिप राजाचा मुलगा. ‡ गाल लोकांचा राजा, यानें सन ४१० मध्यें रोम शहर घेतलें. § फ्रान्स देशांतील एक प्रांत आहे.

प्रांताचे लोकांनीं जर्मन यांची दशा केली, असें नांव मिळवा. खरे फ्रेंच कायते ब्रिटानी प्रांतांत आहेत, अशी कीर्ति संपादा. कसेंही करा आणि आपल्या देशास मुक्त करा, त्याचा सूड घ्या. तुमचें शौर्य व अभिमान पाहून मी तुह्मांकडेस आलों आहें, व तुमचें सेनापतित्व पतकरलें आहे. याचा अभिमान असूं द्या. हें लोकसत्तात्मक राज्य चिरकाळ चालेल असे करा."

पारिस शहरच्या सैन्यानें २७ वे तारखेस रात्रीं शत्रूवर हल्ला केला आणि ली-बर्जेट गांव घेतलें येथून भाजीपाल्याचा पारिस शहरास बराच पुरवठा झाला. ३० वे तारखेस जर्मन लोकांनीं तें गांव परत घेतलें. या दिवशीं हजारों बायका व मुलें शहर सोडून गेलीं. कारण धान्याची तूट पडेल असा सुमार दिसूं लागला होता.

३१ वे तारखेस मेट्झ किल्ला शत्रूच्या हातीं लागल्याची बातमी आली तेव्हां रेडरिपब्लिकन पक्षाच्या लोकांनीं शहरांत फारच गडबड केली. सर्व दुकानें बंद झालीं. बायका मुलें घरांत लपून बसलीं, व बहुतेक सर्व पुरुष हॉटेल-डी-वील वाड्याजवळ जमले. ट्रोशू फाव्र.सायमन. रिकार्ड, गार्निन, आणखी दोन गृहस्थ इतके मिळून दोन प्रहरच्या तीन वाजण्याचे सुमारास तेथें गेले. हे तेथें गेल्याबरोबर रेडरिपब्लिकन पक्षाच्या लोकांनीं दरवाजे बंद करून सैन्यांचे पहारे बसविले. हुकुमा शिवाय कोणास बाहेर जाऊं देईनात. जनरल ट्रोशू, वगैरे मंडळीस राजिनामे देण्यास सांगितलें. कित्येक लोक त्यांच्या अंगावर

गेले. ट्रोशूचें अंगावरील वैर भूषणें तोडलीं. फाव्र यास खुर्चीवरून ओढलें. सायमन्न तर लोकांच्या पायांखालीं तुडवून मेलाच असतां परंतु त्याच्या स्नेह्यांनीं त्यास उचलून धरिलें. या मंडळीस कैदी आहां असें सांगून दुसऱ्या पक्षाचे लोक जेवणास निघून गेले. इतक्या संधींत **सायमन, फ्यानिन व पिकार्ड** हे गर्दींतून सुटून गेले, आणि वाड्याबाहेर पडतांच लष्करी अंमलदारांस तयार राहण्याची सूचना करून आपण कांहीं सैन्य घेऊन आले आणि बाकीच्या लोकांची सुटका केली.

नंतर त्यांनीं एक याद काढून सर्व शहरांत फिरविली. त्यांत लिहिलें होतें कीं, 'लोकसत्तात्मक राज्य असावें असें ज्याचें मत असेल त्यानें या यादीवर सही करावी.' त्या यादीवर ५,६७,९७६ लोकांच्या सह्या झाल्या. दुसरे दिवशीं खालीं लिहिल्या प्रमाणें त्यांनीं जाहीरनामा प्रसिद्ध केला,—

" सर्व लोकांच्या सांगण्यावरून आम्ही हें काम पतकरलें आहे, आणि तें काम आम्ही मनापासून करीत आहोंत. आमचें लक्ष देशाच्या व आपल्या मुक्ततेकडे लागलें आहे. तुम्ही वरचेवर दंगा करितां हें पाहून आमचें धैर्य अगदीं खचून जातें. लोकसत्तात्मक राज्य जर चालवाल तरच तुमचा बचाव होईल, नाहीं तर या बरोबरच तुमचा व तुमच्या देशाचा नाश होईल. तुह्मांकरितां आह्मीं आपला जीव धोक्यांत घातला आहे. ज्या वेळेस शत्रु येथें आला त्या वेळेस आपणांजवळ लढण्याचें कांहीं तरी साधन होतें काय? हें शहर सहज शत्रूच्या हातीं लागलें असतें

परंतु तुम्ही सर्वांनीं लढाईची तयारी केली ह्मणूनच ना आज हें शहर अजिंक्य झालें आहे. सर्वांनीं एक असावें असें तुह्मांस वाटत नाहीं काय! आपणां मध्यें एकी नव्हती ह्मणूनच आपला पराभव झाला. आतां एकीनें राहा. हीच आमची सर्वांस विनंती आहे.

अक्टोबरचे २० वे तारखेस इंग्रज सरकारचे मिनिस्टर अर्ल ग्र्यानवील यानीं राशियन, आस्ट्रियन वगैरे सरकारांच्या अनुमतानें असें प्रसिद्ध केलें कीं "आतां लढाई फारच शेवटास गेली आहे. विनाकारण फ्रेंच लोकांचा नाश होत आहे. तर आतां दोन्ही सरकारांनीं आपआपली मतें एकमेकास कळवून तह करावा हें उत्तम आहे. सध्यां फ्रान्स देशांत कायमचें सरकार नाहीं तरी चिंता नाहीं, आहे त्याच सरकारची सभा भरूं द्यावी. व त्या ठिकाणीं त्यांनीं तह करण्याचा विचार करावा." हें दोन्हीं सरकारांस असें वाटल्या वरून फ्रेंच लोकांनीं एम. थीर्स यास कौंट बिस्मार्ककडे पाठविलें. त्याचें खालीं लिहिलेल्या ४ कलमा बद्दल बोलणें झालें.

१ न्याशनल असेंब्ली भरून विचार होई पर्यंत लढाई तहकूब असावी.

२ किती दिवस लढाई तहकूब असावी.

३ तहकुबीच्या दिवसांत लढणाऱ्या फौजेनें कसें वर्तावें.

४ तहकुबीच्या दिवसांत वेढा पडलेल्या किल्ल्यांत व शहरांत तितक्या दिवसां पुरतें धान्य नेऊं द्यावें, किंवा नाहीं.

पहिल्या ३ कलमांची व्यवस्था नीट रीतीनें झाली,

परंतु ४ थे कलमाचे वेळेस मात्र घोटाळा पडून सर्वच गोष्टी जागच्या जागीं राहिल्या.

नंतर जूल्स, फाव्र, यानीं नोवेंबरचे ७ वे तारखेस जा- हीरनामा प्रसिद्ध केला तो:—

"लढाई तहकूब करण्याचें जर्मन लोकांनीं नाकारिलें. कारण त्यांचा हेतु अजून सिद्धीस गेला नाहीं. आह्मी त्यांस अल्सेस व लारेन हे दोन प्रांत दिले नाहींत. आमच्यानें हे दोन प्रांत देववत नाहींत व आह्मी देणार ही नाहीं. हे दोन प्रांत मिळावे ह्मणून जर्मन लोक फ्रान्स देशाचा नाश करीत आहेत, व यांनीं पारिस शहरास वेढा घातला आहे. सर्व देशांत स्वस्थता असावी असें त्यांचें मनांत नाहीं हें उघड दिसत आहे. इंग्लिश, आस्ट्रियन, राशीयन वगैरे सरकारांनीं सांगितलें कीं लढाई तहकूब करावी व फ्रेंच लोकांस एकत्र जमून विचार करण्यास सवड द्यावी. असें करूं देणें हें न्यायास व नीतीस अनुसरून आहे. बादशाही राज्य गेलें ते वेळेसच तह करावा असें आह्मीं प्रसिद्ध केलें. परंतु दुर्घट मागणें मागून तह करण्याचें जर्मन लोकांनीं नाकारिलें. सर्वांच्या सांगण्यावरून आतां देखील लढाई तहकूब करावी असें आह्मी बोलणें लाविलें होतें, परंतु पारिस शहरांत धान्याचा पुरवठा करायचें ह्मटल्या बरोबर त्यांनीं तें बोलणें नाकारिलें. वेढा पडलेल्या शहरांस तहकुबीच्या दिवसांत धान्याचा पुरवठा करूं न देणें हा अन्याय नव्हे काय? लढाई न करितां एक महिना उगीच बसून सांठविलेलें धान्य खाणें ह्मणजे अमुक दिवशीं शत्रूस

शरण जा ह्मणण्या पैकीं नव्हे काय? किंवा शस्त्र टाकून शरण जा असें ह्मणणें नव्हे काय, जें शस्त्र आज आह्मीं येवढ्या निश्चयानें हातांत धरलें आहे, तें टाकूं असें जर्मन लोकांस वाटलें काय. फ्रेंचांस व फ्रान्स देशास योग्य असें काम केल्या शिवाय कधीं रहाणार नाहीं."

पारिस शहरा बद्दल कौंट बिस्मार्क याचें असें मत होतें कीं लढून तें शहर लवकर हास्तगत होणार नाहीं. व लढाईनें विनाकारण आपल्या सैन्याचा नाश होईल. मग मेलेल्यांचे मोबदला जर्मनींतून दुसरें सैन्य आणावें तर त्याचा फ्रेंच लोकांपुढे टिकाव लागणार नाहीं. तर वेढा घालून शहरांत धान्य वगैरे सामान जाण्याचें बंद करावें; ह्मणजे दुष्काळ पडून अपोअप शहर हास्तगत होईल.

# भाग ८

पारिस शहराला वेढा पडल्यावर जर्मन लोकांनीं आपल्या घोडे स्वारांच्या तीन टोळ्या केल्या; आणि त्यां बरोबर एक एक पायदळाचा भाग दिला. त्यांस सेन व ल्वार या दोन नद्यांच्या मधील प्रांत जिंकून खंडणी घेण्याचें काम सांगितलें. त्यांपैकीं एका टोळीनें पारिस शहराच्या नैऋत्य दिशेस ३५ मैलावर एपरनान ह्मणून गांव आहे, तेथें फ्रेंचांचें नवीन सैन्य तयार होत होतें, त्रास हाकून दिलें,

आणि तें गांव घेतलें. आल्केस गांवा जवळ ह्यांचा तळ होता त्या तळावर फ्रेंच *टायरर्स यानीं रात्रीस एकाएकीं हल्ला करून त्यांतील बहुतेक लोक मारले, ह्मणून अक्टोबरचे ९ वे तारखेस जर्मन लोकांनीं तें गांव जाळलें. आणि जाहीर केलें कीं, "जर फ्रेंच शिपाई जर्मन शिपायास लढाई करून मारील तर मात्र अपराध नाहीं. परंतु रयत लोकांनीं जर्मन शिपायास मारलें तर एका शिपायाबद्दल चार माणसांचा जीव घेतला जाईल."

दुसरी टोळी मात्र घेत घेत अक्टोबरच्या ४ थे तारखेस अर्लीन शहराच्या उत्तरेस १५ मैलांवर येऊन पोहोंचली.

जर्मन लोक अर्लीन शहराचे जवळ आले, हें वर्तमान ग्यांबट यानें ऐकल्यावर तेथें फ्रेंच सैन्य जमा झालें होतें तें त्यांजवर पाठविलें. तें सैन्य २०,००० होतें. यावर डीलामोटरोग मुख्य होता. तें सैन्य ५ वे तारखेस टुरी गांवाजवळ जाऊन पोहोंचलें. हें वर्तमान पारिस शहराजवळ प्रशियाचे राजास कळतांच त्यानें वानडरटान् याला ४०,००० सैन्य देऊन तिकडे पाठविलें. तो ७ वे तारखेस फ्रेंचांचे सैन्याजवळ येऊन पोहोंचला. तेव्हां फ्रेंच सैन्य मागें सरलें आणि अथनें गांवाजवळ उतरलें. जर्मन सैन्यही ९ वे तारखेस तेथें येऊन दाखल झालें १० तारखेस लढाई होऊन फ्रेंच मागें सरले या ठिकाणीं

---

*अव्यवस्थित सैन्य, बाजारबुणगे, पेंढारी.

फ्रेंचां जवळ तोफांची, दारू गोळ्याची व चांगल्या हत्यारांचें फारच कमताई होती. ११ वे तारखेस जर्मन लोकांनीं पुन्हा फ्रेंचांवर हल्ला केला. या वेळेस चोहों कडून वरचेवर फ्रेंच शिपाई येत होते, परंतु त्यांजवळ तोफा अगदीं नव्हत्या. त्यांत शत्रूच्या तोफांचा मारा जबरदस्त पडला. यामुळें फ्रेंचांची पळापळ झाली. थोड्या वेळानें अर्लीन शहराहून कांहीं तोफा आल्या. त्याच जर एक तास अगोदर येत्या तर फ्रेंच सैन्यानें अर्लीन शहराचें रक्षण केलें असतें. तरी जनरल *अर्गोस याच्या लोकांनीं भिंतीचा आश्रय करून व संगिनीनें लढून चारवेळ शत्रूस माघारें फिरविलें. जर्मन लोकांनीं त्यांवर तोफांचा मारा चालवून त्यांस तेथून पळाविलें. या ठिकाणीं ८,००० फ्रेंच शिपाई शत्रूच्या हातीं लागले.

११ अक्टोबर रोजीं जर्मन लोकांनीं अर्लीन घेतलें.

३०,००० अर्धवट शिपायांनीं ४०,००० उत्तम शिपायांवर जय मिळविला नाहीं ह्मणून ग्यांबट यास फार राग आला आणि डी-ला-मांटरोग यास कमी करून त्याचे जागीं डी-आरेलिस-डी-पालेडाईन्स यास नेमिलें. या सैन्यास आणखी सैन्य मिळवून त्यां सर्वांस शत्रूवर जाण्यास सांगितलें.

फ्रेंच लोक मोठ्या तयारीनें आपणावर येतात हें वानडरटान यास कळतांच तो अर्लीन शहर सोडून निघाला आ-

---

* फ्रेंच सरदार.

णि कोलमियर व माकान येथें तळ देऊन राहिला. नोवें-बरचे ९वे तारखेस फ्रेंचांनीं त्यांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला. ही लढाई दोन दिवस चालली होती. येथें जर्मन लोकांचा फारच नाश झाला, आणि ते पारिस शहराकडे पळाले.

हे वर्तमान टूर्स शहरीं पोहोंचल्यावर ग्यांबट यानें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो.

"सैनिक हो, मोठ्या धैर्यानें आणि पराक्रमानें तुह्मी एक लढाई जिंकली हाच पहिला जय. आतां कांहीं थोडी आशा आली. पारिस शहराच्या लोकांस फारच आनंद झाला. आतां आपली लौकरच सुटका होईल असें त्यांस वाटूं लागलें आहे. सर्व लोक तुमची वहावा करीत आहेत व उपकार मानीत आहेत. विश्वासू, हुशार व योग्य अधिकाऱ्याच्या हाताखालीं योग्य रीतीनें वागला ह्मणून तुह्मांस हा जय मिळाला. असेंच पुढें वागा. विपरीत काळ आला तरी तुह्मी धैर्य सोडिलें नाहीं, हें तुमचें विलक्षण व आश्चर्य कारक शौर्य पाहून सर्वांस कौतुक झालें आहे. आतां पारिस शहरावर चाल करा. तेथील लोक तुमची फार वाट पहात आहेत. हें ध्यानांत धरा. दृढ निश्चयानें आणि धैर्यानें वागा. आपल्या वरिष्ठांचा हुकूम माना, यांतच तुमचें व तुमच्या देशाचें कल्याण आहे. शत्रूची शक्ति किती आहे, हें आतां तुह्मांस कळलें आहे. एकदम शत्रूवर घालून जावें आणि त्याचा पराभव करावा हा जो फ्रेंच लो-

कांचा गुण आहे तो धारण करा. लोकसत्तात्मक रा-ज्याचा अभिमान असूं द्या."

प्रशियाचा राजा व सेनापति मोल्टक् यांचे पोटांत भीति उत्पन्न झाली. त्यांस वाटलें कीं, हरतऱ्हा करून ग्यांबट ल्वारथडीच्या सैन्यास पारिस शहरावर आणील. जर तें सैन्य आणि पारिसचें सैन्य एकत्र झालें तर आतां प्रमाणें पुन्हा घडी बसणार नाहीं. याकरितां त्या सैन्यास अड-थळा करण्याची त्यांनीं योजना केली ती.—

१ म्याक्लेंबर्गच्या ड्युकाच्या हाताखालीं १ ली व १३ वी कोर दिली, आणि पश्चिमेकडून त्या सैन्यावर त्यास पाठविलें.

२ व्हॉन्डरटान याच्या सैन्यास आणखी मदत देऊन त्यास त्या सैन्याचे तोंडावर पाठविलें.

३ फ्रेड्रिक चार्लस राजपुत्राचें सैन्य मेटस् किल्ल्याजवळ रिकामें झालें होतें. त्यांतील २ री कोर पारिस शहराक-डे घेऊन बाकीच्या सैन्यास त्या सैन्याचे उजवे बाजूवर पाठविलें.

कालमियरची लढाई झाल्यावर त्या सैन्यास ग्यांबट यानें पुष्कळ सैन्य आणवून मिळविलें. त्यांत को-णांस पोषाक होता कोणांस नव्हता. कोणांस थोडी कवाईत येत होती कोणांस मुळींच येत नव्हती. त्या सैन्याच्या सरासरी ७ कोर केल्या. त्यास १५ वी, १६ वी, १७वी, १८वी, १९वी, २०वी आणि २१ वी कोर अशीं नांवें दिलीं. हें सैन्य एकंदर २००००० झालें.

फ्रेडिकचार्लसचे सैन्याची व फ्रेंचांच्याल्वारथडीच्या सैन्या ची लढाई मार्स ला टूर गार्ड आणि व्हीन-लेडान याच्या रस्त्यावर झाली दुसरे दिवशी मांटरजीस, पीथीव्हर्स व टुरी येथें लढाई झाली. या दोन्ही लढायांत फ्रेंचांचा पराभव झाला.

वोन-लेडान या गांवात जर्मन लोकांची १९वी पलटन फ्रेंचांच्या सपाट्यांत सांपडली. ते लोक दारू गोळा संपे पर्यंत मोठ्या निकरानें लढले. त्या पलटणच्या *करनेलानें आपल्या सैन्यास उत्तेजन दिलें तें:—

"मुलानों, आपल्या राजानें आपणांस या खेड्याचें रक्षण करण्याचा हुकूम दिला आहे. हें काम खरोखर तुम्ही मोठ्या इमानानें बजावलें. आतां तुह्मां जवळील दारू गोळा संपला म्हणून भिऊंनका. अजून एक प्रकारचा दारू गोळा तुह्मां जवळ आहे. तो असा आहे कीं कधीं संपायाचा नाहीं. तो कोणता ह्मणाल तर संगिनी व तरवारी. धैर्यानें लढा, फ्रेंचांस माघारें फिरवां, या खेरीज जीव वांचविण्यास दुसरा उपाय नाहीं."

अशा प्रकारें ल्वारथडीच्या सैन्यास पारिस शहरावर येण्यास अडथळा झाला. या वेळेस जर पालाडिन यानें आपल्या सैन्याचे तीन भाग करून जर्मन लोकांस तिहींकडे पृथक पृथक अडवून धरलें असतें तर कांहीं उपयोग होता; परंतु तसें न करितां भिऊन तो उगीच पडून राहि-

*करनेल ही अम्मलदारी पदवी आहे.

ला. पारिस शहरावर जावें असा ग्यांबट याचा सक्त हुकूम आल्यावर त्यानें आपल्या डाव्या बाजूच्या सैन्यास पुढें चाल करण्यास सांगितलें हें पाहून फ्रेडिक चार्लस राजपुत्रानें म्याक्लेंबर्गच्या ड्युकास आपणाकडे येण्यास सांगितलें. याची व फ्रेंचांच्या डाव्याबाजूच्या सैन्याची टर मिनियर्स जवळ पहिली लढाई झाली. यांत जर्मन यांचा पराभव झाला. त्या सैन्यांस तसेंच पुढें जाऊं द्यावयाचें तें न करितां पालाडिन यानें त्यास माघारें अर्लीन शहरा जवळ बोलाविलें; आणि मांटव्हील, व्हीलेपन आणि फावरोलस यां गांवीं तळ देऊन राहिला.

फ्रेंच उगीच तळ देऊन बसले आहेत. ही संधि राजपुत्रानें पाहून आपलीं तिन्हीं सैन्यें एकत्र केलीं; आणि पारिस शहरच्या वाटेवर मजबूत जागा पाहून तळ दिला. दिसेंबरचे १ रे तारखेस फ्रेंच लोकांनीं त्यांस तेथूनही मागें सारलें. याच दिवशीं मोरेच्या गढी जवळ लढाई झाली तेथें फ्रेंचांच्या एका टोळीचा पराभव झाला. २रे तारखेस सकाळीं जर्मन लोकांनीं एकाएकीं फ्रेंच सैन्यावर अथर्न गांवाजवळ हल्ला केला; आणि त्यास ४ मैल मागें सारलें. पुन्हा डोर्सी खेड्या जवळ शत्रूनें त्यास गांठलें. या ठिकाणीं फ्रेंचांची फारच धांदल होऊन दोन बाजूंस पळापळ झाली.

ग्यांबर्ट यानें पालाडिनास अनेक मसलती सांगितल्या होत्या. परंतु त्यांतील एकाचीही त्यानें योजना केली नाहीं, ग्यांबटठूर्स शहराहून आगगाडींतून अर्लीन शहराला येत असतां ला-चापेल खेड्या जवळ ती गाडी जर्मन घो-

डेस्वानी अडविली. हे खेडे आर्मीन पासून १० मैलांव-र आहे. ग्यांबट या गाडीतून उडी टाकून बुर्गेन्सी गांवाकडे पळून गेला.

दिसेंबरचे ६ वे तारखेस जर्मन लोकांनी पुन्हा आर्लीन घेतले. या ठिकाणी १०,००० फ्रेंच शिपाई जर्मन लोकां-च्या हातीं लागले.

अशा प्रकारें फ्रेंचांचा पराभव झाला, हे पाहून ग्यांबट याने जनरल पालाडिनास कामावरून काढिले. त्या सै-न्याचे दोन भाग झालेच होते. त्यांत एकावर जनरल शेन्झीयास नेमले, व दुसऱ्या भागावर जनरल बोरबकी यास नेमले. त्यांस हुकूम दिला तो:—

१ जनरल शेन्झी याने ल्वार आणि सेन या दोन न-द्यांचे मधील प्रांतांतून पारिस शहरावर जावें.

२ बोरबकी याने बेलफर्ट किल्ल्याचा वेढा उठवून जर्म-नींतून येण्याचे रस्ते अडवावे.

ग्यांबट ज्या योजना करी त्या खरोखर फार चांगल्या असत. परंतु सैन्यावरील अधिकारी त्या लवकर अमलांत आणीत नसत. कारण नवीन शिपायांच्या हातून त्या शेवटास जातील न जातील अशी त्यांस भीति वाटत असे.

त्याप्रमाणेच्या सैन्याची बातमी प्रशियाचे राजास कळल्या-वर त्याने आपल्या सैन्यांत जाहीरनामा प्रसिद्ध केला तो.—

"शिपायांनो, पुनः कठीण प्रसंग आला आहे. मेटस व सेडन येथे आपण फ्रेंच सैन्याची धूळधाण केली. परंतु

द्या लोकांनीं फार मेहनत करून नवीन सैन्य तयार केलें आहे. सर्व फ्रेंच लोक शिपाई बनले आहेत. अतां त्यांचें सैन्य आपणां पेक्षां अधिक झालें आहे. तरी देखील दोन चार वेळ तुह्मी त्याचा पराभव केला. पुष्कळ सैन्य असलें ह्मणजे जय मिळतो असें नाहीं. तुमचें शौर्य, धैर्य व ऐक्यता जय मिळवीत आहे. कांहीं दिवसां पूर्वी आपलें जें सैन्य स्ट्रासबर्ग व मेट्स येथें होतें तेंच सैन्य आज अमिआंग, अर्लीन व डिजान एथ पर्यंत देश जिंकीत आलें आहे. अर्लीन व अमीआंग येथें तुम्ही फारच मोठे जय मिळविले. तुमचें शौर्य व निष्ठा पाहून मला फार आनंद झाला. अशा प्रकारें तुम्ही आपल्या देशाची कीर्ति वाढवली हें पाहून मी व सर्व जर्मन लोक, मोठ्या सरदारांपासून ते लहान शिपयां पर्यंत, तुमचे अभारी आहोंत. असेंच जर लढाल तर आपणांस योग्य असा तह केल्याशिवाय कधीं सोडणार नाहीं. फ्रेंच पुन्हा आपल्या वाटेस जाणार नाहींत असें करूं"

---

# भाग ९.

पारिसचें सैन्य लढाई करण्यासारखें तयार झालें हें पाहून २९वे तारखेस हल्ला करून उत्तरेचे बाजूनें बाहेर पडावें आणि *लोअरसेन नदींतून

---

* पारिस शहरापासून तो समुद्रास मिळे पर्यंत इस लोअर सेन असें ह्मणतात.

शहरास धान्याचा पुरावा करावा असा ट्रोशूनें बेत केला. आणि टूर्स शहरीं मंडळीस बातमी कळविली. ग्यांबट याकडून निरोप आला कीं, दक्षिणेस हल्ला करा, व आम्हीं ही इकडून ... येतों. ट्रोशूनें जर्मन लोकांस फसविण्या करितां पूर्वेस व उत्तरेस हल्ला करण्याचा झोक दाखवून खरा हल्ला दक्षिणेस व अग्नये दिशेस केला. या बाजूस किल्ले व कोट पुष्कळ आहेत. ह्मणून जर्मन लोकांची छावणी विलियर्सकोनी, नाइस ली. ग्यांड वगैरे ठिकाणीं होती. शांपेन व ब्राई येथे ही कांहीं लोक होते. पारिस शहर आणि जर्मन लोकांचा वेढा यांमध्यें मार्न नदी व दोन तीन मैल लांबी रुंदीचें मैदान आहे. याच ठिकाणीं लढाई झाली.

२८ वे तारखेस संध्याकाळीं ट्रोशूनें आपलें सर्व सैन्य एका ठिकाणीं गोळा करून भाषण केलें तें:—

"पारिस शहराचे रहवासी, व शिपायांनो. शत्रूनें आपणांस जिंकलें असें जगभर झालें आहे. त्यानें सर्व युरोप खंडास भिववयास लाविलें आहे. सर्व राजे आप आपल्या ठिकाणीं चूप बसले आहेत; परंतु फ्रेंच लोक तसें बसले नाहींत. ते याशीं लढत आहेत. शेवटची लढाई करण्याकरितां उद्यां आपण आपलें अवडतें शहर सोडून जाणार आहोंत. आज पर्यंत रक्तपात झालेला मनांत आणूं नका. उद्यां रक्ताच्या नद्या वहावयास लावा. याचा दोष ज्यानें न्यायाचें व नीतीचें उल्लंघन

केलें त्यावर आहे. ईश्वरावर भरंवसा ठेवा. आपण आपल्या देशाकरितां व अब्रू करितां लढत आहांत. लढाईची चांगली तयारी असावी ह्मणून आज पर्यंत दम धरिला. आतां चांगली तयारी झाली आहे. परंतु तुमच्या धैर्याची गरज आहे. कित्येक लोकांनीं तुमचें चित्त व्यग्र केलें आहे. परंतु आतां तिकडे लक्ष देण्याची ही वेळ नव्हे. आप आपसांत कलह ह्मणजे शत्रूस उत्तेजन देण्यासारिखें आहे. एक हुकमानें व एकोप्यानें वागा. तुमच्या पाठीवर कोणी नाहीं असें समजूं नका. शहरांतील नायका मुलें देखील तुह्मांस सहाय करण्यास तयार आहेत. लढून मरावें यांतच कीर्ति आहे. पळून देण्यासारखी दुसरी फजिती नाहीं. हें लक्षांत ठेवा आणि तुह्मांस योग्य अशी लढाई करा."

२८ वे तारखेस रात्रीं ११ वाजतां **सेन** आणि **मार्न** याचे संगमाकडे **सेंट जर्मन** किल्ल्यावरून तोफा सोडण्यास फ्रेंचांनीं आरंभ केला. येथून इतक्या रात्रीस तोफ सोडण्यामध्यें दोन हेतू होते. एक ब्लारथडीचें सैन्य जवळपास कोठें आलें असलें तर त्यास ऐकूं जावें. दुसरा चाल करून फ्रेंच सैन्य पुढें येत आहे हें शत्रूस समजूं नये.

ट्रोशूनें सैन्याचे दोन भाग केले. पहिल्या भागानें **विलियर्स शाम्पेन** व **ब्राई** येथील शत्रूच्या ठाण्यावर हल्ला करावा, दुसऱ्या भागानें चाईसली-राय व शेवेल, इकडील शत्रूवर हल्ला करावा, कांहीं सैन्य शहरांत ठेविलें, त्यानें शत्रूस फसविण्याच्या बाजूवर हल्ला करावा अशी ट्रोशूनें योजना केली.

मार्न नदीस एकाएकीं पाणी आल्यानें . नावेचे ८ पूल वहावून गेले. यामुळें अग्नेय दिशेकडील हल्ल्यास अडथळा झाला.

२९ वे तारखेस सकाळीं जनरल डी - बोफर्ट एक टोळी घेऊन व्हर्सेलिसच्या रस्त्याकडे गेला. डी . लिनियर्स दुसरी टोळी घेऊन वायव्य दिशेस बेझेन्साच्या पुलाकडे गेला. हे दोघेही पराभव पावून दोन प्रहरच्या सुमारास परत आले, परंतु शत्रूस जागचे जागीं गुंतवावें हा जो त्यांचा मुख्य हेतु होता तो सिद्धीस गेला.

जनरल विनाय शहरच्या दक्षिणेस गेला. त्याचे सैन्यास मौलिन साकेट आणि हाटिस-ब्रुयर्स येथील तोफांची मदत होती. यानें सकाळीं ९ वाजतां शत्रूवर चाल केली; परंतु नेमलेल्या ठिकाणीं नेमलेली मदत न आल्यामुळें त्यास मागें सरावें लागलें. येथें फ्रेंचांचे ६०० आणि जर्मन यांचे १३० शिपाई पडले. एकंदरीत २९ वे तारखेस फ्रेंचांचा बेत सिद्धीस गेला नाहीं.

३० वे तारखेस लढाईस जाण्याचे अगोदर जनरल डुक्रो यानें आपल्या शिपायांशीं भाषण केलें तें:—

"शिपायांनो—आपण पारिस शहरांत दुःख करीत व उपासानें तरफडत मरावें ह्मणून शत्रूनें आपणां भोंवतीं गराडा घातला आहे. तो उठविण्याची वेळ आली आहे. हें महत् कार्य तुमच्या जिवांवर आरंभिलें आहे. हें काम करण्यास तुह्मीच योग्य आहांत. आपल्या छावणीच्या पलीकडे आपण एक पाऊल टाकूं कीं आपली व आपल्या दो-

र्थे द्वेषी शत्रूंची गांठ पडेल. त्या शत्रूस वारंवार जय मिळाल्या मुळे तो धीट व निर्भय झाला आहे. या करितां मोठ्या जोरानें हल्ला केला पाहिजे. शत्रु तुह्मांस आजिंक्य आहे. असें समजूं नका. लढाईच्या सामानाची कडेकोट तयारी आहे. तुम्हां पुढें व तुमच्या तोफां पुढें आतां कोणाचाही निभाव लागणार नाहीं दारू गोळा वगैरे सर्व यथास्थित आहे. जर यावेळेस तुम्ही जय मिळवाल तर सदा सर्वकाळ तुह्मी विजयी आहांत असें समजा. त्वारथडीच्या सैन्याकडे पहा. त्यांनीं शत्रूंची फार दशा केली. धैर्य धरा व निर्भय असा, आपल्या स्वतंत्रते करितां, आपल्या अब्रू करितां, आपल्या प्रिय व हतभाग्य देशाच्या मुक्ततेकरितां आपण लढत आहोंत याचा विचार करा. एवढ्या करितांच कां लढावें असें जर तुह्मांस वाटत असेल तर तुह्मी आपल्या उध्वस्त झालेल्या शेत मळ्यां करितां, तुमच्या कुटुंबांचा, तुमच्या बहिणींचा, तुमच्या बायकांचा, तुमच्या आयांचा शत्रूनें नाश केला आहे व अब्रू घेतली आहे, या करितां लढा. त्यांचा सूड उगवा, तुह्मांस जिंकलें म्हणतात याचा राग येऊंद्या. भयास भिऊं नका. सर्व लोकांसमक्ष मी शपथ वाहून सांगतों कीं जय मिळविल्या शिवाय किंवा मेल्या शिवाय मी पारिस शहरास परत येत नाहीं. तुह्मी मला पडलेला पहाल परंतु पराङ्मुख झालेला कधीं पाहणार नाहीं. याप्रमाणें तुह्मीही शपथ वहा, आणि पुढें चला. ईश्वर तुमच्या पाठीवर आहे."

ज्याप्रमाणें डुक्रो बोलला त्याचप्रमाणें तो वर्तला. २९ वे तारखेस रात्रीं आपलें सर्व सैन्य घेऊन विनसेनिसाच्या रानांतून निघाला, आणि ३० वे तारखेस उजाडण्याचे सुमारास

मार्न नदी उतरून पलीकडे गेला. यानें आपल्या सैन्याच्या ४ टोळ्या केल्या. विनसेनीस, रोज्नी, नोजंट, आणि मांट अव्हरान येथून शत्रूवर तोफांचा मारा केला. मुख्य लढाई ब्राई विलियर्स, व शाम्पेन येथें झाली. हीं तिन्हीं खेडीं शहरचे अग्नये दिशेस त्रिकोनाकृति आहेत विलियर्स जवळ सकाळीं साडेसात वाजतां लढाईस आरंभ झाला. या ठिकाणीं शत्रूकडील तीन पल्टणी व वर्टेंबर्जर लोकांची एक ब्रिगेड होती. फ्रेंच जेव्हां खेड्याच्या जवळ गेले तेव्हां किल्ल्यांवरील तोफा बंद झाल्या. त्यांनीं त्या खेड्याचा थोडा भाग घेतल्यावर शत्रूनें त्यांवर हल्ला केला. दोन तास संगिनीची लढाई झाल्यावर फ्रेंच माघारे फिरले. परंतु लढाई खेरीज एक पाऊल ही त्यांनीं मागें टाकला नाहीं. चार वाजण्याचे सुमारास पुन्हा फ्रेंच लोक जेव्हां चाल करून पुढें गेले तेव्हां दोन्हीं सैन्यें अगदी हात घाईवर आलीं. इतक्यांत अंधार पडला. जखमी व मेलेल्या लोकांचे ढीग त्यांच्या भोंवतीं पडले होते. इतकें झालें होतें तरी जर्मन लोकांनीं कांहीं तें खेडें सोडिलें नाहीं. फ्रेंचांस रात्रीचे रात्र निर्भय पणें निजण्यास तेथें कांहीं आडोसा नव्हता, व थंडी फार पडली होती यामुळें ते परत आले.

दुसऱ्या टोळीला शत्रूच्या पहिल्या तटा पाशींच अडथळा झाला, आणि तें सैन्य माघारें फिरलें; परंतु त्या बरोबर जनरल डुक्रो होता तो त्या तटाकडे एकटाच धांवून गेला आणि कांहीं *ग्याबन्स आपले हातानें टकलून देऊन

*गवयारतव माती भरून ठेवलेल्या कणगी.

बांठ केली. नंतर शिपाई धांवले व त्यानीं शत्रूस तेथून हाकून दिलें. शत्रूच्या तोफांचा मारा त्यांवर एक सारखा चालला होता, तरी ते तसेंच पुढें गेले आणि त्यांनीं शांपेन घेतलें. याच प्रमाणें तिसऱ्या टोळीनें ब्राई घेतलें.

या दिवशीं चोहों बाजूंस फ्रेंचांसच जय मिळाला. दि. सेंबरचे १ ले तारखेस दोन्हीं सैन्यें स्वस्थ पडून होतीं.

२ रे तारखेच्या पहाटेस तिन्हीं खेड्यांवर जर्मन लोकांनीं हल्ला केला. त्या वेळेस फ्रेंच अगदी गैर सावध होते. यामुळें कांहीं अडथळा न करितां ते मागें फिरले. येथें ८ सरदार व ५०० शिपाई शत्रूच्या हातीं लागले. ८ वाजण्याचे सुमारास फ्रेंचांचे मुख्य सैन्यावर जर्मन लोकांनीं हल्ला केला. मार्न नदीचे पुल पाडून फ्रेंचांस अडवावें असें शत्रूच्या मनांत होतें, परंतु एकाएकीं फ्रेंचांनीं तोफांचा असा भडिमार केला कीं शत्रूनें तसा मारा जन्मांत पाहिला नव्हता. नाईजी पासून ते शाम्पेन पर्यंत विस्तव पसरून ठेवल्या प्रमाणें केलें. नंतर फ्रेंच.चें पायदळ पुढें सरसावलें आणि त्यांनीं विलियर्स गांववर हल्ला केला. त्यांचे मनांत नायजी-ली ग्रांड येथें जावयाचें होतें; कारण तेथें गेले असतां शत्रूचा त्या बाजूचा वेढा उठविला असें झालें असतें. बेता प्रमाणें फ्रेंच तिकडे गेले परंतु त्यांस मागें फिरावें लागले. नंतर ते ब्राई व शाम्पेन या गांवांकडे गेले. या लढाईंत ६,००० फ्रेंच व ८,००० जर्मन पड-ले. ३,००० फ्रेंच व १,००० जर्मन पाडाव झाले.

३ रे तारखेस फ्रेंच लोक घेतलेली खेडीं सोडून आपल्या तळावर परत आले. कारण थंडी फार पडली होती व फ्रेंच शिपायांचे कपडे चांगले नव्हते. या वेळेस डुक्रोने आपले सैन्याशीं भाषण केलें तें:—

सैनिकहो. दोन दिवस उत्तम लढल्यावर आपण मार्ने नदी उतरून अलीकडे आलों. तेथेंच पडून रहाणें व्यर्थ होतें. कारण हजारों शिपायांचा व्यर्थ नाश झाला असतां लढाई संपली असें समजूंनका. दारू गोळा जलदीनें तयार करा. पुन्हा धैर्यानें लढूं. तयारी असूंद्या. जीव गेला तरी चिंता नाहीं परंतु देशास मुक्त करा."

हें वर्तमान टूर्स शहरीं कळल्यावर ग्यांबट यानें भाषण केलें तें:—

"तुमचे पुत्र विजयी होऊन परत येतील अशी आतां चांगली आशा लागली आहे. आपल्या सैन्यास वरचेवर यश मिळत आहे. फ्रान्स देश मुक्त होण्याची वेळ आली आहे. आतां झटून मेहनत करा, फ्रेंच लोकांचा जो गुण थोडा वेळ झांकला होता तो आतां प्रकाशायास लागला आहे. शत्रूचें पाऊल मागें पडत आहे, न्याय, अब्रू व हक्क यांकरितां लढणें व आपली इच्छा पूर्ण करण्याकरितां लढणें यांमध्यें केवढा भेद आहे हें ध्यानांत धरा. ही जयश्री लोकसत्तात्मक राज्याची आहे. सर्वांनीं फ्रेंच लोकांस हातचे सोडलें आहे परंतु ते आपल्या स्वतःच्या शक्तीनें व पराक्रमानें उदयास आले. स्वतंत्र राज्य असलें ह्मणजे त्याची फलश्रुति अशीच असते"

१० दिसेंबर रोजीं ट्रोशूनें सैन्याशीं भाषण केलें तें:—

"सरदार व शिपाई लोक हो,– आपण एक दिलानें वागून फार चांगली लढाई केली. आपण जसा पारिस शहरचा अभिमान धरून लढत आहांत तसेंच त्वारयडीचें सैन्यही लढत आहे, अशा संकटांत आपण अशा रीतीनें लढतों हें पाहून शत्रूस धाक बसत चालला आहे. असेंच धैर्यानें लढा. जिवावर उदार होऊन जर आपण लढलों तरच या लढाईचा चांगला परिणाम होईल हें ध्यानांत धरा."

नाना प्रकारें फ्रेंच लोक आपलें धैर्य दाखवीत होते. लढण्याचीं हत्यारें ही दिवसें दिवस उत्तम शोधून काढीत. लढाईस उपयोगी अशा आगगाड्या तयार केल्या. नवीन प्रकारच्या तोफा काढल्या. मोअर ह्मणून एक यंत्र तयार केलें. याचा उडण्याचे वेळेस अवाज होत नाहीं व यापासून धूर निघत नाहीं. यानें ६०० यार्डांवरील नेम मारितां येतो. एका रसायन वेत्त्यानें एक नवीन रसायन शोधून काढलें या-च्या वासानें मनुष्यें मरतात. दुसऱ्या एकानें एक रसायन शोधून काढलें. त्याचा जर धूर लागला तर मनुष्य बेशुद्ध होतो. या रसायनांचा पारिस सरकारानें उपयोग केला नाहीं.

एका शिपायानें आपल्या आई बापास पत्र लिहिलें तें—

"या संकटांतून फ्रान्स देश सुटेल असें दिसत नाहीं कारण तीन राक्षस देशांत शिरले आहेत. १ हयगय, २ लष्करी विद्येचें अज्ञानत्व, ३ स्वपक्षाभिमान. प्रत्येक म-

नुष्य स्वत:चीच काळजी करीत आहे. देशाची एकी मोडली. वाडवडीलांचे गुण त्यां बरोबरच गेले. त्यांचे पोटीं आम्ही कुपुत्र झालों. सैन्या मध्यें दर्जा व शिक्षण राहिलें नाहीं. शिक्षणाखेरीज सैन्य व्यर्थ आहे. देशांत जे निरनिराळे तट झाले आहेत तेच आपला नाश करून घेतील. असें नाहीं तरी कांहीं महिन्यांनीं निःसंशय आपसांमध्यें लढाई होईल. हें राष्ट्र आतां जुनें झालें आहे. मोठ्या राष्ट्राची जशी दशा होते तशीच आपली दशा होणार. ग्रीक्स, पार्शीयन्स, रोमन्स, मूर्स आणि टर्कस यांचीं मोठमोठालीं राज्यें होतीं, तीं आतां कोठें आहेत, आपण यांच्याच मालिकेंत जाऊन बसलों आहोत. हा सृष्टीचा क्रमच आहे कीं एका मागून एकानें उदयास यावें. सध्यां जर्मन लोक उदयास येण्याचे दिवस आहेत. रोजचे रोज नवीन घोटाळा उत्पन्न होतो यामुळें आपला पराभव होत आहे. एक नाहीं पण पुष्कळ फ्रान्स देश झाले आहेत रिपब्लिकन फ्रान्स, ऑर्लिनिस्ट फ्रान्स, बोनापार्टिस्ट फ्रान्स. हे प्रत्येक आपल्या हातांत अधिकार असावा ह्मणून भांडत आहेत रिपब्लिकन तटा मध्यें देखील पुष्कळ फळ्या आहेत. असा प्रकार आहे तेव्हां फ्रेंच पराजित झालें यांत नवल काय?"

बाहेर प्रांतीं बातमी पाठविण्याच्या द्वारां पैकीं खबुतरांचें द्वार या वेळेस बंद झालें. कारण दिसेंबर महिन्यांत दिवस फारच लहान असतो, व रात्रीस हीं पांखरें उडत नाहींत. जर्मन लोकांनीं पारिस शहरच्या भोंवतालीं लांबवर देश जिंकला होता, यामुळें त्या पांखरांच्यानें दिवसास जिंकलेला देश ओलांडवत नसे.

डिसेंबरचे १० वे तारखेस जर्मनीमध्यें जर्मन लोकांची सभा भरून त्यांत ठरलें कीं प्राचीन काळीं जर्मनीच्या राजास बादशाहा असा किताब होता. तो किताब आतां प्रशियाचे राजास द्यावा. यास जर्मनींतील सर्व संस्थानी लोक कबूल झाले. नंतर त्यांनीं राजास मानपत्र लिहिलें. तें:—

"प्रख्यात व दयाळू राजाचा जय असो- आपल्या इच्छेप्रमाणें जर्मनींतील सर्व संस्थानें एक झालीं आहेत. आपणांस वारंवार उपद्रव देणारे फ्रेंच लोक यांचा आपण जर्मन सैन्याचें स्वामित्व पतकरून पराभव केला. याचा आम्हांस फार आनंद झाला. फ्रेंच आपणांवर पुन्हा हल्ला न करतील असा सरहद्दीवर बंदोबस्त केल्या शिवाय शस्त्र खालीं ठेवूनये अशी आमची विनंती आहे. व असाच जर्मन सैन्याचाही निश्चय आहे. आज हें एवढें यश मिळविण्यास आपण कारण आहांत. अशीच एकी सदा सर्वकाळ चालो अशी आमची इच्छा आहे.

" उत्तर जर्मनीची पार्लमेंट व जर्मनींतील सर्व संस्थानिक मिळून आपणास विनंती करितात कीं सर्वांची एकी राहण्याकरितां आपण जर्मनीचे बादशहाची पदवी स्वीकारावी. ट्युटानिक कुळाचे बादशहाची पदवी स्वीकारून सर्व जर्मनीची एकी चालवावी; आणि जर्मन लोकांचें सामर्थ्य, स्वस्थता व स्वतंत्रता भरभराटीस आणावी अशी सर्वांची इच्छा आहे.

आपण जय मिळविला याबद्दल आपले व सर्व सैन्याचे

जर्मन लोक उपकार मानीत आहेत. जर्मन लोकांची भक्ति व प्रीति यांचें सर्वांस स्मरण राहण्याकरितां व आपले आज्ञेप्रमाणें वागून जर्मन सैन्य विजयी झालें याकरितां आपण बादशहाची पदवी स्वीकारून सर्वांस आनंद द्यावा."

हें पत्र व्हारसेलिस येथील राजवाड्यांत कौंटबिस्मार्क यानें सभा भरवून वाचून दाखविलें. यास प्रशियाचे राजानें उत्तर दिलें तें:—

"महाजनहो, परदेशामध्यें त्यांतून फ्रेंच राजाचे जुन्या वाड्यांत हा समारंभ पाहून मला भगवंताच्या कर्तृत्वाचें स्मरण होतें. लढाईस आरंभ केला ते वेळेस आपणांस असा जय मिळेल असें मला वाटलें नव्हतें. देशाचे नांवानें, सैन्याचे नांवानें व मी स्वतः आपल्या नांवानें तुमचे उपकार मानितों. विजयी जर्मन सैन्य जरी मोठीं संकटें आलीं होतीं तरी जिवावर उदार होऊन लढलें, एक निष्ठेनें वागलें, एकोप्यानें वर्तलें, हेंच त्यांच्या कीर्तीस कारण झालें आहे. लढाई चालवावी ह्मणून जी तुह्मी सामुग्रीची मदत केली व उत्साह दाखविला तर तीं साधनें आह्मी व्यर्थ जाऊं देऊं काय? कधींही जाऊं देणार नाहीं. फ्रेंचांनीं जर्मनीवर पुनः हल्ला न करावा अशी तजवीज निःसंशय करूं. सर्व जर्मन लोक एकत्र झालेले पाहून मला फार आनंद होतो. सर्व जर्मन संस्थानिकांनीं बादशाही पुन्हा करावी, हे मनांत आणलेले पहून मला फार आनंद झाला आहे. परंतु हा अधिकार मी पतकरावा किंवा नाहीं ही मोठी विचाराची गोष्ट

आहे. सर्व जर्मन लोक एकत्र झाले व त्यांनीं जय मिळविला हें त्यांच्याच श्रमाचें फळ आहे. तुह्मी सर्व मिळून बादशहाचा अधिकार मला देण्यास इच्छितां तर मी आपला विचार तुह्मांस मागाहून कळवीन. तुह्मां सर्वांचे मी उपकार मानितों."

जनरल ट्रोशूनें २० वे तारखेस पुन्हा हल्ला करण्याचा बेत केला आणि त्या प्रमाणें ग्यांबट यास निरोप पाठविला. तो निरोप नेणारा शत्रूच्या हातीं लागला, आणि त्यानींही लढाईची तयारी केली.

२० वे तारखेस ट्रोशूनें कांहीं फौज रोसनीच्या किल्ल्या जवळ ठेवून कांहीं रेन्सीकडे पाठविली. डुक्रो यानें १०,००० सैन्य घेऊन लीबजेंट गांवावर हल्ला केला. एकंदर हा सर्व हल्ला उत्तरेस डुग्नी पासून ते नोजेंट पर्यंत होता. यावेळेस फ्रेंचांचे मनांत लिल शहरास जाणारा आगगाडीचा रस्ता आपल्या ताब्यांत घ्यावा असा होता. ही लढाई बरीच वेळ चालली होती. येथें १०० जर्मन शिपाई फ्रेंचांनीं धरले. या दिवशीं संध्याकाळचे ७वाजे पर्यंत लढाई होऊन दोन्ही पक्षांचा सारखा नाश झाला.

या वर्षीं थंडी फार पडली होती. फ्रेंच शिपायांस कपडे चांगले नव्हते, ह्मणून ते मेंढ्यांचीं कातडीं वगैरे पांघरत. शहराबाहेरचे पहारेकरी रात्रीस थंडी मुळें खंदकांत जमिनीस चिकटून निजत. कित्येक पांच चार हात लांबीचा चर ह्मणून त्यांत निजत आणि वरून दारा प

तलफांनीं झांकीत. असें करीत होते तरी देखील कित्येक थंडीनें कुडकुडून मेले. कित्येकांचे हातपाय वांकडे झाले. अशा प्रकारच्या अनेक संकटांनीं फ्रेंचांचें धैर्य नष्ट होत गेलें.

नोव्हेंबर महिन्यांत टूर्स शहरांतून फ्री शूटर्स किंवा फ्रयांकटायरूर्स यांच्या झुंडीच्याझुंडी बाहेर पडल्या. त्यांत कांहीं फ्रेंच होते, व बाकीचे ग्रीस, इताली, स्पेन, अलजीर्या. युनैटेडस्टेट्स, कानडा, मांटविडियो वगैरे देशांतून आलेले लोक होते. त्यांनीं फ्रान्स देश इतका व्यापला कीं कोठें थोडी आडोशाची जागा असली तर समजावें कीं येथें एक दोन तरी फ्री शूटर्स आहेतच. यांचा जर्मन लोकांस इतका धाक बसला होता कीं ते एकटे दुकटे सैन्य सोडून बाहेर पडत नव्हते. त्यांत औट-पोस्ट व गार्ड हीं कामें अगदीं बंद पडलीं होतीं. दिवसेंदिवस थंडी ही अधिक पडली. रोजच्यारोज बर्फ पडत होतें. यामुळें जर्मन लोक अगदी त्रासून गेले. आणि लढाई सोडून आपल्या देशास परत जावें असें त्यांस वाटूं लागलें.

---

# भाग १०.

मेट्स किल्ला घेतल्यावर जर्मन लोकांचें १ लें व २ रें सैन्य रिकामें झालें होतें त्यांतील २ रें सैन्य ल्वारयडींच्या सैन्यावर पाठविलें असें मागें सांगितलेंच आहे बाकी

[redacted]ले नंबरचें सैन्य फ्रान्स देशाच्या उत्तरेस पाठ[redacted] स्टीनमेट्स याने राजीनामा दिला ह्मणून [redacted]हान मांटूफेल यास नेमिलें. यानें आपले- सैन्यांतील ७ वी कोर मोसेल नदीच्या कांठीं ठेविली. त्या कोर मधील एक भाग थियानव्हील, दुसरा मेझेरीस आणि तिसऱ्या भागांतील एक ब्रिगेड लाफेरी या गांवांवर पाठविली आणि बाकीचें सैन्य अमीआंग शहरावर गेलें.

थियानव्हील येथील किल्ल्यास पूर्ण वेढा नोवेंबरचे २२ वे तारखेस पडला. आणि २५ वे तारखेस तो किल्ला हस्तगत झाला. या ठिकाणीं ४,००० फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या हातीं लागले.

व्हरडून किल्ल्यास अगष्टचे अखेरीस वेढा पडला होता. मेटस किल्ला हातीं लागल्यावर जर्मन लोकांनीं पुष्कळ तोफा तेथे आणविल्या. आणि नोवेंबरच्या ८ वे तारखेस तो किल्ला घेतला. या ठिकाणीं ४,००० फ्रेंच शिपाई व १३६ तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या.

अक्टोबरचे १६ वे तारखेस सीसून गांव घेतलें. या ठिकाणीं ४,७३२ शिपाई, १३२ तोफा, ७०,००० गोळे ३,००० * हंड्रेडवेट दारू, ९२,००० † फ्रयांक पैसा आणि तीन महिने पुरेल इतके धान्य जर्मन लोकांस मिळालें.

---

* एकशें बारा पौंड म्हणजे एक हंड्रेड वेट.

† फ्रयांक ह्मणजे ६ आणे ८ पै.

२१ वे तारखेस लाफेरी घेतलें. येथें २,००० शि-पाई व ७० तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या.

नोवेंबरचे २७ वे तारखेस अमींआंग शहराच्या दक्षिणेस लढाई झाली. त्यांत फ्रेंचांचा पराभव झाला, आणि ते आरास प्रांताकडे पळून गेले. या लढाईंत १,४०० जर्मन आणि १,३०० फ्रेंच शिपाई पडले. जर्मन लोकांनीं २८ वे तारखेस तें शहर घेतलें. या शहरा पासून जर्मन यांनीं आपलें सैन्य रूआंग शहरावर चालविलें. जर्मन रूआंग शहरावर जातात हें ऐकल्या बरोबर फ्रेंच सैन्याचा अधिकारी जनरल फेडहर्ब आरास प्रांतांतून मा-घारा फिरला. त्यानें आपल्या सैन्यांत जाहीरनामा प्र-सिद्ध केला तो:—

"फ्रान्स देशास शत्रूच्या हातून मुक्त करण्यास तुमचे अंगीं निर्भयता, वातबेत, व न्याय हे तीन गुण पाहिजेत. वातबेत मी तुह्मांस शिकविलाच आहे त्या प्रमाणें वागा. ज्यांनीं आपला देश शत्रूच्या हातून सोडविण्यास शस्त्र धरिलें आहे ते आपल्या हातानें आपल्या देशाचा नाश करतील असें कधीं होणार नाहीं. त्यांतून तुमच्या हातून तर अन्याय होणारच नाहीं. तुह्मीं निर्भयपणानें न लढाल तर तुमच्या देशाची, तुमच्या बायका पोरांची निर्भय व निर्दय शत्रूच्या हातून काय दशा होईल याचा विचार करा, आणि निर्भयपणानें लढा."

जर्मन लोक रूआंग शहराच्या जवळ येतांच तेथें जें सैन्य होतें तें पळालें. तेथील लोकांपासून ४०,०००

जोडे २०,००० मोजे, २,००० फ्लानिनयाच्या बंड्या, १,००० ब्लांकेट आणि २०,००० ओढण्याच्या विज्या इतकी खंडणी घेतली.

रुआंग शहर सहज शत्रूच्या हातीं लागलें म्हणून हव्र बंदरांच्या लोकांनीं मोठी तयारी चालविली. शहरच्या तटावर तोफा चढविल्या. शिपायांस रायफल बंदुकी दिल्या. ६० वर्षांच्या वयापर्यंत सर्व लोकांस शहर रक्षणार्थ तयार होण्याचा हुकूम दिला. हारफ्लोर गांवापर्यंत जागजागीं आश्रय तयार केले. अजु बाजूच्या लोकांस तेथें येऊन राहण्याचा हुकूम दिला. जहाजें बंदर सोडून लांब उभीं केलीं.

८ वे तारखेस जर्मन लोकांनीं अडेमीरगांव घेतलें. दुसरे दिवशीं दिएप बंदर घेतलें. नंतर फौवील घेतलें. हें गांव हाव्र बंदरापासून ८ मैलांवर आहे. हाव्र येथील सैन्याची व जर्मन लोकांची पहिली लढाई फोरजिस गांवा जवळ झाली. यांत ३०० फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या हातीं लागले. दुसरी लढाई वालबेक जवळ झाली यांत ३९ जर्मन घोडेस्वार फ्रेंचांचे हातीं लागले.

सोम प्रांतांतील हामगांव ९वे तारखेस जर्मन लोकांनीं घेतलें; त्यांवर फ्रेंचांनीं एकाएकीं हल्ला करून ७६ शिपाई एक तोफ व १० सरदार धरले. येथून फेडहर्बानें थेट पारीस शहरचा रस्ता धरिला. त्याची व शत्रूची केरिक्स, पांटवाइलीस व हलूई या गांवांजवळ गांठ पडून लढाई झाली. यांत दोन्ही पक्षांचे लोक इतके जख-

तळफांनीं झांकीत. असें करीत होते तरी देखील कित्येक थंडीनें कुडकुडून मेले. कित्येकांचे हातपाय वांकडे झाले. अशा प्रकारच्या अनेक संकटांनीं फ्रेंचांचें धैर्य नष्ट. होत गेलें.

नोव्हेंबर महिन्यांत टूर्स शहरांतून फ्री शूटर्स किंवा फ्रयांकटायरूर्स यांच्या झुंडीच्याझुंडी बाहेर पडल्या. त्यांत कांहीं फ्रेंच होते, व बाकीचे ग्रीस, इताली, स्पेन, अलजीर्या. युनैटेडस्टेटस, कानडा, मांटविडियो वगैरे देशांतून आलेले लोक होते. त्यांनीं फ्रान्स देश इतका व्यापला कीं कोठें थोडी आडोशाची जागा असली तर समजावें कीं येथें एक दोन तरी फ्री शूटर्स आहेतच. यांचा जर्मन लोकांस इतका धाक बसला होता कीं ते एकटे दुकटे सैन्य सोडून बाहेर पडत नव्हते. त्यांत औट-पोस्ट व गार्ड हीं कामें अगदीं बंद पडलीं होतीं. दिवसेंदिवस थंडी ही अधिक पडली. रोजच्यारोज बर्फ पडत होतें. यामुळें जर्मन लोक अगदीं त्रासून गेले. आणि लढाई सोडून आपल्या देशास परत जावें असें त्यांस वाटूं लागलें.

---

# भाग १०.

मेट्झ किल्ला घेतल्यावर जर्मन लोकांचें १ लें व २ रें सैन्य रिकामें झालें होतें. त्यांतील २ रें सैन्य ल्वारथडीच्या सैन्यावर पाठविलें असें मागें सांगितलेंच आहे बाकी

राहिलेलें १ ले नंबरचें सैन्य फ्रान्स देशाच्या उत्तरेस पाठविलें. जनरल स्टीनमेट्स यानें राजीनामा दिला ह्मणून त्याचे जागीं व्हान मांटूफेल यास नेमिलें. यानें आपले सैन्यांतील ७ वी कोर मोसेल नदीच्या कांठीं ठेविली. त्या कोर मधील एक भाग थियानव्हील, दुसरा मेझेरीस आणि तिसऱ्या भागांतील एक ब्रिगेड लाफेरी या गांवांवर पाठविली आणि बाकीचें सैन्य अमीआंग शहरावर गेलें.

थियानव्हील येथील किल्ल्यास पूर्ण वेढा नोवेंबरचे २२ वें तारखेस पडला. आणि २५ वे तारखेस तो किल्ला हस्तगत झाला. या ठिकाणीं ४,००० फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या हातीं लागले.

व्हरडून किल्ल्यास अगष्टचे अखेरीस वेढा पडला होता. मेटस किल्ला हातीं लागल्यावर जर्मन लोकांनीं पुष्कळ तोफा तेथें आणविल्या. आणि नोवेंबरच्या ८ वे तारखेस तो किल्ला घेतला. या ठिकाणीं ४,००० फ्रेंच शिपाई व १३६ तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या.

अक्टोबरचे १६ वे तारखेस सीसून गांव घेतलें. या ठिकाणीं ४,७३२ शिपाई, १३२ तोफा, ७०,००० गोळे ३००० * हंड्रेडवेट दारू, ९२,००० † फ्रयांक पैसा आणि तीन महिने पुरेल इतकें धान्य जर्मन लोकांस मिळालें.

---

* एकशें बारा पौंड म्हणजे एक हंड्रेड वेट.

† फ्रयांक ह्मणजे ६ आणे ८ पै.

२१ वे तारखेस लाफेरी घेतलें. येथें २,०००
पाई व ७० तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या.

नोवेंबरचे २७ वे तारखेस अमीआंग शहराच्या दक्षि-
णेस लढाई झाली. त्यांत फ्रेंचांचा पराभव झाला, आणि
ते आरास प्रांताकडे पळून गेले. या लढाईंत १,४
जर्मन आणि १,३०० फ्रेंच शिपाई पडले. जर्मन
कांनीं २८ वे तारखेस तें शहर घेतलें. या शहरा पा-
सून जर्मन यांनीं आपलें सैन्य रूआंग शहरावर चालविलें.
जर्मन रूआंग शहरावर जातात हें ऐकल्या बरोबर फ्रेंच
सैन्याचा अधिकारी जनरल फेडहर्ब आरास प्रांतांतून मा-
घारा फिरला. त्यानें आपल्या सैन्यांत जाहीरनामा प्र-
सिद्ध केला तो:—

"फ्रान्स देशास शत्रूच्या हातून मुक्त करण्यास तुमचे
अंगीं निर्भयता, बातबेत, व न्याय हे तीन गुण पाहिजेत.
बातबेत मी तुह्मांस शिकविलाच आहे त्या प्रमाणें वागा.
ज्यांनीं आपला देश शत्रूच्या हातून सोडविण्यास शस्त्र ध-
रिलें आहे ते आपल्या हातानें आपल्या देशाचा नाश
करतील असें कधीं होणार नाहीं. त्यांतून तुमच्या हातून
तर अन्याय होणारच नाहीं. तुह्मीं निर्भयपणानें न
लढाल तर तुमच्या देशाची, तुमच्या बायकां पोरांची निर्भय
व निर्दय शत्रूच्या हातुन काय दशा होईल याचा विचार
करा, आणि निर्भयपणानें लढा."

जर्मन लोक रूआंग शहराच्या जवळ येतांच तेथें जें
सैन्य होतें तें पळालें. तेथील लोकांपासून ५०,०००

जोडे २०,००० मोजे, २,००० फ्लानिनयाच्या बंड्या, १,००० ब्लांकेट आणि १०,००० ओढण्याच्या विज्या इतकी खंडणी घेतली.

रूआंग शहर सहज शत्रूच्या हातीं लागलें म्हणून हव्र बंदरांच्या लोकांनीं मोठी तयारी चालविली. शहरच्या तटावर तोफा चढविल्या. शिपायांस रायफल बंदुकी दिल्या. ६० वर्षांच्या वयापर्यंत सर्व लोकांस शहर रक्षणार्थ तयार होण्याचा हुकूम दिला. हारफ्लोर गांवापर्यंत जागजागीं आश्रय तयार केले. अजु बाजूच्या लोकांस तेथें येऊन राहण्याचा हुकूम दिला. जहाजें बंदर सोडून लांब उभीं केलीं.

८ वे तारखेस जर्मन लोकांनीं अडेमीरगांव घेतलें. दुसरे दिवशीं दिएप बंदर घेतलें. नंतर फीवील घेतलें. हे गांव हाव्र बंदरापासून ८ मैलांवर आहे. हाव्र येथील सैन्याची व जर्मन लोकांची पहिली लढाई फोरजिस गांवा जवळ झाली. त्यांत ३०० फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या हातीं लागले. दुसरी लढाई वालनेक जवळ झाली यांत ३९ जर्मन घोडेस्वार फ्रेंचांचे हातीं लागले.

सोम प्रांतांतील हामगांव ९वे तारखेस जर्मन लोकांनीं घेतलें; त्यांवर फ्रेंचांनीं एकाएकीं हल्ला करून ७६ शिपाई एक तोफ व १० सरदार धरले. येथून फेडहर्बानें थेट पारीस शहरचा रस्ता धरिला. त्याची व शत्रूची केरिक्स, पांटवाइलीस व हलूई या गांवांजवळ गांठ पडून लढाई झाली. यांत दोन्ही पक्षांचे लोक इतके जख-

मी झाले कीं, ८ मैल रस्ता जखमी लोकांच्या गाड्यांनीं भरून गेला होता. ही लढाई २३ वें तारखेस झाली. येथून फेडहर्ब परत आरास प्रांतांत गेला. कारण त्या-जवळ सामानाचा तोटा पडला.

हत्र येथील सैन्याची व शत्रूची बेटाट गांवाजवळ तिसरी लढाई झाली. त्यांत २०० फ्रेंच शिपाई जर्मन लोकांच्या हातीं लागले.

जनरल फेडहर्ब ३१ वे तारखेस आरास प्रांतांतून माघारा फिरला. त्याच दिवशीं बाप्युम जवळ लढाई झाली. ही लढाई २ दिवस चालली होती. यांत १,२०० जर्मन आणि ४,५०० फ्रेंच शिपाई पडले. नंतर फेडहर्ब पुन्हा आरास प्रांतांत गेला.

यानंतर हात्र येथील सैन्यास लढण्याचा प्रसंगच आला नाहीं. तें सैन्य जर जलमार्गानें फेडहर्बाकडे किंवा ल्वार थडीच्या सैन्याकडे पाठविलें असतें तर कांहीं तरी उपयोगीं पडतें; परंतु तसें कांहीं न करितां तें सैन्य उगीच बसून राहिलें होतें.

# भाग ११.

स्ट्रासबर्ग शहर घेतल्यावर जनरल वरडर याच्या सैन्यास हुकूम दिल्याप्रमाणें तें सैन्य अक्टोबरचे ९ ते

तारखेस तें शहर सोडून निघालें. त्याचा बेत प्रथम सेंट डीय या गांवावर जाण्याचा होता; परंतु वाटेंतच एटविक जवळ फ्रेंचांनीं त्याचे उजवे बाजूवर हल्ला करून आपण पराभव पावलें परंतु जर्मन लोकांस हळूहळू पुढें जावें लागलें. त्यांनीं १८वे तारखेस बेरोज गांव घेतलें. आणि बासान्कान यावर जात असतां वाटेंत आवीमान गांवा जवळ फ्रेंचांनीं त्यांस अडविलें. येथें देखील फ्रेंचांचाच पराभव झाला. येथून वरडर प्रेगांवावर जात असतां डिजान शहरावर जाण्याचा हुकूम आला ह्मणून तो तिकडे गेला.

डिजान शहराचें रक्षण करण्या करितां असपासच्या प्रांतांतील बरेच शिपाई गोळा झाले होते. त्यांची व जर्मन यांची संध्याकाळचे ४वाजे पर्यंत लढाई झाली. नंतर तें शहर जर्मन लोकांच्या हातीं लागलें. या शहरच्या लोकांनीं पुन्हा गडबड करूं नये ह्मणून पांचलक्ष फ्रयांक्स पैसा जामीन घेतला. आणि २०,००० शिपायांस एक दिवस पुरेल इतका शिधा खंडणी घेतली. हें ३१वे तारखेस घडलें.

जर्मन लोकांनीं डिजान शहर घेतल्यामुळें गारीबाल्डी याच्या सैन्यास मोठा धाक बसला. यावेळेस तो सैन्य जमवीत डिजान शहराच्या जवळच्या प्रांतांत आला होता. याजवळ ८,००० सैन्य जमलें होतें. यांत कांहीं परदेशचे लोक होते, व कांहीं फ्रेंच मारिलस होते. यांची हत्यारें ही नु-

त्या काळची होती. यानें नोवेंबरचे ७वे तारखेस आप- ल्या शिपायांशीं भाषण केलें तें:—

"मुलांनो, पुन्हा आपण एक ठिकाणीं जमलों याचा मला मोठा आनंद झाला आहे. आपण लोक सत्तात्मक राज्या करितां लढत आहांत. या फ्रान्स देशच्याच राज्या करितां लढतों असें नाहीं, परंतु सर्व जगा करितां लढत आहांत. माझ्या शिपायां- नो, लोकसत्तात्मक राज्या करितां जीव तोडून लढा. म- नुष्यां मध्यें दया व स्वतंत्रता असावी. हें मिळविण्या करितांच मीं अमेरिकेंत व युरोपांत लढाया केल्या व करीत आहें. बंधु प्रीति व समानता असावी अशी माझी इच्छा आहे. ह्मणून मी राजांबरोबर लढतों. मला लढाईची आवड आहे असें समजूं नका. विनाकारण मी कधींही लढणार नाहीं. आज ४० वर्षें झालीं हातांतील तरवार मीं खालीं ठेविली नाहीं. असेंच तुह्मी करा. जय मिळ- विल्याशिवाय बंदुक खालीं ठेवूं नका. लोक सत्तात्मक राज्याचें सैन्य जरी अशिक्षित होतें तरी देखील त्यानें जय मिळविला अशी कीर्ति करा. धैर्यानें लढा ह्मणजे आपलें काम सहज होईल."

**वरडर** याच्या सैन्याचे एका टोळीनें अक्टोबरचे ६वे तारखेस न्युब्रिस्याक गांवाला वेढा घातला. तेथें दोन दि- वस लढाई करून ती टोळी शेलटेस्टाट गांवावर गेली आणि २४ वे तारखेस तें गांव घेतलें येथें २,००० शिपाई आणि १०० तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या. तेथून

- पुन्हा न्युब्रिस्याक गांवावर ते लोक आले, आणि नोवेंबरचे ११ वे तारखेस तें गांव घेतलें. तेथें ५००० शिपाई, १०८ तोफा व पुष्कळ सामान जर्मन लोकांच्या हातीं लागलें.

वरडर याच्या सैन्यास जर्मनींतून आणखी सैन्याची कुमक आली. मग त्यानें तें सर्व सैन्य बेलफोर्ट किल्ल्याकडे नेलें.

जर्मन लोक डिजान शहरा जवळून गेले. हें गारीबाल्डीनें ऐकतांच तो तिकडे चालतां झाला. हें पाहून जनरल वरडर यानें आपल्या सैन्याच्या टोळया केल्या, आणि चोहोंकडे पाठविल्या त्या टोळयांस गारीबाल्डी रोज चे रोज थोडा बहुत अडथळा करीत होता. नोवेंबरचे १९ वे तारखेस त्यानें आपल्या मुला जवळ ५६० शिपाई देऊन त्यास शत्रूचा शोध करण्यास पाठविलें. तो त्याच दिवशीं संध्याकाळीं ५॥ वाजतां चाटालीन गांवा जवळ गेला. जर्मन लोकांच्या एका टोळीनें तें गांव घेऊन तेथें तळ दिला होता. *रीकायटी यानें आपले लोकांचे दोन भाग केले, आणि दोहों कडून गांवांत शिरला. ते लोक गांवभर गारीबाल्डीकीजय " असें ओरडत हिंडले येथें त्यांनीं शत्रूचे २ जनरल २ कर्नल आणि १०० शिपाई धरले.

२६ वे तारखेस गारीबाल्डी यानें पासकेस वं ला-

* गारीबाल्डीचा मुलगा.

न्टेवी या गांवांपासून शत्रूस हाकून दिलें. या वेळेस त्यास पारिस शहरचा रस्ता मोकळा झाला होता. त्यानें तिकडे चालही केली असती परंतु पाऊस पडत होता व थंडी फार पडली होती. त्यांतून याचे शिपाई थोडे व त्यांस कपडे चांगले नव्हते, ह्मणून तो तिकडे गेला नाहीं.

दिसेंबरचे १ ले तारखेस अटन गांवाजवळ त्याच्या सैन्यावर शत्रूनें हल्ला केला, परंतु त्याचाच पराभव झाला. फ्रेंच शिपाई बरोबर हुकूम मानीत नाहींत ह्मणून २ रे तारखेस इतालियन सरदार राजीनामे देऊन आपल्या देशास निघून गेले. १६ वे तारखेस लांग्यु गांवाजवळून त्यानें शत्रूस पळविलें. एकंदरींत त्यानें जनरल वरडर यास इतकें बेजार केलें कीं त्यास डिजान शहर सोडून उत्तरे कडेस जाणें भाग पडलें. त्यास पुन्हा जर्मनींतून सैन्याची कुमक आली. नंतर त्यानें कोतदोर प्रांतांतील नुइट्स गांवावर स्वारी करून १८ वे तारखेस तें गांव घेतलें. या ठिकाणीं गारीबालडी याचे पुष्कळ सरदार व १,००० शिपाई पडले. जर्मन याचे ५४ सरदार व ८०० शिपाई पडले. याच दिवशीं पुन्हा अग्नान नदीचे कांठीं लढाई होऊन गारीबालडीचा पराभव झाला.

यावेळस ल्यन्स शहरा जवळ जमलेलें फ्रेंच सैन्य रणभूमीवर आलें. याची आणि जर्मन लोकांची लढाई १७ वे तारखेस नुइट्स गांवाजवळ झाली. येथें फ्रेंचांचा पराभव होऊन पळापळ झाली. त्यास परत फिरावें ह्मणून त्यां-

ऱ्या सेनापतीनें खटपट केली परंतु त्यास त्यांनीं मारून टाकिलें. या लढाईंत २,००० फ्रेंच व ९०० जर्मन शिपाई पडले.

जनरल शेन्झी आपलें सैन्य घेऊन मागें सरत सरत वानडोम येथें गेला. जर्मन लोकांनीं ज्या दिवशीं अर्लीन शहर घेतलें त्याच दिवशीं त्यांनीं आपल्या सैन्याचे तीन भाग करून एक शेन्झीच्या मागें दुसरा बोरबकीच्या मागें लाविला. आणि तिसरा अर्लीन शहराच्या भोंवतालच्या प्रांतांची खंडणी घेण्याकरितां ठेविला.

शेन्झी वर गेलेल्या सैन्याची आणि त्याची मार्शनियारचे रानांत बऱ्याच चकमकी झाल्या. तेवढ्यावरून जर्मन लोकांची खात्री झाली कीं, जरी ल्वारथडीच्या सैन्याचे दोन भाग झाले आहेत, तरी त्यांच्या मागें लाविलेल्या सैन्यास ते भारी आहेत. हें पाहून फ्रेड्रिक राजपुत्रानें तिसरा भाग म्याक्लिनबर्गच्या ड्यूकाजवळ देऊन त्यास शेन्झीवर पाठविलेले सैन्याचे मदतीस पाठविलें. हा ड्यूक ल्वार नदीच्या कांठानें ईशान्य दिशेस जात असतां दिसेंबरचे ७ वे तारखेस फ्रेंचांनीं त्यावर हल्ला केला. तेथें जर्मन लोकांचा बराच नाश झाला, परंतु त्यांनीं फ्रेंचांस बेझेन्सी कडे मागें सारिलें. ८ वे तारखेचे लढाईंत जर्मन लोकांनीं कावंट, बोमांट आणि मेसाट हीं खेडीं घेतलीं. ९ वे तारखेचे लढाईंत दोघेही आपणांस जय मिळाला असें म्हणत होते. १० वे तारखेस ४०० जर्मन शिपाई फ्रेंचांनीं धरिले. तरी देखील जर्मन लोक आपणांस जय

मिळाला असें ह्मणत होते. ११ वे तारखेस जर्मनांनीं व्लवा गांव घेतलें.

या वेळेस ला-फ्रान्स वर्तमान पत्रांत कोणीं ग्यांबट याची फार निंदा केली, त्यांत लिहिलेला मजकूर:—ग्यांबट कारभार करूं लागल्यापासून मेट्स, शेलेट्स्टाट, न्युब्रिस्याक थियानवील, लाफेरी, आमीआंग्, अलेन्स हीं शहरें शत्रूच्या हातीं लागलीं. बेलफोर्ट, लयन्स आणि वासान्कान या शहरांस वेढे पडले. पुष्कळ ठिकाणीं फ्रेंचांचा पराभव झाला. यावरून असें दिसतें कीं वारमिनिस्टरच्या कामास तो नालायक आहे.

या वर्तमान पत्रांतील मजकूर अगदीं गैर होता. कारण बादशाही सैन्य नाहींसें झाल्या पासून नवीन सैन्य तयार करण्यांत व फ्रेंच लोकांस उत्तेजन देण्यांत ग्याबट यानें मोठा चमत्कार केला ह्मणण्यास कांहीं हारकत नाहीं. पराभव झाला ह्मणजे मुख्यावर दोष येतोच यांत कांहीं नवल नाहीं.

टूर्स शहराजवळ शत्रु आल्यामुळें तेथील सर्व सरकारी कचेऱ्या व कारखाने दिसेंबरचे ९ वे तारखेस बोर्डो शहरीं नेले.

१२ वे तारखेस रात्रीं जनरल शेन्झी यानें शत्रूस नकळतां पारिस शहरचा रस्ता धरिला. दुसरे दिवशीं जर्मन लोक त्याच्या मागें गेले. त्याची व यांची १४ वे तारखेस फ्रेटवाल गांवाजवळ गाठ पडून दोनादिवस लढाई

झाली. यांत कोणासच जय मिळाला नाहीं. फ्रेंचांचा बेत चाटुडनच्या रस्त्यानें पारिस शहरावर जाण्याचा होता. परंतु वानडोम गांवाजवळ त्यांच्या एका टोळीचा शत्रूनें अगदीं पराभव केला. या ठिकाणीं जनरल शान्झी यस ग्यांबट याचा हुकूम आला कीं तुम्ही लाम्यान्स गांवाकडे जावें म्हणजे फ्रेड्रिक राजपुत्राचें सैन्य तुमचे मागें येईल मग बोरबकीस जर्मनीचा रस्ता बंद करण्यास ठीक पडेल. हुकुमा प्रमाणें तो २१ वे तारखेस लाम्यान्स जवळ गेला तेच दिवशीं जर्मन लोकांनीं टूर्स शहर घेतलें.

लाम्यान्स येथें मजबूत जागा पाहून शत्रूशीं लढण्याचा शेन्झीनें बेत केला. केरात्रीचे छावणींत जे शिपाई तयार होते त्यांस सोलाविण्यास एड्रेल यास पाठविलें. त्यानें तथील सैन्याशीं भाषण केलें तें:—

"माझे प्रिय व शूर देशबांधवांनो, तुम्हांस पाहून मला मोठा आनंद झाला आहे. स्वदेशाचा अभिमान धरून लढाईस तयार झाला आहां, हें खरोखर मोठें भूषणास्पद आहे. ४८,००० गृहस्थांनीं शिपाईगिरी पतकरली. ही वर्तणूक सर्वांनीं उदाहरण घेण्यासारखी आहे. तुमचा निश्चय पाहून मला तुमच्या पूर्वजांचें स्मरण होतें. "सर्व लोकांची एकी असावी" हें तुमच्या वडिलांचें वाक्य अक्षरशः पाळा. शत्रूस आपल्या देशांतून हाकून देण्यास चला."

या खेरीज आजूबाजूच्या दुसऱ्या प्रांतांत जे शिपाई शिकत होते ते बोलाविले. तें सैन्य एकंदर १,१८,००० झालें.

फ्रेड्रिक राजपुत्रही आपलें सैन्य घेऊन ड्यूकाच्या मदतीस आला. पहिली लढाई चेंज गांवाजवळ झाली. या दिवशीं थंडी फार पडली होती म्हणून बहुतेक फ्रेंच शिपाई गांवांत पळून गेले. जानेवारीचे १० वे तारखेस जें शत्रूचें सैन्य पुढें येईल त्यावर हल्ला करावा असा शेन्झीनें हुकूम केला, परंतु तो कोणींच मानिला नाहीं. दुसरे दिवशीं जर्मन लोकांचें सर्व सैन्य तेथें येऊन दाखल झालें. ११ वे व १२ वे तारखेस लढाई होऊन फ्रेंचांचा अगदी पराभव झाला. तरी देखील अलान्कान गांवाजवळ दुसरी लढाई देण्याचा शेन्झीचा बेत होता, परंतु मियेन गांवाकडे मागें सरावें असा ग्यांबट यानें हुकूम दिला म्हणून तें सैन्य तिकडे गेलें. अशा प्रकारें ल्वारयर्डी सैन्याचे एका भागाचा शेवट झाला. इतक्यांत लढाई तहकूब केल्याची पारिस शहराहून बातमी आली. या लढाईंत ३,५०० जर्मन लोक पकडले. व २१,००० फ्रेंच शत्रूच्या हातीं लागले.

ल्वारथडीचे सैन्याचा दुसरा भाग डिसेंबर अखेरीस सांगितलेलें काम करण्यास निघाला. इतके दिवस बारबकी हा दक्षिणेसच शिपाई जमवीत व त्यांस कवाईत शिकवीत बसला होता. याजवळ १,२०,००० शिपाई व २०० तोफा जमल्या होत्या. जानेवारीचे २ रे तारखेस यानें डिजान जवळ तळ देऊन कांहीं सैन्य वेसान्कान गांवावर पाठविलें.

फ्रेंच सैन्य आपणावर आलें हें पाहून जनरल वरडर

फ्रेंफर्ट किल्ल्यावर जाऊं लागला. वाटेंत जानेवारीचे ९ वे तारखेस मर्टमोइने आणि विलरसेक्सल येथें फ्रेंचांची गांठ पडून लढाई झाली. येथें कोणासच जय मिळाला नाहीं; परंतु जर्मन हरिकोर्ट गांवाकडे मागें सरले. या खेरीज लहान लहान पुष्कळ लढाया झाल्या. मागें सरून जर्मन लोकांनीं डेल, हारीकोर्ट आणि मांट विलियर्ड यां गांवीं तळ दिला. जानेवारीचे १५ वे तारखेस त्यांवर फ्रेंचांनीं हल्ला केला. ही लढाई तीन दिवस चालली होती. या तिन्ही दिवसांत फ्रेंच शिपायांस खावयास पुरतें न मिळाल्यामुळें आणि जर्मन लोकांस मांटूफेल याचे सैन्याची मदत आलीहें पाहून ४ थे दिवशीं त्यांनीं मागें सरण्यास आरंभ केला ते २१ तारखे पर्यंत मागें सरत होते. वरचेवर शत्रु त्यांवर हल्ला करीतच होता. येथें १२,००० फ्रेंच शिपाई व २३० धान्याच्या गाड्या जर्मन लोकांनीं धरल्या या नंतर फ्रेंच शिपायांचें धैर्य खचून ते लढतनासे झाले. आणि आपण होऊन शत्रूच्या हातीं लागूं लागले. या सर्व घोटाळ्यामुळें बोरबकी यास कांहीं सुचेनासें होऊन तो बासान्कान गांवा जवळ उगीच भ्रमिष्टा सारखा तळ देऊन राहिला. शत्रु जवळ आल्या बरोबर तो आणखी मागें सरूं लागला. शेवटीं २४ वे तारखेस आत्म हत्या करून घेण्याची त्यानें खटपट केली. २५ वे तारखेस सेनापतित्वाचा अधिकार जनरल क्लीनचाट यास देऊन आपण मोकळा झाला. २९ वे तारखेस आरबोईस गांवा जवळ शत्रूनें त्यांस अडवून ३,००० शिपाई धरले व ६ तोफा घेतल्या. यानंतर रोजचेरोज सैन्यास सोडून फ्रेंच

शिपाई जेथें आश्रा मिळेल तेथं पळून जाऊं लागले. कांहीं थंडीनें मेले व कांहीं आजारी झाले. कांहीं अन्न अन्न करून मेले व कांहीं अन्ना करितां सैन्यास सोडून गेले.

फेब्रवारिचे १ ले तारखेस लाव्हूस गांवाजवळ शत्रूनें बाकी राहिलेल्या सैन्याचा अगदी पराभव केला. आणि ५,००० शिपाई व १८ तोफा धरल्या. याच दिवशीं सुमारे ८५,००० शिपाई स्विझरलंड देशामध्ये गेले व आपलीं हत्यारें टाकून तेथील सरकारास शरण गेले. अशा प्रकारें बारबडीच्या दुसऱ्या सैन्याचा नाश झाला.

आतां पूर्वेकडेस कायतें गारिबाल्डीचें सैन्य राहिलें होतें जानेवारीचे ७ वे तारखेस सेंबेमी गांवाजवळ त्याची व जर्मन लोकांची लढाई झाली. तेथें त्यास जय मिळाला. ३१ वे तारखेस जरावेस गांवाजवळून त्यानें शत्रूस हकून दिलें. नंतर भाषण केलें तें:—

" शूरशिपायांनों, जर्मन लोकांच्या भयंकर सैन्याचा सपाटा तुह्मीं पुष्कळ वेळ पाहिला. तुह्मीं लोक सत्तात्मक राज्याचे इतिहासांत कीर्ति संपादन केली. न्याया करितां व नीति करितां लढणारे योध्ये तुह्मीच, असें समजून, राजसत्तेनें त्रासलेले लोक, तुह्मांस नमस्कार करतील. विजयी व जगामध्यें उत्तम अशा सैन्याचा तुह्मीं मोड केला. कसें लढावें व शत्रूस कसें जिंकावें हें तुह्मांस अझून चांगलें माहीत नाहीं. तुह्मी एकत्र जमून लढतां, आणि फार गडबड करतां यामुळें शत्रूचे फार लोक तुमचे हातीं लागत नाहीत ह्मणून शत्रु पुनः पुनः लढण्यास येतो, परंतु तुमच्या

सरदारांची वर्तणूक नीट नाहीं. आतां तरी चांगुलपणानें वागा. रयतेस त्रास देऊं नका; कारण त्यांचीच तुम्हांस मदत आहे. ते आपले देश बांधव आहेत, हे लक्षांत आणा. तुम्हांमध्यें ममता व तत्परता असूं द्या. लोकांची प्रीति संपादन करा.सर्वोपरी त्यांस तुमचाच आधार आहे. नीट रीतीनें वागाल तर लवकरच आपण जुलमी व क्रूर राजास आपल्या देशांतून हाकून देऊं. मग आपणांस सुखाचे दिवस येतील; कारण आतां लोकसत्तात्मक राज्य आहे."

इतक्यांत पारिस शहराजवळ लढाई तहकूब करण्याचा ठराव झाल्याची बातमी त्यास कळली. आणि कित्येक प्रांतांनीं त्यास आपल्या तर्फे प्रतिनिधि नेमिलें, म्हणून तो तिकडे गेला. यामुळें त्याचें सैन्य विसकटलें.

फ्रान्साच्या उत्तरेस आरास प्रांतांत जनरल फेडहर्ब गेला तो जानेवारीचे २ रे तारखेस माघारा फिरला. त्यानें थेट पारिस शहरचा रस्ता धरिला. त्यांपशीं जवळ शत्रूची गांठ पडून लढाई झाली. ३ रे तारखेस अचीट गांवाजवळ दुसरी लढाई झाली. येथें कोणाचाच जय मिळाला नाहीं; परंतु फ्रेंच शिपायांनीं दांडगेपणामुळें फेडहर्बास मागें सरावें लागलें. या लढाईंत १,२०० जर्मन आणि ४,००० फ्रेंच शिपाई पडले.

---

बोरबकी हा पुर्वेस गेल्याची बातमी पारिस शहराजवळ प्रशियाचें राजास कळतांच त्यानें एक नवीन सैन्य तयार केलें आणि त्यास दक्षिणेचें सैन्य असें नांव दिलें. त्यावर मांटू-

फेल यास सेनापति नेमिलें. आणि त्यास पुर्वेस पाठविलें. त्याच्या जागीं **गोबेन** यास नेमिलें.

**फडहर्ब** **शेरबर्की** वर जाणाऱ्या शत्रूच्या सैन्यास वाटेंत अडवावें ह्मणून तो अलबर्ट गांवापर्यंत आला; आणि अमीआंग शहरावर जातों अशी बातमी उठवून सेंट क्वेन्टिन गांवाकडे गेला. त्याचे पाठोपाठ शत्रूचा सरदार **गोबन** हाही गेला. तेथें गांठ पडून तीन दिवस लढाई झाली. तेथें फ्रेंचांचा अगदीं पराभव झाला. येथें १२,००० फ्रेंच शिपाई शत्रूच्या हातीं लागले. अशा प्रकारें उत्तरेकडील सैन्याची धूळधाण झाली. इतक्यांत पारिस शहराजवळ लढाई तहकूब करण्याचा ठराव झाल्याची बातमी आली.

पूर्वेकडील प्रांतांत कित्येक शहरास जर्मन लोकांचे वेढे होते. त्यांत बिचे शहराजवळ दोन्हीं सैन्यें सलगी करून पडून राहिलीं होतीं. फाल्सबर्ग किल्ल्यास सेप्तेंबरचे दुसऱ्या अठवड्यांत वेढा पडला होता. तो किल्ला दिसेंबरचे १५ वे तारखेस हातीं लागला. येथें ५२ सरदार १,८३६ शिपाई आणि ९५ तोफा जर्मन लोकांच्या हातीं लागल्या. मांटमिडी दिसेंबरचे १४ वे तारखेस जर्मन यांच्या हातीं लागलें. जानेवारीचे २ रे तारखेस मेझेरीस घेतलें. येथें २,००० शिपाई आणि १०६ तोफा हातीं लागल्या. लांग्री २५वे तारखेस घेतलें. येथें ४,००० शिपाई आणि २००.तोफा हातीं लागल्या.

बेलफर्ट किल्ल्यास वेढा पडल्यावर नोवेंबरचे २४,२५,

२६ तारखेस आंतील सैन्यानें हल्ला करून शत्रूचा फार नाश केला. दिसेंबरचे २ रे तारखेस जर्मन लोकांनीं एका ठिकाणीं मोर्चा बांधण्याची खटपट केली, परंतु आंतील सैन्यानें ती व्यर्थ दवडिली. २६ वे तारखेस जर्मन लोकांनीं मोठा हल्ला केला आणि ते किल्ल्याजवळ जाऊन भिडले. परंतु तोही हल्ला आंतील सैन्यानें माघारा फिरविला. बेलफर्ट किल्ला जर्मन लोकांच्या स्वाधीन करण्याचा ठराव पारिस शहराजवळ झाल्यावर फेब्रुवारीचे १६वे तारखेस तो किल्ला शत्रूच्या हातीं लागला.

---

## भाग १२.

पारिस शहराच्या ईशान्य दिशेस मांट—अवान किल्ल्याजवळ फ्रेंच लोकांनीं मोर्चे बांधले होते, ते जर्मन सैन्यास फार बाधक होते. म्हणून ते मोर्चे घेण्याकरितां जर्मन यांनीं दिसेंबरचे २७ वे तारखेस हल्ला केला. ते दिवशीं बारीक बारीक बर्फ पडत होतें. धुक्यानें सर्व दिशा धुंद झाल्या होत्या. दूरचा पदार्थ दिसत नव्हता. परंतु जर्मन लोकांनीं अधले दिवशींच सर्व तयारी करून ठेवली होती. यामुळें त्यांचे गोळे नेमलेल्या जागीं पडत. तरी या दिवशीं ती जागा जर्मन लोकांचे हातीं लागली नाहीं. २९ वे तारखेस ती जागा जर्मन यां-

नीं घेतली. फ्रेंचांचें लक्ष तिकडे गुंतवून शहराच्या नैर्ऋत्य दिशेस क्लामार्ट आणि चाटालिन यांच्या टेंकड्यांवर जर्मन लोकांनीं मोर्चे बांधिले. तेथून नेमका गोळा पारिस शहरांत पडूं लागला. यामुळें जनरल ट्रोशूवरचा लोकांचा विश्वास उडाला. आणि *वारकौंसिलाच्या मतानें त्यानें वागावें असें ठरलें.

जर्मन लोकांस प्रथम वाटलें होतें कीं, पारिस शहराजवळ गेल्याबरोबर तें शहर हातीं लागेल; परंतु ती आशा निष्फळ झाल्यावर शहरावर हल्ला करण्या करितां पुष्कळ सामान आणविलें. त्यांत क्रुप नांवाची तोफ आणविली. हिचें वजन ५० टन व लांबी १७ फूट आहे. ही तोफ तयार करण्यास ६ महिने लागले. ईस एकंदर खर्च १,५७,५०० रुपये लागला, इच्या तोंडाचा व्यास १४ इंचाचा आहे.

क्लामार्ट व चाटालिन येथून पारिसच्या लोकांस भीति वाटण्याकरितां मुद्दाम जर्मन लोकांनीं शहरावर गोळा चालविला.

शत्रूनें शहरावर गोळा चालवूं नये म्हणून पारिस सरकारानें बरीच खटपट केली, पण ती व्यर्थ गेली, म्हणून त्यांनीं कायदा केला कीं,—"जे लोक शहरामध्यें गोळा लागून मरतील ते लढाईंत मेले असें समजून लष्करी कायद्याप्रमाणें त्यांची तजवीज केली जाईल."

---

*लढाई चालविणारी मंडळी.

त्या ठिकाणावरून पारिस शहरावर गोळा चालू झाला होता त्याच्या आजूबाजूच्या किल्ल्यावर मोठमोठ्या तोफा चढवून शत्रूच्या मोर्च्यावर एकसारखा फ्रेंचांनी मारा चालविला.

जानेवारीचे १६ वे तारखेस रेडरिपब्लिकन पक्षाच्या लोकांनीं गप्प उठविली कीं जनरल ट्रोशू फितूर झाला. तो उद्यां पारिस शहर शत्रूच्या हातीं देणार आहे.

यावर ट्रोशूनें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

पारिस शहरच्या लोकांस व शिपायांस फसविण्या करितां अन्य पक्षाच्या लोकांनीं ही खोटी बातमी उठविली आहे. जरी आपण दुःखें व संकटें भोगीत आहेंत, तरी आपण ह्मणजे शस्त्र टाकून शत्रूस शरण जाऊं ही गोष्ट मनांत देखील आणावयास नको. त्यांतून मी स्वतः तर कधींच शरण जाणार नाहीं."

जानेवारीचे ८ वे तारखेस कांहीं फ्रेंच सरदार आपले अधिकार सोडून शत्रूस शरण गेले. तेवेळेस जनरल ट्रोशूनें जाहीर नामा प्रसिद्ध केला तो:— "शिपायांनो, अरनेन शियल याच्या पुला जवळ काल फारच वाईट गोष्ट घडली. ८ फ्रेंच शरदार फितूर झाले व शत्रूस शरण गेले, आणि त्यांनीं शहरांतील सर्व बातमी शत्रूस कळविली. लढावें हें त्यांचें काम असून ते आपणांस फसवून शरण गेले. आपल्या देशाचा कमीपणा दुसऱ्यांस सांगावा, त्यांतून शत्रूस, ही फारच निंद्य गोष्ट आहे, त्यांनीं विश्वास घात

केला. ते फितूरी आहेत. फितूरी मनुष्याप्रमाणें त्यांची चौकशी करून त्यांस शिक्षा द्यावी, असें मी शत्रूस लिहितों."

दररोज शहरा भोंवत्या लहान मोठया लढाया होतच होत्या. त्यांत विशेष वर्णन करण्यासारखें कांहींच घडलें नाहीं. शहरामध्यें धान्याचा व सरपणाचा फारच तोटा पडला. गरिबांचीं घरें व लांकडी सामान बहूत करून नाहींसें होत आलें होतें. बाजार भाव खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

रुपये.

ससा..........२८

कुकुडकुंभा......१८५

अंडे............१

लोणी ॥. शेर१५

याखेरीज घरगुती घोडे, जनावरें, मांजरें, घुशी, उंदीर, हीं सर्व त्यांनीं खाल्लीं.

वार कौंसिल झाल्या पासून कित्येक वेळ जनरल ट्रोशूस आपले मना विरुद्ध वागावें लागलें. १३ वे व १६ वे तारखेस फ्रेंचांनीं हल्ला केला, परंतु दोन्ही वेळ पराभव झाला.

जानेवारीचे १७ वे तारखे पर्यंत एकंदर ६,००० कुलपी गोळे पारिस शहरांत पडले आणि २९६ मनुष्यें मेलीं.

१७ वे तारखेस पारिस शहरास वेढा पडून ४ महिने झाले. तथापि तें शहर हातीं लागण्याचें कांहींच चिन्ह दिसलें नाहीं. हें पाहून जर्मन लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. कारण त्या शहरांत वीस लक्ष मनुष्यांची वस्ती आहे. यांस खाण्यास रोजचा खर्च लागतो तोः—

| | खंडी. | मण. | शेर. |
|---|---|---|---|
| भाकरी. | १,३८० | १५ | |
| खारें मांस. | ५०१ | १३ | |
| कोंबड्या. | २६८ | ६ | ६ |
| मासे. | ३४७ | १३ | ८ |
| पीठ. | २९९ | ० | ६ |

| | संख्या. | | शेर. |
|---|---|---|---|
| बैल. | ४९० | बटाटे. | १,३०,४०० |
| गाई. | १३० | भाज्या. | ५,६०,००० |
| वासरें. | ६३० | लोणी. | १,२५,४४० |
| मेंढे. | २,९६३ | दहीं. | ३१,३६० |

या खेरीज तांदूळ, दूध, अंडीं, दारू वगैरे पुष्कळ सामान लागतें.

शेवटचा एक मोठा हल्ला करावा असें फ्रेंच वीरकौंसिल मध्यें ठरलें, आणि त्याप्रमाणें जानेवारीचे १९ वे तारखेस मांटविलेरियन किल्ल्याचे बाजूस फ्रेंचांनीं शत्रूवर हल्ला केला. ही लढाई संध्याकाळ पर्यंत चालली होती. येथें फ्रेंचांचा फार नाश झाला आणि ते परत आले. या

लढाईंत जर्मन लोकांचे ३९ सरदार आणि ६१६ शिपाई पडले. फ्रेंचांचे ९,००० लोक मेले.

या लढाईंत जाण्याचे अगोदर पारिस सरकारानें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

"देशबांधवांनो, शत्रु आपल्या बायकां पोरांस मारीत आहे. रात्रंदिवस त्यानें शहरावर व दवाखान्यांवर गोळा चालविला आहे. तर आतां आपलें शहर व आपलीं बायका पोरें वांचवावीं अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं या लढाईंस चलावें. ही लढाई मोठी निर्वाणीची आहे. सर्वजण तयार व्हा आणि शत्रूवर तुटून पडा. जे मागें रहातील त्यांनीं देखील लढण्यास तयार असावें उगीच बसूं नये. शत्रूस जिंकण्याच्या जितक्या कल्पना सुचतील तितक्या प्रचारांत आणा."

जाहिरनाम्याप्रमाणें पारिस शहरांत बायका देखील तयार झाल्या. त्यांनीं आरी सारखें एक शस्त्र तयार केलें. त्यास एक बारीक भोंक असतें त्यांत *पुसिक आसिड भरावा आणि शत्रू शहरांत येऊं लागला तर त्यास भेटण्याकरितां ह्मणून सामोरें जावें, आणि हात † हालविण्याचे वेळेस तें शस्त्र शरीरांत टोंचावें, ह्मणजे तात्काळ मनुष्य मरण पावतो. अशा योजना केली, ही योजना बायकांची होती.

जानेवारीचे १८ वे तारखेस सर्व जर्मन लोकांनीं व्हर्सेलीस येथील राजवाड्यांत प्रशियाचे राजास जर्मनीचा

* विषयुक्त रसायन आहे. † शेकहांड करण्याचे वेळेस.

बादशाह अशी पदवी दिली. ते वेळेस त्यानें भाषण केलें तें:—

"जर्मनीचा बादशाह ही पदवी नाहींशी होऊन आज ६० पेक्षां अधिक वर्षे झालीं. ती पदवी पुन्हा उपस्थित करून जर्मन कान्फिडरेशन याच्या सर्व सभासदांनीं मला द्यावी असें ठरविलें आहे. त्या सर्वांच्या अग्रहास्तव मी ती पदवी मोठ्या आनंदानें स्वीकारितों. आजपासून जर्मन देशच्या राज्य प्रकर्णी कामकाजांमध्यें मी व माझे वंशज जे प्रशियाचे गादीवर बसतील, ते जर्मनीचा बादशाह अशी किताबत आपणांस लावून घेतील. मी इच्छितों कीं जर्मन लोकांस या पदवीच्या अमलाखालीं पूर्व दिवस प्राप्त होवोत. ही पदवी स्वीकारितांना मी कबूल करितों कीं जर्मन लोकांचे सर्व हक्क संभाळीन. व त्यांची स्वतंत्रता राखीन. सर्वांची एकी रहाण्यास खटपट करीन. देशांत स्वस्थता राहील असें करीन. सरहद्दी करितां फ्रेंच लोक पुन्हा न लढतील असें करीन, ह्मणजे आपणांस सदा सार्वकाळ स्वस्थता भोगण्यास अडथळा येणार नाहीं. परमेश्वरा, लढाईमुळें जशी आह्मांस योग्यता मिळवून दिली आहेस, तशीच देशाच्या व लोकांच्या कल्याणामध्यें मिळवून दे."

जानेवारीचे २१ वे तारखेस ट्रोशू यास आपल्या कामाचा राजीनामा द्यावा लागला.

२२ वे तारखेस लंडन शहरामध्यें काळेसमुद्राविषयीं विचार करण्या करितां युरोपांतील सर्व देशांच्या मुखत्यारांची

सभा भरली. यासभेस जाण्याकारितां ज्युलसफाव्र यानें कौंट बिस्मार्क याचो पारिस शहर सोडून जाण्यास परवान गी मागितली, बिसमार्क यास वाटलें कीं हा इंग्लंड देशांत काय खटपट करील कोण जाणे त्यांनून यास त्या सभेस जाऊं दिलें तर फ्रान्स देशांतील हल्लींचें राज्य सर्वांस मान्य आहे असें होईल. या करितां त्यानें परवानगी दिली नाहीं.

अशा प्रकारें लंडनास जाण्याची मसलत फसली यान्याचा फारच तोटा पडला. रेडरिपब्लिकन नेहमी त्रास देतच होते. शहरांत अनेक प्रकारचे रोग उद्भवले. पारिस शहरा मधील लोक-२,६६,००० शेरभर करीत उदर निर्वाह करूं लागले. अशा अडचणी आल्या तेव्हां कसी तरी लढाई तहकूब करून शहरांत धान्याचा पुरवठा करणें जरूर पडलें, ह्मणून ज्युलस फाव्र यानें प्रशियाचे राजास जाऊन भेटावें आणि लढाई तहकूब करावी असें ठरलें.

२३ वे तारखेस दोन प्रहरीं ज्युलसफाव्र जर्मन लो कांच्या छावणींत गेला. चार दिवस विचार होऊन जा नेवारीचे २८ वे तारखेस लढाई तहकूब झाली. आणि खालीं लिहिलेल्या तहकुबीच्या शरती ठरल्या.

जर्मनीचा बादशहा याचे तर्फे कौंट बिस्मार्क.

फ्रान्स देशाचे फारेनमिनिस्टर ज्युलसफाव्र.

या दोघांस आपआपल्या सरकाराकडून योग्य अधिकार मिळाल्या वरून यांनीं खालीं लिहिलेलीं कलमें कायम केलीं.

१. फ्रेंच आणि जर्मन यांत जी लढाई चालू आहे, ती तहकूब असावी. यांत पारिस शहराजवळील आग बंद व्हावी. बाहेर प्रांतांतील आग पसून तीन दिवसांत बंद करावी. २१ दिवस लढाई तहकूब असावी; ह्मणजे जानेवारीचे २८ वे तारखेचे दोन प्रहरापासून फेब्रुवारी १९ तारखेचे दोन प्रहरापर्यंत. ज्याच्या ताब्यांत जे प्रांत आहेत त्यांनी त्या प्रांताचा कारभार करावा. याच प्रमाणे दोन्ही देशाच्या आरमाराने वागावे. जर तहकुबीच्या दिवसांत कोणी किल्ला अगर गांव घेईल अथवा शिपाई धरील तर ते लागलेच परत द्यावेत. पूर्वेकडेस मात्र लढाई चालावी. तिकडील सैन्यास मदत करूं नये.

२ लढाई तहकूब करण्याचें कारण फ्रेंच लोकांची बोर्डो शहरीं सभा भरावी. त्या सभेंत लढाई विषयींचा विचार व्हावा. बंद करावी असें जर ठरलें तर तह कोणत्या प्रकारचा आणि कसा करावा हें ठरवावें या सभेस सर्व फ्रान्स देशांतील प्रत्येक प्रांतांतून एक मनुष्य यावा. त्यास जर्मन लोकांकडून अडथळा होऊं नये.

३ पारिस शहराच्या रक्षणार्थ जे किल्ले आहेत ते आणि त्यांतील लढाईचें सामान जर्मन लोकांच्या स्वाधीन करावें; आणि एक हद्द नेमावी तिच्या बाहेर कोणी न जावें. ती हद्द दोन्ही पक्षांचे सैन्यास दाखवावी.

४. तहकुबीच्या दिवसांत जर्मन सैन्यानें पारिस शहरांत जाऊं नये.

५. गाड्यांवरील तोफा, गाड्या सुद्धां जर्मन लोकांच्या स्वाधीन कराव्या.

६. पारिस शहराजवळ जें सैन्य आहे तें पाडाव झालेलें सैन्य आहे. त्यांनीं आपलीं हत्यारें जर्मन लोकांच्या स्वाधीन करावीं त्या सैन्यानें पारिस शहर सोडून जाऊं नये. त्यामधील सरदारांच्या नांवाची याद करून जर्मन लोकांच्या स्वाधीन करावी. तहकुबीचे दिवस संपण्याचे अगोदर जर तह न होईल तर या सैन्यानें जर्मन लोकांच्या स्वाधीन व्हावें. यामध्यें सरदार नसावेत. त्यापैकीं १२,००० शिपाई शहर रक्षणार्थ ठेवावे.

७. फ्रयांकटायर्स नांवाचें सैन्य फ्रेंच सरकारानें मोडावें.

८. या कागदावर सह्या झाल्यावर व किल्ले ताब्यांत दिल्यावर पारिस शहरांत धान्य नेण्याची परवानगी असावी.

९. किल्ले ताब्यांत दिल्यावर आणि वर सांगितलेल्या सैन्यानें हत्यारें टाकल्यावर आगगाडींतून आणि सेन नदींतून शहरांत धान्य न्यावें. धान्य जर्मन लोकांनीं जिंकलेले प्रांतांतले नेऊं नये.

१०. पारिस शहर सोडून जर कोणी मनुष्य बोर्डो येथील सभेस जाईल तर त्याजवळ लष्करी अधिकाऱ्याचे सहीचा पास असावा. तो पास त्यानें जर्मन लोकांच्या लष्करी अधिकाऱ्यास दाखविल्या शिवाय बाहेर जाण्यास परवानगी मिळणार नाहीं.

११. पारिस शहरच्या लोकांनीं वीस कोटी फ्रयांक खंडणी द्यावी.

१२. तहकुबीच्या दिवसांत कोणत्याही फ्रेंचांचे वस्तूस जर्मन लोकांनीं हात लावूं नये.

१३. पारिस शहरांत बाहेरून शस्त्रें किंवा दारू गोळा आणूं नये. आणि शहरांत ही तयार करूं नये.

१४. लढाई सुरू झाल्या दिवसा पासून फ्रेंच लोकांनीं जे जर्मन यांचे शिपाई किंवा सरदार धरिले असतील ते सोडावे. त्यांचे मोबदला त्याच दरजाचे जर्मन लोकांनीं फ्रेंच सोडावेत.

१५. पारिस शहरांतून पत्रें वगैरे जें कांहीं बाहेर पाठवावयाचें असेल तें बंद केलेलें नसावें. तें प्रथम वरसेलीस येथें पाठवावें. नंतर जिकडल्या तिकडे पाठविलें जाईल.

(सही) बिस्मार्क.

(सही) फाव्र.

लढाई तहकूब झाल्याची बातमी ऐकून बोर्डो शहरामध्यें ग्यांबट यानें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

' नगरवासी लोकांनो, फ्रेंच लोकांची दुर्बळता व चुका यांमुळें परदेशस्थ शत्रूनें फ्रेंच लोकांवर मोठा कहर केला आहे. आजिवय पारिस शहर २८वे तारखेस शत्रूच्या हातीं लागलें त्या शहरचे लोक दुष्काळामुळें अगदी दीन झाले. हाल आणि संकटें भोगून ४ महिने तेथील लोकांनीं शहराचें रक्षण केलें. बाहेर प्रांतांतून कोणी तरी येऊन आपणांस सोडवील असें त्यांस वाटत होतें. ती अशा व्यर्थ झाल्यावर लढाई तहकूब केली. त्यांचे सारखे जर आपण

तिथें दारें वासनी तर अशा वाईट प्रसंग त्या शहरच्या लो-
कांवर आला नसता.

आपलें दुर्दैव पुढें आपल्या मागें लागलें आहे; म्हणून
आज हा प्रसंग आपणांवर आला आहे. आपणांस न को-
ळून, अथवा विचार न घेतां पारिस सरकारानें लढाई सु-
रू करून केली. आणि आपण फौजेंत नसावें असें
लिहून दिलें आहे. अजून पारिस शहरच्या सरकारा-
कडून आपणांकडे कोणी आलें नाहीं; इतक्यांत खरा
करा. फ्रेंच लोकांस जिंकलें असें जें शत्रूस वाटत आहे
तेंच फ्रेंच आतां आपणांस जिंकतात असें वाटावयास ला-
वा. पारिस शहर घेतलें आतां फ्रेंच आपण होऊन तह
करतील असें जें शत्रूस वाटत आहे हें त्यांचें अनुमान नि-
ष्फळ करा. किंवा या तीन अठवड्यांत जितकी उत्तम तयारी
होईल तितकी करा. आपली अब्रू, आपल्या फौजा व
आपल्या देशाचा अभिमान व मोठेपणा राहील अशा प्र-
कारचा तह झाला तर बरा; नाहीं तर पुन्हा लढाईची तयारी
असूं द्या. बेअब्रू करून घेऊं नका. आपलें वजन गा-
मवूं नका, अशी वेळ पुन्हा येणार नाहीं. आपल्या देशा-
वरील आपण मरून पावावें या सारखी मोठी पर्वणी पुन्हा येणार
नाहीं. फ्रेंच लोकांनीं—आपल्या पूर्वजांनीं फ्रान्स देश एकम-
ताचा व जुटीचा आपल्या स्वाधीन केला तसा त्यास आपण के-
ळिला आवे काय? त्यांनीं अलझेस आणि लारेन हे दोन प्रांत मि-
ळविले ते च परत देण्यास तुम्ही तयार झालां आहां. हें कितीं हीन
पणाचें काम आहे बरें; तुम्ही अब्रूकरितां प्राण देण्यास तया-
र झाला होतां, तेंच तुम्ही बेअब्रूच्या तहनाम्यावर सही

धरणार, आणि समजा फ्रेंच कुळामध्यें नीच व क्रियानष्ट निढी आतांचीच निपजली असा दोष पदरीं घेणार काय? सन १७८९ मधील फ्रेंचांचे वंशज तुम्हीच ना, आणि तुम्हीच या तहनाम्यावर सही करणार!! मोठें नवल आहे. नका, असें करूं नका. आपली माता फ्रान्स देश इच्छा तिची ममता कधीं करून शत्रूच्या हातीं देऊं नका. पराभवामुळें फ्रेंच लोक हतवीर्य झाले असें दाखवूं नका. पुनः लढा. शत्रूस आपल्या देशांतून घालवा. तन, मन, धन या कामाकरितां वेचा. आपण निर्लज्ज झालों आहों असें दाखवूं नका. फ्रान्स देशास शत्रूच्या हातीं देणार नाहीं अशी शपथ घ्या. युद्ध ठेवण्याचे तयारीस लागा. तयारीत असा. एकीनें वागा, लोकसत्तात्मक राज्य निरंतर चालेल असें करा."

पारिस शहरांतील एम. गीसार्ड म्हणून गृहस्थानें इंग्लंड देशचे फॉरेन मिनिस्टर ग्ल्याडस्टन यास पत्र लिहिलें तें:—

"माझे प्रिय ग्ल्याडस्टन साहेब,

राष्ट्रांची समानता आणि युरोप खंडांत स्वस्थता राखण्याचे कामीं जर तुम्हीं हात घालाल तर हें काय मोठें भूषणास्पद होईल, आणि तुमची योग्यता वाढेल. तुमचें आणि फ्रेंच लोकांचें चांगलें सख्य आहे, मागें जीं काहीं फ्रेंच लोकांनीं पातकें केलीं, त्याचें त्यांजला प्रायश्चित्त त्यांस आतां मिळालें आहे. तह, करावा असें सर्व फ्रेंच लोकांचें म्हणणें आहे

तुमचा व आमचा स्नेह झाल्या दिवसापासून कोणतीही महत्वाची गोष्ट तुमच्या आमच्या विचारा खेरीज झाली नाहीं. ग्रीक लोकांस तुर्की लोकांच्या हातून व तुर्की लोकांस रशियन लोकांच्या हातून तुह्मीं व आह्मींच सोडविलें आहे. अशा अनेक प्रकारांनीं आपण एकमेकांचें साह्यकारी असून आज फ्रेंच लोकांची तुह्मीं अशी दशा होऊं द्यावी काय? फ्रेंच लोक दीन झाले ह्मणून त्यांस हातचे सोडावें, आणि पूर्वींचा स्नेह विसरून जावा, हें तुम्हांसारख्यास योग्य नाहीं. तह करावा असें फ्रेंच लोक म्हणत आहेत, म्हणून ते निर्बळी झाले, त्यांचे अंगांत कांहीं सामर्थ्य राहिलें नाहीं, शौर्य राहिलें नाहीं, आतां त्यांचा स्नेह काय उपयोगी पडणार आहे, असें मनांत आणूं नका. हे गुण पूर्वीं पेक्षां आम्हांमध्यें अधिक वाढले आहेत. तुह्मीं व आम्हीं एकमेकांचीं जर खरोखर योग्यता समजत आहोंत, तर तुह्मीं व आम्हीं एकत्र झाल्यावर युरोप खंडांत शांतता करण्यास आपणांस उशीर लागेल काय? आतां असें कराल तरच बरें आहे. नाहीं तर पुढें मागें कधीं तरी युरोप खंडाच्या लोकांस दिवस फार वाईट येतील. याचा पूर्ण विचार करा. आज फ्रान्स देशच पतन पावला असें समजूं नका. सर्व जग जर्मन लोकांनीं या बरोबर जिंकलें आहे असें समजा. तुह्मीं आम्हांकरितां जर्मन लोकांशीं लढा असें आम्हीं ह्मणत नाहीं; परंतु आमचा कांहीं मुलूख घ्यावा असें जर्मन लोकांचे मनांत आहे तसें त्यांनीं न करावें, एवढें करणें तुमचे हातीं आहे. तुह्मीं यांत मन घातलें असतां निःसंशय चांगला व

मजबूत तह होईल. तुह्मी इतकें प्रसिद्ध करा कीं देशाच्या सरहद्दींत बदल होऊन जर तह होईल तर तो तह फार दिवस टिकणार नाहीं व तो तह आह्मांस ही कबूल होणार नाहीं."

जानेवारीचे २३ वे तारखेस फाव्र यानें ग्यांवट यास पत्र लिहीलें तें:—"१९ वे तारखेस पराभव झाल्यामुळें सर्व लोक जनरल ट्रोशूवर रागावले आहेत. त्यानें मला पुष्कळ वेळ सांगितलें कीं "आतां लढाई करणें उपयोगी नाहीं; कारण लढण्या जोगें आपणाजवळ सैन्य नाहीं. मी सेनापतीचें काम करण्यास अयोग्य आहे असें वाटत असल्यास मी या कामाचा राजीनामा देतो, तुह्मी दुसऱ्यास नेमून पहा." मित्रा जर अशी स्थीति आहे तर लढाई तहकूब करावी हें बरें आहे, कारण तेणें करून तरी कांहीं फायदा होईल. दोन दिवसांचे आंत शहरच्या लोकांस खरी हकीगत सांगावी लागेल, कारण लढा असें ते वारंवार ह्मणत आहेत. मोठा दुर्घट प्रसंग आला आहे. यांतून कसें पार पडावें हें समजत नाहीं. प्रिय मित्रा, माझें अंतःकरण अगदीं फाटून गेलें आहे. असें अरिष्ट येईल असें मला वाटलें नव्हतें. याची निरवा निरव होई पर्यंत मी वांचेन असें दिसत नाहीं. जरी वांचलों तरी जिवास समाधान वाटणार नाहीं. आतां आलेल्या प्रसंगाचा दोष दुसऱ्यास लावणें व्यर्थ आहे."

जानेवारीचे २२ वे तारखेस पूर्व प्रांतीं एका गांवीं जर्मन लोकांनीं इस्पितळावर हल्ला केला व एका सरदारास

निवंत जाळले. तेणें करून गारिबाल्डीस फार राग आला आणि ओरडला तें:—

" जुलमाच्या निर्लज्ज शस्त्रास धिःकार असो. जर्मन लोकांचे राज्य चित्ते सारखें आहे. त्यांचा आवडता काळ देण्याची चिन्हें दिसत आहेत. परंतु आहो जर्मन लोकांनो, तुह्मांस ठाऊक नाहीं काय कीं फ्रान्स देशाचा बादशहा सेडन शहराजवळ पतित झाला. आतां तुह्मी कोणाशीं लढत आहा हें नीट डोळे उघडून पहा. लोकसत्तात्मक राज्याचे योद्धे तुमचें कृत्य पाहून फार रागावले आहेत. परंतु तुह्मां सारखें भयंकर व अघोर कृत्य मी यांचे हातून घडूं देणार नाहीं. लोकसत्तात्मक राज्याचे पुत्रांची शुद्ध आणि परोपकारी वर्तणूक होती असें जगास समजेल. जुलमी राजाचे शिपायांची वर्तणूक पशू प्रमाणें निर्दय होती असेंही समजेल."

२१ वे तारखेस ग्यांबेट्टानें जाहीरनामा प्रसिद्ध केला तो:—

" सन १८५१ पासून तें १८७० चे सेप्टेंबरचे ४ थे तारखे पर्यंत कोणतें व कसलेंही सरकारी काम केलेला मनुष्य आतां जमणाऱ्या सभेंत घेतला जाणार नाहीं.

२ सन १७७९ पासून फ्रांस देशांत जे राजे झाले असतील त्यांच्या कुळांतील पुरुषांसही घेतलें जाणार नाहीं.

३ पतित झालेल्या बादशाहाचे अनुयायी किंवा शत्रूचे स्नेही यांस ही घेतले जाणार नाहीं.

पारिस शहर पतन पावलें. देशाचा नाश झाला. हजारों लोक मेले व जखमी झाले. शेता मळ्यांचा फन्ना उडाला. लोक अन्न अन्न करूं लागले. देशाचें वरचस्व गेलें. जागोजागचे लोक पारिस सरकारास दोष देऊं लागले ह्मणून त्यांस पारिस सरकारानें उत्तर दिलें तें:—

" फ्रेंच लोकांनो भुकेनें प्राण जाण्याची वेळ आली, ते वेळेस आम्ही शस्त्र खालीं ठेविलें. ' थोडे दिवस दम धरा ह्मणजे आह्मी तुह्मांस सोडवूं ' असें तुमचें वचन होतें. थोडे दिवस नाहीं परंतु ५ महिने आह्मी दम धरिला. आह्मांस सोडविण्यास येण्याचें कोणाचेंच धैर्य झालें नाहीं. एक महिनाभर सारखा शहरावर शत्रूचा गोळा चालला होता. ५० दिवस तर आह्मी उपास करून लढलों. शहरामधील वीस लक्ष मनुष्यांचा उगीच नाश होणार हें पाहून आम्हीं लढाई तहकुब केली. सर्व फ्रेंच लोकांनीं व जे आह्मांस शत्रू प्रमाणें मानीत आहेत, त्यांनीं या चा विचार करावा. १० दिवस तर आह्मी नुसतें पोट खाऊन लढलों. जे आज आह्मांस दोष लावीत आहेत तेच आमचे जागीं असते तर आह्मी काय संकटें भोगिलीं हें त्यांस समजलें असतें. आह्मी लढाई तहकूब करून सर्व फ्रेंच लोकांस विचार करण्यास फुरसत ठेविली आहे. इतर ठिकाणीं पाडाव झालेले शिपाई जसे जर्मनीत गेले आहेत, तसें आह्मी कांहीं पारिसच्या सैन्यास शत्रूच्या स्वाधीन केलें नाहीं. बोर्डो शहरांतील *डेलिगेशनचा आह्मी विचार घेतला नाहीं ह्मणून आह्मांस दोष लाविला आहे.

*सरकारानें आपल्या नांवानें पाठविलेला मुखत्यार.

परंतु आम्हां भोंवतीं शत्रूचा वेढा होता हें तुह्मांस माहित आहेच. आमच्या मुक्ततेस येणाऱ्या सैन्याची दाणादाण झाली. हें समजल्यावर आह्मीं लढाई तहकूब केली. आम्हीं केलेली तहकुबी तुह्मीं नामंजूर करीत असला तर करा, चिंता नाहीं. पारिस शहराचाच नाश होऊं द्या. आमची कांहीं तकरार नाहीं. फ्रान्स देशांतील लोकांनी निवडलेल्या लोकांची सभा भरावी. त्यांत तह करावयाचा किंवा लढाई चालवावयाची याचा विचार व्हावा. या करितां लढाई तहकूब केली. निवडणुकी मध्यें आट घालण्याची ही वेळ नव्हे. जे लोक आपणांसारखे शत्रूशीं शौर्यानें लढले आणि ज्यांनीं प्राण वेंचले, त्यांचा असा अपमान करणें हें अगदी गैर आहे. आपल्या रक्तानें भिजलेल्या जमिनीवर शत्रू विजयी होऊन उभा असतां आपसांतील मागील द्वेष मनांत आणले तर आपला देश शत्रूच्या हातून मुक्त होणार नाहीं. हें लक्षांत आणा बोर्डो शहरच्या डेलिगेशनानें केलेला ठराव आह्मी रद्द करितों. ज्या प्रांताच्या लोकांस जो मनुष्य योग्य दिसेल तो त्यांनीं या सभेस पाठवावा."

फाव्र यानें बिस्मार्क याची भेट पुन्हा घेऊन तहकुबीच्या मुदतींत दोन दिवस अधिक वाढविले व बेल फोर्ट कडील लढाई बंद करून तेथील किल्ला जर्मन लोकांच्या ताब्यांत दिला.

यानंतर फ्रान्स देशांत सभेस निवडून मनुष्यें पाठविण्याचे काम सुरू झालें.

या सभेंत निरनिराळ्या पक्षांचे लोक आले होते. ते येणें प्रमाणें.

| पक्ष | संख्या | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| अर्लिनिस्ट | ४०० | लेजिटिमिस्ट | ......५० |
| रिपब्लिकन्स | १५० | बोनापार्टिस्ट | ......२० |
| | | कोणत्याच पक्षांचे नाहींत असे | ......३० |
| | ५५० | | १०० |

६५०

फेब्रुआरीचे १२ वे तारखेस आदितवारीं बोर्डो शहरीं पहिली सभा भरली. एम्. बेनाईट-डी अझी हे अध्यक्ष स्थानीं बसले. नंतर भाषणें झालीं तीं:—

**अध्यक्ष**— सध्यां जो फ्रान्स देशावर प्रसंग आला आहे त्याच्या निवारणार्थ ही सभा भरली आहे. आतां काय बोलणें असेल तें बोलावें.

**फाव्र**— मी पारिस सरकारच्या नांवानें बोलतों. आह्मी आजपर्यंत या देशाचा कारभार केला. आतां सर्व देशाची सभा भरली आहे, तर या सभेचे स्वाधीन तो कारभार करितों नवीन सरकारची स्थापना होई पर्यंत जर सर्वांची इच्छा असेल तर आह्मी आपलीं कामें पाहूं.

इतकें बोलणें झाल्यावर सभा उठली, कारण सगळे सभासद आले नव्हते.

फेब्रुवारीचे १६ वे व १७ तारखेस पुन्हा सभा भरली

त्यांत एम्. थीर्स याला अध्यक्ष नेमिलें. १९ वे तारखेस १५ सभासदांचें डिप्लोम्याटिक कमिशन नेमून त्यांनीं एम्. थीर्स व ज्युल्स फाव्र या बरोबर वरसेलिस येथें जावें, आणि तहाचे वेळीं यांस मदत करावी, असें ठरलें. २१ वे तारखेस ती मंडळी वरसेलीस येथें गेली. २२ तारखेस तहकुबीची मुदत २४ तास अधीक वाढविली. नंतर तहाच्या कलमांचा कच्चा मसुदा तयार झाला तोः—

१ मेट्स, थियानवील धरून लारेन प्रांताचा पांचवा भाग आणि बेलफर्ट धरून सर्व अलसेस प्रांत फ्रेंच लोकांनीं जर्मन लोकांस द्यावा.

२ फ्रेंच लोकांनीं जर्मनीच्या बादशहास स्वारी खर्चाबद्दल दोन आब्ज रुपये द्यावे. याचे हप्ते मुकरर तहाचे वेळेस ठरवावे.

३ हा तह बोर्डो शहरांतील न्याशनल असेंब्लीनें कबूल केल्यावर जसे जसे फ्रेंच लोक स्वारीखर्चाचे रुपये हप्त्यानें देतील तसे तसे जर्मन लोकांनीं जिंकलेले प्रांत रिकामे करून द्यावेत.

हा तह अमलांत येई पर्यंत फ्रेंच सैन्यानें ल्वार नदीच्या दक्षिणेस असावें. फक्त ४०,००० शिपाई पारिस शहरा जवळ असावेत.

४ जर्मन सैन्य फ्रान्स देशांत राहील तों पर्यंत त्याचा खर्च फ्रेंच सरकारानें द्यावा.

---

वकिली करण्यासाठीं नेमलेली मंडळी.

५ फ्रेंच लोकांनीं जर्मन लोकांस दिलेल्या प्रांतांतील लोकांच्या हक्कास व व्यापारास कोणत्याही प्रकारचा धक्का लावूंनये. ते लोक जर देश त्याग करतील तर त्यांस जर्मन लोकांनीं अडथळा करूं नये.

६ तहनामा कायम झाल्यावर फ्रेंचांचे धरलेले शिपाई सोडून द्यावे.

७ हा मसूदा दोन्ही सरकारांनीं मंजूर केला म्हणजे मुकरर तहाचे कागद ब्रुसेल्स शहरीं व्हावे.

८ हा तह कायम झाल्यावर जर्मन लोकांच्या ताब्यांतील प्रांतांचा कारभार फ्रेंच सरकारानें करावा.

९ जर्मन लोकांनीं फ्रेंचांचे राजकारभारांत हात घालूं नये.

१० हा मसूदा मंजूर करण्या करितां आपआपल्या सरकारा पुढें लवकर सादर करावा.

११ हा तह मुकरर होई पर्यंत ३०,००० जर्मन शिपाई यांनीं पारिस शहरांत रहावें.

फेब्रुवारीचे २८ वे तारखेस फ्रेंच न्याशनल असेंब्ली मध्यें तहाचा विचार सुरूं होऊन मार्चाचे १ ले तारखेस मंजूर झाला. या वेळेस जर्मन लोकांच्या ताब्यांत जाणाऱ्या प्रांतांचे सभासद उठून गेले; कारण शत्रूच्या ताब्यांत जाणें त्यांस आवडलें नाहीं.

मार्चाचे १ ले तारखेस ३०,००० जर्मन शिपाई पारिस शहरांत गेले. ते दिवशीं शहरच्या लोकांस इतकें दुःख झालें कीं,

एक देखील मनुष्य त्यांस पाहण्याकरितां रस्त्यांत आला नाहीं सर्व घरें आणि दुकानें बंद होतीं. दुसरेच दिवशीं तह मंजूर झाल्याची बातमी कळविल्यावरून त्यांनीं शहर सोडिलें

मार्चाचे १२ वे तारखेस जर्मनीचें राजमंडळ वरसेलीस गांव सोडून निघालें. २० वे तारखेस फ्रेंच न्याशनल असेंब्ली त्या ठिकाणीं आली.

मार्चाचे १० वे तारखेस रेडरिपाब्लिकन लोकांनीं बंड केलें आणि पारिस शहराजवळ जें फ्रेंच सैन्य होतें त्यास फितावून प्रथम तोफखाना ताब्यांत घेतला. हें बंड मोडण्या करितां ल्वार नदीच्या आलीकडे सैन्य आणण्यास फ्रेंचांस जर्मन सरकारची परवानगी घ्यावी लागली. नंतर मार्चाचे आखेरीस बंडवाल्यांशीं लढाई सुरू झाली. एप्रिलमहिन्यांत सरकारी सैन्यावर मेकमहान यास सेनापति नेमिलें.

मेचे १० वे तारखेस मुकरर तहाचे कागद तयार झाले. मेचे १८ वे तारखेस या तहनाम्यावर सह्या होऊन २० वे तारखेस अमलांत आला.

बंड वाल्यांची व सरकारची लढाई पारिस शहरच्या रस्त्यांत व घरोघर होऊन मेचे १९ वे तारखेस बंडवाल्यांचा अगदी मोड झाला. त्या लढाईच्या योगानें शहरचा फार नाश झाला.

२१ वे तारखेस न्याशनल असेंब्लीसभेचा अंमल शहरांत चालू झाला.